मंडळ सचिव यांनी सादर केले की, इमारत व इतर बांधकाम व्यवसायामध्ये हिताचे रक्षण करण्याच्या दृष्टीने केंद्र शासनाने इमारत व इतर बांधकाम कामगार अधिनियम (रोजगार नियमन व सेवाशर्ती) लागू केला असून त्याअंतर्गत महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) नियम, २००७ अस्तीत्वात आले आहे दिनांक ११.१०.२०१३ रोजीच्या अधिसुचनेव्दारे महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) (सुधारणा) नियम २०१३ प्रकाशीत करण्यात आले असून त्याव्दारे सद्यस्थितीत बांधकाम कामगारांकरीता राबविण्यात येणाऱ्या लाभाबाबतच्या योजना तयार करण्यात आल्या आहेत. त्यामुळे सदरची अधिसुचना अधिक्रमित करून नविन सुधारणा प्रकाशित करणे प्रस्तावित आहे.

२. केंद्र शासनाच्या इमारत व इतर बांधकाम कामगार अधिनियम (रोजगार नियमन व सेवाशर्ती), १९९६ मधील कलम (६२) व (४०) नुसार नियम करण्याचे अधिकार राज्य शासनास आहे तज्ञ समितीच्या शिफारशीनुसार महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) (सुधारणा) नियम २०१३ अधिक्रमित करून महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) (सुधारणा) नियम २०२३ अधिसूचित करणेबाबतचा प्रस्ताव दिनांक २२.०६.२०२३ रोजी शासनास सादर करण्यात आला होता. त्यानुषंगाने दिनांक ३०.११.२०२३ रोजीच्या अधिसुचनेअन्वये महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) (सुधारणा) नियम २०२३ प्रकाशीत करण्यात आले आहे.

ठराव क्र. ६० (५)/२०२४ :-

तज्ञ समितीच्या महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगाराचे व सेवाशर्तीचे विनियमन) (सुधारणा) नियम २०१३ अधिक्रमित करून, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगाराचे व सेवाशर्तीचे विनियमन) (सुधारणा) नियम २०२३ करणेबाबत शासन मान्येतेने केलेल्या कार्यवाहीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

विषय क्र.०६ :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत मुख्यालय व अधिनस्त जिल्हा कार्यालयाच्या अभिलेख कक्षाचे स्कॅनिंग ॲन्ड डिजिटायझेशन करून घेणे व कॉम्पेक्टर स्टोरेज उपलब्ध करून देणेबाबत.

मंडळ सचिव यांनी सादर केले की, राज्यातील कामगार विभागाच्या कार्यालयातील अभिलेख सुस्थितीत स्कॅनिंग करून डिजिटल कॉपेक्टरमध्ये जतन करून ठेवण्याबाबतच्या प्रस्तावास मा.मंत्री (कामगार) तथा मा.अध्यक्ष यांनी प्रदान केलेल्या मान्यतेस अनुसरून उद्योग, उर्जा व कामगार विभाग यांच्या दिनांक २८.१२.२०२२ रोजीच्या पत्रान्वये मंडळ मुख्यालय व अधिनस्त जिल्हा कार्यालयाच्या अभिलेख कक्षाचे कॉम्पॅक्टर स्टोरेज व स्कॅनिंग ॲण्ड डिजिटायझेशन याकरीता ई- निविदा प्रसिध्द करणे या विषयी इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या बैठकीत पारित झालेल्या ठरावानुसार व विहीत कार्यपध्दती/ नियमानुसार कार्यवाही करणेबाबत शासन मान्यता प्रदान केली आहे.

२. सदर मान्यतेच्या अनुषंगाने स्थानापन्न संचालक शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय पुणे यांना तांत्रिक मान्यता व माहिती मिळणेबाबत मंडळाच्या दिनांक १८.११.२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. त्याअनुषंगाने स्थानापन्न संचालक शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय पुणे यांनी त्यांच्या दिनांक १९.११.२०२२ रोजीच्या पत्रान्वये तांत्रिक मान्यता देण्यात आली आहे.स्थानापन्न संचालक शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय पुणे यांच्या दिनांक १९.११.२०२२ रोजीच्या पत्रात कळविलेल्या निकषाच्या अनुषंगाने जिल्हा सुविधा केंद्रात अभिलेख कक्ष अद्यावतीकरणास जिल्हा सुविधा केंद्राच्या उपलब्ध जागेत कॉपेक्टर स्टोरेज व स्कॅनिंग ॲण्ड डिजिटायझेशन करण्याबाबत कार्यालय निहाय उपलब्ध अभिलेख कक्षाची जागा व अभिलेख व्याप्ती लक्षात घेऊन कॉम्पेक्टरची संख्या निश्चित करून मंडळ कार्यालयामार्फत पत्रव्यवहार करण्यात आला आहे.शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभाग दिनांक २४.०८.२०१७ मधील सूचना क्र.०१ नुसार केंद्र शासनाने विकसित केलेल्या गव्हर्मेंट ई- मार्केटप्लेस (GeM) पोर्टलची कार्यपध्दती राज्य शासनास वस्तू व सेवा खरेदी करण्यासाठी स्विकृत करण्यास मान्यता देण्यात आली आहे आणि शासन निर्णय दिनांक ०१.१२.२०१६ मधील परिच्छेद क्र.३.२.२ व ३.२.३ मध्ये सुधारणा करून GeM पोर्टलवर खरेदीसाठी उपलब्ध असलेल्या वस्तू व सेवांचे दोन किंवा त्यापेक्षा जास्त पुरवठादार असतील तर सदर वस्तू व सेवांची GeM पोर्टलवर खरेदी करण्यास राज्य शासन, राज्य शासनाचे सार्वजनिक उपक्रम, स्थानिक स्वराज्य संस्था, विधानसभेच्या कायदयाखाली स्थापित कोणतीही संस्था किंवा मंडळ किंवा महामंडळ इत्यादी कार्यालयांना बंधनकारक करण्यात आले आहे. त्यानुसार प्रस्तावित Mobile Compactor Storage Syestem and Document Management System (मोबाईल कॉपेक्टर स्टोरेज व अभिलेख स्कॅनिंग ॲण्ड डिजिटायझेशन करून घेणे) या कामाचे GeM पोर्टलवरील पुरवठादाराकडून वस्तू व

पान क्र. १८ पैकी १०१

सेवांची गुणवत्ता, विनिर्देश आणि इत्यादी आवश्यक बाबी तपासून स्पर्धात्मक ऑनलाईन निविदेद्वारे (Online Bidding) खरेदी करणे प्रस्तावित होते.प्राप्त तीन निविदाकारांपैकी मे. ब्रेथवेट ॲन्ड कंपनी लि. व मे. सेन्ट्रल गर्व्हमेंट एम्प्लाईज कन्जुमर को.ऑ. सोसायटी (केंद्रीय भांडार) हे दोन निविदाकार केंद्रिय सार्वजनिक क्षेत्रामधील उपक्रमाअंतर्गत येत असून, पुर्व अनुभवाव्यतिरीक्त अन्य सर्व तांत्रिक बाबींची पुर्तता करत होते तथापि मे.सेफ ॲन्ड सिकयुरिटी सिस्टीम ही खाजगी संस्था असून, १५ तांत्रिक बाबीपैकी केवळ दोन बाबींची पुर्तता करत असल्याने त्याना अपात्र करण्यात आले तसेच मे. सेन्ट्रल गर्व्हमेंट एम्प्लाईज कन्जुमर को.ऑ. सोसायटी (केंद्रीय भांडार) या निविदाकाराने मागणी केलेले MSME उद्योगांना पूर्व अनुभवाच्या अटीतून सूट देणे हे राज्य शासनाच्या कार्यकक्षेत असल्याने त्याबाबत आदेशार्थ प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला होता. त्यास उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या दिनांक १८.०५.२०२३ रोजीच्या पत्रान्वये शासन मान्यता प्रदान केली आहे.मंडळ मुख्यालय व अधिनस्त जिल्हा कार्यालयाच्या अभिलेख कक्षाचे अद्यावतीकरणांतर्गत प्रस्तावित मोबाईल कॉम्पेक्टर स्टारेज व अभिलेख स्कॅनिंग ॲण्ड डिजिटायझेशन करून घेणेकरीता प्राप्त दरांच्या अंतिमिकरणासाठीचा प्रस्ताव शासन दिनांक ३१.०५.२०२३ रोजी शासन मान्यतेस सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावास शासनाने दिनांक १५.०६.२०२३ अन्वये मे. सेंट्रल गर्व्हमेंट एम्पलॉईज (केंद्रीय भांडार) यांनी सादर केलेले रू.१६.९५ लक्ष प्रति नग (एकूण ३१४.४२२५ कोटी) या न्यूनत्तम दराची निविदा स्विकृत करण्यात शासन मान्यता प्राप्त झाली आहे. सदर शासन मान्यतेच्या अनुषंगाने नियुक्त संस्थेसोबत केलेला करारनामा करून दिनांक ०४.०७.२०२३ अन्वये कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत.जिल्हा कार्यालयाच्या अभिलेख कक्षाचे अद्यावतीकरणांतर्गत प्रस्तावित मोबाईल कॉम्पेक्टर स्टारेज व अभिलेख स्कॅनिंग ॲण्ड डिजिटायझेशन करून घेणेकरीता अमरावती, अकोला, यवतमाळ, वाशिम व बुलडाणा करीता भारत संचार निगम लिमिटेड, अमरावती यांचे भाडेदर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरापेक्षा कमी असल्याने सदर जागा कॉम्पॅक्टर करीता भाडेतत्वावर घेण्यास मा. मंत्री (कामगार) मा. अध्यक्ष यांनी मान्यता प्रदान केली आहे.जिल्हा कार्यालयाच्या अभिलेख कक्षाचे अद्यावतीकरणांतर्गत प्रस्तावित मोबाईल कॉम्पेक्टर स्टारेज व अभिलेख स्कॅनिंग ॲण्ड डिजिटायझेशन करून घेणेकरीता नागपूर, भंडारा, चंद्रपूर व वर्धा करीता महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ यांनी सादर केलेल्या भाडेदराप्रमाणे सदर जागा कॉम्पॅक्टर करीता भाडेत्वावर घेण्यास मा. मंत्री (कामगार) मा. अध्यक्ष यांनी मान्यता प्रदान केली आहे.

ठराव क्र. ६० (६)/२०२४ :-

१. मंडळ मुख्यालय व क्षेत्रीय कार्यालयातील अभिलेख सुस्थितीत ठेवण्यासाठी जिल्हानिहाय मागणीप्रमाणे कॉम्पेक्टर स्टोरेज स्कॅनिंग ॲन्ड डिजिटायझेशन करण्याकरीता, ई-निविदा सुचना प्रसिध्द करून न्यूनतम निविदाकार मे. सेन्ट्रल गर्व्हमेंट एम्प्लाईज कन्जुमर को.ऑ. सोसायटी (केंद्रीय भांडार) यांचेसोबत करारनामा करणे व कार्यारंभ आदेश देण्याबाबत शासन मान्येतेने केलेल्या कार्यवाहीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२. अमरावती, अकोला, यवतमाळ, वाशिम व बुलडाणा करीता भारत संचार निगम लिमिटेड, अमरावती यांचे भाडेदर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरापेक्षा कमी असल्याने सदर जागा कॉम्पॅक्टर करीता भाडेतत्वावर घेण्याबाबत केलेल्या कार्यवाहीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

३. नागपूर, भंडारा, चंद्रपूर व वर्धा करीता महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ यांनी सादर केलेल्या भाडेदराप्रमाणे सदर जागा कॉम्पॅक्टर करीता भाडेतत्वावर घेण्याबाबत केलेल्या कार्यवाहीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

विषय क्र.०७ :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत नोंदीत बांधकाम कामगारांसाठी नाक्याच्या ठिकाणी शेड उभारणेबाबत

मंडळ सचिव यांनी सादर केले की, मंडळाच्या दिनांक १२.१२.२०२२ रोजीच्या बैठकीत राज्यातील महानगरपालिका/ नगरपालिका क्षेत्रात बांधकाम कामगारांकरीता नाक्याच्या ठिकाणी शेड उभारणेबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यास अनुसरून राज्यातील महानगरपालिका/ नगरपालिका क्षेत्रात बांधकाम कामगारांकरीता नाक्याच्या ठिकाणी तात्पुरत्या स्वरूपात शेड उभारणे या योजनेस मंडळाने तत्वत: मान्यता प्रदान केली असून, महानगरपालिका/ नगरपालिका/ नगरपंचायत यांच्याकडून जागेचा तपशील प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्याबाबतचा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.

२. नाक्याच्या ठिकाणी नाका शेड उभारणेकरीता ई- निविदा पध्दतीने कार्यवाही करणे व ई- निविदा पध्दतीने नियुक्त संस्थेमार्फत पुढील कार्यवाही करणेबाबत टिप्पणी मा. अध्यक्ष तथा मंत्री (कामगार) यांना सादर करण्यात आली होती. त्यास मा. अध्यक्ष तथा मंत्री (कामगार) यांनी मान्यता प्रदान केली आहे. वरीलप्रमाणे मान्यतेनुसार दिनांक ०१.१२.२०२३ अन्वये शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावास उद्योग,उर्जा, कामगार व खनिकर्म विभाग यांच्या दिनांक १४.१२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांसाठी नाक्याच्या ठिकाणी शेड उभारण्याच्या कामासाठी खालील मुद्दयांच्या अधीन राहून ई- निविदा पध्दतीने कार्यवाही करण्यास शासन मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

(अ) मंडळांतर्गत नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांसाठी कामगार नाका शेड उभारण्यासाठी जागा आणि ठिकाणाची उपलब्धता

(ब) बांधकाम कामगारांसाठी उभारण्यात येणाऱ्या कामगार नाका शेडचे आकारमान, संपूर्ण आराखडा व त्यासाठी लागणारा अंदाजित खर्च (प्रती नाका)

(क) बांधकाम कामगारांसाठी उभारण्यात येणाऱ्या कामगार नाका शेडमध्ये उभारण्यात येणाऱ्या सोयी सुविधा

(ड) कामगार नाका शेड उभारल्यानंतर त्याची देखरेख, देखभाल दुरूस्ती याबाबत लागणारा खर्च आणि त्यासाठी मंडळावर येणारा आर्थिक भार

वरीलप्रमाणे शासन मान्यतेच्या अनुषंगाने मंडळातील बांधकाम कामगारांकरीता नाक्याच्या ठिकाणी शेड उभारणे या कामाच्या ई- निविदेवर चर्चा करण्याकरीता मा. कामगार आयुक्त मा. अध्यक्ष, खरेदी समिती यांच्या अध्यक्षतेखालील खरेदी समितीची बैठक दिनांक २७.१२.२०२३ बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत नाका शेड उभारणी हे बांधकाम स्वरूपाचे काम असून तांत्रिक मान्यता व निविदेची अंदाजित किंमत व न्यूनत्तम दर धारकाच्या दरांची तुलना करण्यासाठी प्रती नाका शेड उभारणीचे दर आवश्यक असल्याने

पान क्र. २१ पैकी १०१

निविदा प्रारूपामधील (RFP) कामाची व्याप्तीनुसार (Scope of Work) प्रती नाका शेड उभारणीचे (Per Labour Shed) बाबनिहाय अंदाजपत्रक मंडळ व शासन मान्यतेने यापूर्वी तयार करण्यात आलेले नाका शेड च्या ई- निविदेतील नमूद अटी व शर्ती नुसार प्रति नाका शेड रू.७.८८ लक्ष (वस्तू व सेवाकर वगळून) (अंदाजपत्रकाचा तपशील संलग्न) संपूर्ण महाराष्ट्रात महानगरपालिका/ नगरपालिका/ कटक मंडळे इत्यादी सुमारे १००० नाका शेड उभारणीकरीता नवीन निविदा अर्जाचा मसुदा तयार करण्यात आला आहे. सदर ई- निविदा अर्जाचा मुसदा मंडळाच्या दिनांक ०२.०२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये शासन मान्यतेस्तव सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावास शासनाने दिनांक ०७.०२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये मान्यता प्रदान केली आहे.

ठराव क्र.६० (६)/२०२४ :-

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांतर्गत नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांसाठी नाक्याच्या ठिकाणी शेड उभारण्याची कार्यवाही ई- निविदा पध्दतीने शासनास प्रस्ताव सादर करण्याबाबत केलेल्या कार्यवाहीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

विषय क्र.०८ :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ मुख्यालयाची सद्यस्थितीतील भाडे तत्वावरील जागेची मुदत माहे जुन २०२४ अखेर संपुष्टात येणार असल्याने मंडळासाठी एम. एम. टी. सी. हाऊस येथील तळमजला, पाचवा मजला येथील जागेस मुदतवाढ देण्यास व चौथा मजला नव्याने भाडयाने घेणेबाबत.

मंडळ सचिव यांनी सादर केले की, मंडळाच्या दिनांक २९.११.२०२३ रोजीच्या पत्र व वेळोवेळी प्रत्यक्ष भेटी व दूरध्वनीवरून मंडळ मुख्यालयाकरीता एमएमटीसी हाऊस येथील ०५ व्या मजल्यावरील करारनाम्याची मुदत दिनांक ३०.०६.२०२४ पर्यंत वैध असल्याने मंडळ स्तरावरून ०४ था मजला, ०५वा मजला व तळमजल्यावरील काही भाग भाडेतत्वावर मिळणेकरीता एमएमटीसी प्रशासनाकडे विनंती करण्यात आली होती.मंडळ मुख्यालयामार्फत कराराव्दारे मे.एमएमटीसी हाऊस, (केंद्र शासनाचा उपक्रम) येथील पाचवा मजला ४४४८ स्क्वेअर फूट व तळमजला १३७८ स्क्वेअर फूट जागा मंडळाने दिनांक १६.१०.२०१९ ते दिनांक ३०.०६.२०२४ या पाच वर्षाच्या कालावधीकरीता भाडेतत्वावर घेतली आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	जागा तपशील	जागेचे क्षेत्रफळ चौ.फूट	प्रति चौ.फूट दर (०१.०४.२०२२ ते दिनांक ३०.०६.२०२४ अखेर)	प्रत्यक्ष मासिक भाडे खर्च दरमहा (वस्तू सेवा करांसहीत)
१	०५ वा मजला एमएमटीसी हाऊस, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स वांद्रे पूर्व	४४४८	रू.३२३.७३/- + १८% GST =३८२.००	१६,९९,१४२/-
२	तळमजला मजला एमएमटीसी हाऊस, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स वांद्रे पूर्व	१३८८.३६	रू.३२३.७३/- + १८% GST =३८२.००	५,२६,५३५/-
	एकूण	**५८३६.३६**		**२२,२५,६७७/-**

मंडळाच्या दिनांक २९.११.२०२३ रोजीच्या पत्रान्वये मंडळ मुख्यालयाकरीता ी हाऊस येथील ०५ व्या मजल्यावरील करारनाम्याची मुदत दिनांक २४ पर्यंत वैध असल्याने मंडळ स्तरावरून ०४ था मजला, ०५वा मजला व ावरील काही भाग भाडेतत्वावर घेणेकरीता विनंती करण्यात आली होती. सदर अनुषंगाने मे.एमएमटीसी हाऊस, केंद्र शासनाचा उपक्रम यांनी त्यांच्या दिनांक २४ रोजीच्या पत्रान्वये खालीलप्रमाणे मान्यता प्रदान केली आहे.

ा मजल्यावरील करारनाम्यास ०३ वर्षाची मुदतवाढ देण्यात येत आहे. (दिनांक .२०२४ ते दिनांक ३०.०६.२०२७)

भाडेतत्वावरील जागा १०,२७४ स्क्वेअर फूट (०४ था मजला ४४४८ स्क्वेअर ाचवा मजला ४४४८ स्क्वेअर फूट व तळमजला १३७८ स्क्वेअर फूट) उपलब्ध

प्रमाणे नमूद जागेचा दर प्रति स्क्वेअर फूट रू.२८७/-, प्रति माह असे नमूद आहे.

ा मजल्यावरील फर्निचरींग कामकाजाकरीता ४५ दिवसांचा Moratorium ावधी देण्यात येत आहे.

टी व शर्ती मध्ये यापूर्वी करण्यात आलेल्या लिव्ह अँड लायसन्स नुसार कोणताही केला जाणार नाही असे नमूद आहे.

नच्या कालावधीत प्रादेशिक कार्यकारी अधिकारी, कोकण विभाग, कामगार उप मुंबई शहर, मुंबई उपनगर (पुर्व) व मुंबई उपनगर (पश्चिम) या कार्यालयांच्या ुविधा केंद्राकरीता एकत्रितरीत्या जागेची आवश्यकता असल्याचे समजते त्यामुळे यालयाकरीता तळमजला व पाचवा मजला तसेच उपरोक्त कार्यालयाकरीता चौथा लब्ध होणे प्रस्तावित आहे. तळमजला, चौथा व पाचवा मजला भाडेतत्वावर त्याबाबतचा खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

तपशील	जागेचे क्षेत्रफळ	प्रत्यक्ष मासिक खर्च दरमहा (वस्तू सेवा करांसहीत)
वा मजला एमएमटीसी हाऊस, ांद्रे कुर्ला कॉम्पलेक्स वांद्रे पूर्व	४४४८ स्क्वेअर फूट	१५,०६,३६०/-
था मजला एमएमटीसी हाऊस, ांद्रे कुर्ला कॉम्पलेक्स वांद्रे पूर्व	४४४८ स्क्वेअर फूट	१५,०६,३६०/-
ळमजला मजला एमएमटीसी ऊस, वांद्रे कुर्ला कॉम्पलेक्स वांद्रे पूर्व	१३८८.३६ स्क्वेअर फूट	४,७०,१८२
विद्युतशुल्क	१०२८४.३६	३,००,०००
इलेक्ट्रीक मेंटेनन्स	१०२८४.३६	२७,४९४
एकूण	**१०२८४.३६**	**३८,१०,३९६**

ठराव क्र.६० (८)/२०२४ :-

मंडळ मुख्यालयाची सद्यस्थितीतील भाडे तत्वावरील जागेची मुदत माहे जून २०२४ अखेर संपुष्टात येणार असल्याने, मंडळासाठी एम.एम.टी.सी. हाऊस येथील तळमजला व पाचवा मजला येथील जागेस मे, २०२७ अखेर मुदतवाढ देणे तसेच मंडळ मुख्यालय व आवश्यकतेनुसार बृहन्मुंबई क्षेत्रातील जिल्हा कामगार सुविधा केंद्र व प्रादेशिक कार्यालयाकरीता चौथा मजला नव्याने भाडयाने घेणेबाबत एम. एम. टी. सी. हाऊस (केंद्र शासनाचा उपक्रम) यांनी देऊ केलेल्या दराने मे, २०२७ अखेर भाडयाने घेण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

०९ :- **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत जिल्हा कामगार सुविधा केंद्र स्थापन करणेकरीता मंडळामार्फत नियुक्त मे.टेक्नोक्राफ्ट असोसिऐटस यांना मुदतवाढ देणेबाबत.**

ळ सचिव यांनी सादर केले की, मंडळांतर्गत मुख्यालय, ०६ विभागीय कार्यालये व कामगार सुविधा केंद्र स्थापन करणेकरीता ई-निविदा दिनांक १४.०१.२०१९ वड करण्यात आलेल्या एजन्सी मे. टेक्नोक्राफट असोसिएट, माहिम (पश्चिम), सोबत मंडळाने दिनांक २७.०५.२०१९ रोजी रीतसर करारनामा केला आहे. सदर तील अट क्र. ७.१२ नुसार कराराचा कालावधी दिनांक २७.०५.२०१९ ते २२ असा ३ वर्ष असून पुढील २ वर्ष मंडळ व एजन्सी यांच्या परस्पर संमतीने व कालावधीसाठी करारनाम्यास मुदतवाढ करण्याची तरतूद आहे.माहे मे २०२२ ालावधीत मंडळ व एजन्सी यांचे परस्पर समन्वयाने राज्यात मंडळ मुख्यालयासह ठिकाणी विभागीय/जिल्हा कामगार सुविधा केंद्र (WFC) स्थापनेची/उभारणेची पूर्ण झालेली आहे. उर्वरित ठिकाणी जिल्हा कामगार सुविधा केंद्र उभारणीचे प्रलंबित आहे. मे. टेक्नोक्राफट असोसिएट यांनी करारनाम्यावेळी सर्व जिल्हा विधा केंद्र (WFC) उभारणीचे मुल्यावर आधारीत परिगणित केलेली बँक गॅरंटी ली आहे.तसेच मंडळाचे विस्तारीत कार्यालय नरीमन भवन कुलाबा, मुंबई या र घेतलेल्या जागेमध्ये (WFC) स्थापनेअंतर्गत मंजूर फर्निचर व नुतणीकरण न घेणे प्रस्तावित आहे. त्यानुसार मुळ करारनाम्यातील प्रलंबित ०९ जिल्हा सुविधा केंद्र (WFC) व वाढीव काम नरिमन भवन येथील विस्तारीत डील काम असे एकुण १० कामे प्रस्तावित आहे, सदर कामाचे अंदाजित मुल्य ो इतके अपेक्षित आहे, त्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे :-

Particular	Amount in Rs.
Total Project Cost without Taxes	२१,०५,८६,३४६
er Location Cost considering ४३ Locations	४८,९७,३५७
tal Number of Locations to be covered as per agreement	४३
Total Number of Locations where WFC Construction is completed	३४
mber of WFC to be covered under Extended duration of agreement	९
Furniture and Interior work (as per items	१

पान क्र. २६ पैकी १०१

Sr. No.	Particular	Amount in Rs.
	mentioned in LOI) in extension office at Nariman Bhavan, Mumbai	
७	Total Number of WFC to be covered under Extended duration of agreement	१०
८	Total Project Value of New WFC under Extended duration of agreement	४,८९,७३,५६९

२. मा. लोकप्रतिनिधीची मागणी व मंडळाकडील जिल्हा कामगार सुविधा केंद्र (WFC) उभारणेची प्रशासकीय निकड पाहता उर्वरीत जिल्हा कामगार सुविधा केंद्र (WFC) उभारणी कामकाजासाठी करारनाम्यातील अट क्र.७.४ नुसार एजन्सीचे कामकाज समाधानकारक असलेस मंडळ व एजन्सी यांच्या परस्पर संमतीने पुढील वाढीव कालावधीसाठी करारनाम्यास मुदतवाढ करण्याची तरतूद आहे. त्यानुसार मे. टेक्नोक्राफट असोसिएट, मुंबई या एजन्सीने मागील ३ वर्ष केलेले काम समाधानकारक असून उर्वरीत जिल्हा कामगार सुविधा केंद्र (WFC) उभारणीच्या प्रलंबित कामकाजासाठी मे. टेक्नोक्राफट असोसिएट, मुंबई यांना माहे मे २०२२ पासून पुढील २ वर्ष कालावधीकरीता मुदतवाढ देणे प्रस्तावित आहे.उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दिनांक ०१.१२.२०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार पुर्वी दिलेल्या आदेशाच्या संदर्भात पुर्नप्रत्ययी आदेश सुरवातीचा आदेश दिल्यानंतर सहा महिन्याच्या कालावधीच्या पुर्वी देता येईल अशी तरतूद नमूद आहे.यास्तव संबंधित एजन्सीची सदर मुदतवाढीस लेखी संमती असलेस वाढीव कालावधीचा करारनामा प्रारूप व मंडळाचे विस्तारीत कार्यालय नरीमन भवन कुलाबा, मुंबई येथील WFC च्या धर्तीवर प्रस्तावित फर्निचरींग व रिनोव्हेशन कामकाजाचे अंदाजित करारनामा मुल्य रू.४.९० कोटीच्या ५% मर्यादेत पूर्णांकांत रू. २५ लक्ष सुरक्षा अनामत रक्कम सदर एजन्सीकडून राष्ट्रीयकृत बँकेची बँक गॅरंटी स्वरूपात मंडळाकडे जमा करणेस मा. मंत्री (कामगार) मा. अध्यक्ष यांनी मान्यता प्रदान केली आहे.वरीलप्रमाणे दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने मंडळाच्या दिनांक ०६.०२.२०२४रोजीच्या पत्रान्वये रू.२५.०० लक्ष रक्कमेची राष्ट्रीयीकृत बँकेची बँक गॅरंटी जमा करणेबाबत कळविले आहे. त्यानुसार मे. टेक्नोक्राफट असोसिएट, मुंबई यांनी रक्कम रू.२५.०० लक्ष रक्कमेची मे. स्टेट बँक ऑफ इंडिया बँकेची गॅरंटी मंडळ मुख्यालयात सादर केली आहे. मा. अध्यक्ष तथा मंत्री (कामगार) यांच्या मान्यतेने वाढीव कालावधीसाठी मुदतवाढ व करारनामा करण्यास मंजूरी आहे.

ठराव क्र.६० (९)/२०२४ :-

मुंबई (नरीमन भवन), मुंबई उपनगर (पश्चिम), ठाणे, चंद्रपूर, अकोला, नाशिक, जळगांव, पुणे, सातारा, इचलकरंजी पैकी अकोला जिल्हयात सुविधा केंद्र स्थापनेची कार्यवाही करण्यात आली असून उर्वरित ठिकाणी सुविधा केंद्र स्थापनेची कार्यवाही करणे शिल्लक असल्याने मे. टेक्नोक्राफ्ट असोसिएटस यांना मुदतवाढीस व करारनामा याबाबत केलेल्या कार्यवाहीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

विषय क्र. १०:- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांना देण्यात येणाऱ्या विविध सुविधांचे सनियंत्रण करण्यासाठी संगणक प्रणाली (Dashboard) विकसीत करणेबाबत.

मंडळ सचिव यांनी सादर केले की, मंडळाकडील बांधकाम कामगार नोंदणी, नुतनीकरण आणि लाभ वाटप दावे, बांधकाम उपकर बँक खात्यावर संकलन, क्षेत्रिय कार्यालयाकडून माहिती संकलन, खर्च सनियंत्रण, बांधकाम उपकर अधिनियमांतर्गत संबंधित कार्यालयीन यंत्रणा/ आस्थापना यांच्या नोंदणीचे व्यवस्थापन इत्यादी करीता विकसित करण्यात आलेल्या विविध संगणक प्रणाली/ कार्यपध्दतीमध्ये माहिती संकलन, माहितीची छाननी, तपासणीकरीता मंडळ कर्मचाऱ्यांचा होत असलेला कालपव्यय, तसेच, सदर संगणक प्रणाली/ कार्यपध्दती मध्ये संबंधित यंत्रणाची नोंदणी आणि बांधकाम कामगारांची नोंदणी यामध्ये सहसंबंध दर्शविणारी तसेच मंडळाच्या विविध संगणक प्रणाली/ कार्यपध्दती मध्ये सहसंबंध दर्शविणारी कोणतीही यंत्रणा सध्या अस्तित्वात नसल्याने व माहिती संकलनासाठी होत असलेला विलंब, मानवी कार्यान्वयाच्या मर्यादा तसेच विश्लेषण आणि मंडळाच्या विविध कल्याणकारी योजनांशी संबंधित विस्तृत माहिती संकलनातील मर्यादा, Real Time Data न मिळणे, अपुरा डाटा इत्यादी मर्यादा व त्रुटी दूर करण्यासाठी Single Dashboard प्रणाली विकसित करणे आवश्यक होते.

२. मा. मंत्री (कामगार) तथा मा.अध्यक्ष यांच्या दिनांक १५.०३.२०२३ च्या मान्यतेने शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभाग दिनांक १.१२.२०१६ मधील नियम क्र.४.४.२. (४) नुसार Selecting Agency for Implementation, Operation, Hosting, Maintenance and support of Data warehousing, Data Analytics and visual Analytics platform at MBOCWW Board या ई- निविदा सूचनेची जाहिरात एका राष्ट्रीय व एका राज्यस्तरीय वर्तमानपत्रात दिनांक २०.०३.२०२३ रोजी माहिती व जनसंपर्क संचालनालयामार्फत प्रसिध्दीस देण्यात आली होती व सदर निविदेच्या वेळापत्रकानुसार दिनांक २१.०३.२०२३ रोजी www. Mahatender.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली होती. मा. अध्यक्ष, खरेदी समिती यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २७.०२.२०२३ रोजी पार पडलेल्या खरेदी समितीच्या बैठकीमध्ये सदर ई- निविदा अर्जाचे प्रारूप अंतिम करून ई-निविदा प्रसिध्द करण्यात आली.ई-निविदा प्रक्रियेअंती खालील ०३ निविदाकारांना खरेदी समितीने सर्वानुमते तांत्रिकदृष्टया पात्र ठरविले आहे.

i.	Diagonal Consulting LLP Consortium Member, Neplar Solution Pvt. Ltd.
ii.	Exponetia.ai Pvt. Ltd.
iii.	Mahapatra Universal Ltd. Consortium Member Instalogic Solution Pvt. Ltd.

शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभाग दिनांक ०१.१२.२०१६ मधील ४.५.२ नुसार M/s. Mahapatra Universal Ltd. Consortium Member Instalogic Solution Pvt. Ltd. या निविदाकारांनी सादर केलेले दर रू. १५,००,४०,४६९/- (पंधरा कोटी चाळीस हजार चारशे एकोणसत्तर फक्त) हे सर्वात न्यूनत्तम (L१) दर असल्याने व उपरोक्त नमूद शासन निर्णयातील नियम ३.१.२.१ व ४.४.३.१ नुसार सदर दर निविदेचे अंदाजित मूल्य रू. १५ कोटीच्या (-) २० टक्के ते (+) १० टक्के या वेतनश्रेणीमध्ये (Price Band) असल्याने सदरचे दर मान्य करून सदर निविदेसाठी M/s. Mahapatra Universal Ltd. Consortium Member Instalogic Solution Pvt. Ltd. यांनी सादर केलेला दर अंतिम करण्याबाबत मा.मंत्री (कामगार) मा. अध्यक्ष यांच्या मान्यतेने प्रस्ताव शासन मान्यतेस्तव सादर करण्यात आलेला आहे. त्यास दिनांक १४.०३.२०२४ रोजीच्या पत्रान्वये मान्यता प्रदान करण्यात आली आहे. सदर मान्यतेच्या अनुषंगाने M/s. Mahapatra Universal Ltd. Consortium Member Instalogic Solution Pvt. Ltd. या संस्थेसोबत करारनामा करून दिनांक १५.०३.२०२४ रोजी पुरवठा आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

ठराव क्र.६० (१०)/२०२४ :-

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांना देण्यात येणाऱ्या विविध सुविधांचे सनियंत्रण करण्यासाठी संगणक प्रणाली (Dashboard) विकसीत करणेबाबत ई-निविदा प्रक्रिया राबवून न्यूनतम निविदाकार मे. महापात्रा युनिवर्सल लि. Consortium Member Instalogic Solution Pvt.Ltd. यांचेसेबत करारनामा करणे व पुरवठा आदेश देण्याबाबत शासन मान्यतेने केलेल्या कार्यवाहीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

पान क्र. ३० पैकी १०१

विषय क्र. ११:- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गतच्या पूर्व शिक्षण प्रशिक्षण (RPL) या प्रशिक्षण कार्यक्रमाकरीता माहिती व तंत्रज्ञान आधारीत विविध कामकाजाकरीता माहिती तंत्रज्ञान संचालनालयाच्या सूचीबद्ध संस्थामधून एका संस्थेची निवड करणेबाबत.

मंडळ सचिव यांनी सादर केले की, मंडळाकडील आयटीविषयक कामकाजाबाबत समन्वयाकरीता ०२ व मंडळाच्या मुख्यालयाकरीता ०२ अशा ०४ सल्लागारांची नेमणूक करण्याचा मंडळाच्या ५६ व्या बैठकीत पारीत करण्यात आलेल्या ठरावाच्या अनुषंगाने सन २०२०-२१ मध्ये शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभागाकडील पॅनलवरील सल्लागार संस्था मे. ग्रँन्ट थॉर्न्टन (Grant Thornton) या संस्थेची नियुक्ती करण्यात आली होती. सदर नियुक्तीचा कालावधी दिनांक २७.११.२०२३ पर्यंत होता.

२. उद्योग,ऊर्जा व कामगार विभागाच्या दिनांक १४.०३.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये बाह्ययंत्रणेकडून कामे करुन घेण्यासाठी ०९ सेवापुरवठादारांच्या पॅनलला मनुष्यबळाच्या वर्गवारीनुसार मनुष्यबळ पुरवठा करण्यासाठी शासन मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दिनांक ०५.०७.२०२३ रोजीच्या पत्रान्वये कामगार विभागाच्या अधिनस्त असलेल्या प्रस्तावनेत नमूद विविध कार्यालयासाठी बाहय यंत्रणेव्दारे मनुष्यबळ घेण्यासाठी मे.एस-२ इन्फोटेक इंटरनॅशनल लि. या संस्थेच्या नियुक्तीस दिनांक १४.०३.२०२३ व दिनांक ०९.०५.२०२३ येथील शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटीच्या अधीन राहून मान्यता देण्यात आली होती. त्यामुळे मंडळाच्या आयटीविषयक कामकाजासाठी नेमण्यात आलेल्या वरील ०४ सल्लागारांच्या सेवा स्वतंत्ररित्या चालू राहतील अथवा कामगार विभागाच्या बाहय यंत्रणेमार्फत मनुष्यबळ पुरवठा करण्यासंदर्भातील उपरोक्त दिनांक १४.०३.२०२३ च्या शासन निर्णयातील तरतूदीनूसार नव्याने नियुक्त्या कराव्या लागतील याबाबत शासनास मार्गदर्शनार्थ प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्याअनुषंगाने माहिती तंत्रज्ञान संचालनालय, दिनांक ०५.१०.२०२३ अन्वये शासन निर्णयातील तरतूदी विचारात घेऊन, मंडळाअंतर्गत माहिती तंत्रज्ञान सल्लागार नियुक्त करण्यासाठी उचित कार्यवाही करण्यात यावी असे निर्देश दिलेले आहे.मंडळाकडील IT Based कामकाजासाठी कामकाज व्याप्ती (Scope of Work) नुसार MBOCW Project Management Unit साठी Principal Consultant ०२ व Senior Consultant ०२ व Recognition of Prior Learning (RPL) Program साठी Senior Consultant ०१ व Associate Consultant ०२ अशी एकुण ०७ मनुष्यबळाच्या सेवा आवश्यक आहेत त्यांचे खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे :-

पान क्र. ३१ पैकी १०१

अ.क्र.	मनुष्यबळ प्रकार	प्रस्तावित आवश्यक संख्या	मासिक वेतन प्रति मुनष्यबळ (रू.)	एका वर्षाचे कालावधीसाठीचा खर्च (रू.)
१	Principal Consultant	०२	४,५४,०००	१,०८,९६,०००
२	Senior Consultant	०३	३,८५,०००	१,३८,६०,०००
३	Associate Consultant	०२	२,८५,०००	६८,४०,०००
	एकुण	०७	**११,२४,०००**	**३,१५,९६,०००**
				(३.१६ कोटी)

३. मंडळाकडील माहिती व तंत्रज्ञान आधारीत विविध कामकाजासाठी संदर्भिय शासन निर्णयातील वैध कालावधीपैकी सन २०२३ ते २०२४ या एका वर्षाच्या कालावधीसाठी आणि तद्नंतर मंडळाचे आवश्यकतेनुसार पुढील वाढीव कालावधीसाठी M/s. Primus Partners Pvt. Ltd. या संस्थेची निवड करणेस व त्यासंबंधीचा खर्च सन २०२३-२४ च्या उपलब्ध प्रशासकीय खर्च निधीतुन करणेस मा. मंत्री (कामगार) तथा मा. अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांनी मान्यता प्रदान केली आहे. सदर मान्यतेच्या अनुषंगाने संबंधित संस्थेच्या निवडीच्या मंजुरीच्या प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला होता त्यास दिनांक ०१.१२.२०२३ रोजीच्या शासन पत्रान्वये मान्यता प्रदान करण्यात आली आहे. सदर मान्यतेच्या M/s. Primus Partners Pvt. Ltd. या संस्थेसोबत करारनामा करून दिनांक १२.०१.२०२४ रोजी पुरवठा आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

ठराव क्र.६० (११)/२०२४ :-

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गतच्या पूर्व शिक्षण प्रशिक्षण (RPL) या प्रशिक्षण कार्यक्रमाकरीता माहिती व तंत्रज्ञान आधारीत विविध कामकाजाकरीता माहिती तंत्रज्ञान संचालनालयाच्या सूचीबद्ध संस्थामधून मे. Primus Partners Pvt. Ltd. यांच्याशी करावयाचा करारनामा व त्यांना द्यावयाच्या कार्यारंभ आदेशाबाबत शासन मान्यतेने केलेल्या कार्यवाहीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

विषय क्र.१२ :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांची प्रचार-प्रसिध्द करणेबाबत २०२२-२०२३ व २०२३-२०२४ चा आराखडा राबविणेबाबत व २०२४-२०२५ चा आराखडा निश्चित करणेबाबत.

मंडळ सचिव यांनी सादर केले की, दिनांक १२.१२.२०२२ रोजी संपन्न बैठकीत बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतणीकरण व विविध कल्याणकारी योजनांचा प्रचार, प्रसिध्दी व जनजागृतीच्या सन २०२२-२०२३ करीता रू.१०० कोटीच्या खर्चास मंडळाने तत्वत: मान्यता प्रदान केली. मंडळाच्या सन २०२३-२४ करीता रक्कम रू.१०० कोटीचा आराखडा तयार करण्यास मान्यता प्रदान केली असा ठराव सर्वानुमते पारीत करण्यात आला. यानुषंगाने मंडळाच्या दिनांक २१.१२.२०२२ रोजीच्या पत्रान्वये सन २०२२-२३ करीता रू.१०० कोटीच्या मर्यादेत सुधारीत प्रचार प्रसिध्दी आराखडा शासन मान्यतेस सादर करण्यात आला.

२. उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दिनांक ०८.०२.२०२३ अन्वये उपरोक्त प्रस्तावित सन २०२२-२३ करीता सुधारीत अंदाजपत्रकातील तरतुदीनुसार रू.१०० कोटीच्या प्रचार प्रसिध्दी व जनजागृतीच्या आराखडयास खालीलप्रमाणे मान्यता देण्यात आलेली आहे.

अ.क्र.	मंडळाकडील बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण व विविध कल्याणकारी योजनांचा प्रसार, प्रसिध्दी व जनजागृतीची माध्यमे	सन २०२२-२३ करीता सुधारीत तरतूद
१	MSRTC Panels	१०.००
२	Hoardings- All types	१५.००
३	Bus Queue Shelters (in Mumbai)	३.००
४	MSRTC announcements at Bus Stands	५.००
५	Documentary Production	४.००
६	Radio Spot & jingle Production	१.००
७	Mobile LED Van for Promotion	१०.००
८	Print Media	१.००
९	TV Media	१.००
१०	Electronic Sign Board	९.००
११	Social Media	१५.००
१२	Radio	१.००
१३	TV Creative Production	६.००
१४	BEST/TMC/NMMC/other Muncipal Corporation Panells	३.००

पान क्र. ३३ पैकी १०१

अ.क्र.	मंडळाकडील बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण व विविध कल्याणकारी योजनांचा प्रसार, प्रसिध्दी व जनजागृतीची माध्यमे	सन २०२२-२३ करीता सुधारीत तरतूद
१५.	Campaigns (Registration and Schemes) कलापथक, पथनाट्य, चित्ररथ	१०.००
१६	Mobile Kiosks	६.००
	एकूण	**१००.००**

३. मंडळाकडील सन २०२२-२३ करीता मंजूर करण्यात आलेल्या रू.१०० कोटी आराखडयापैकी माहिती व जनसंपर्क महासंचालनालय यांचेकडील माध्यम आराखडा नियोजन व अंमलबजावणी समिती यांच्या दिनांक २०.०२.२०२३ रोजीच्या बैठकीमध्ये प्रस्तावित रू.१०० कोटीच्या आराखडयातील DAVP चे दर उपलब्ध असलेल्या बाबीकरीता (Mobile LED Van करीता DAVP दर उपलब्ध नसल्याने सदर बाब वगळून) रू.८९,५३,४२,०००/- इतक्या रक्कमेच्या प्रचार प्रसिध्दी आराखडयास मंडळाची प्रशासकीय व वित्तीय मंजूरी प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यास मान्यता दिली आहे. त्यानुसार मंडळाच्या दिनांक १६.०३.२०२३ रोजीच्या पत्रान्वये माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या बैठकीतील मंजूर बाबीच्या अनुषंगीक रू. ८९,५३,४२,०००/- इतक्या प्रचार प्रसिध्दीबाबीकरीता प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यात आली आहे.सदर माध्यम आराखडा हा वस्तू व सेवा कर वगळून प्रस्तावित करण्याबाबत मा.मंत्री महोदय (कामगार) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांनी मान्यता प्रदान केली आहे.माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाकडील नियोजन व अंमलबजावणी समितीने वेळोवेळी दिलेल्या कार्यादेशानुसार प्रचार प्रसिध्दीच्या बाबीवर खर्च करण्यात आला असून मा. मंत्री (कामगार) मा. अध्यक्ष, मंडळ यांच्या मान्यतेने शिल्लक रक्कमेचे वेळोवेळी पुर्नविनियोजन केले आहे. वेळोवेळी पुर्नविनियोजन करून सदर आराखडयाअंतर्गत मंजूर मूळ तरतूद व वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणा व त्यानुसार करण्यात आलेल्या अंतिम तरतूदीन्वये तयार करण्यात आलेल्या आराखडयाचा तपशिल खालीलप्रमाणे :-

(मंडळाकडील विविध कल्याणकारी योजनाच्या प्रचार प्रसिध्दीसाठी सन २०२२-२३ करीता माहिती व जनसंपर्क संचालनालयामार्फत करण्यात आलेली तरतूद, देण्यात आलेल्या कार्यादेशाचा तपशिल, पुर्नविनियोजन तपशिल व अंतिम करण्यात आलेल्या तरतुदीच्या रक्कमेचा तपशिल)

अ.क्र.	प्रचार प्रसिध्दी बाब/ माध्यम	मुळ तरतुद रक्कम (वस्तू व सेवा कर वगळून)	कार्यादेश रक्कम (वस्तू व सेवा कर वगळून)	पुर्नविनिवियोजनाव्दारे करण्यात आलेली तरतूद	अंतिम तरतूद रक्कम रू.
१	२	३	४	५	६ (४+५)
१	News paper Advertise	३,००,००,०००	०	०	०
२	५ News+ ९ ent. Tv channels (Marathi) as on DAVP List	१,८७,५०,०००	०	०	०
३	Shayadri Doordarshan	९,००,०००	०	०	०
४	Community Radion (approx. २५ to ३० stations across Maharashtra)	१२,००,०००	०	०	०
५	All india Radio	१३,७५,०००	१३,२८,७४७	०	१३,२८,७४७
६	६० FM stations across maharstra	२३,७५,०००	२३,२५,३८७	०	२३,२५,३८७
७	ST stand LED/ LCD screens (old DAVP Rate) All over Maharashtra ८० to ९० screens	११,००,००,०००	१०,८५,४०,०००	६,४६,९९,२००	१७,३२,३९,२००
८	Best wrap/ TMC/ NMMC/ other municipal Corporation panels (As per availblity)	३,००,००,०००	२,९३,२७,९००	३,७४,९०,४००	६,६८,१८,३००
९	MSRTC bus panel (३ side panel)	९,७५,००,०००	९,७४,९१,३००	०	९,७४,९१,३००
१०	लोककला / पथनाटय ऐवजी रोड शो	८,००,००,०००	७,८८,९४,०००	०	७,८८,९४,०००
११	चित्ररथ	४,००,००,०००	३,३४,३२,२०३	०	३,३४,३२,२०३
१२	Private and DGIPR Hoardings (As per availablity)	१५,००,००,०००	११,२४,९८,३६८	०	११,२४,९८,३६८
१३	Mumbai BQS	३,००,००,०००	२,९९,३४,५२०	०	२,९९,३४,५२०
१४	Mobile Kiosks	६,००,००,०००	४,५१,५२,५४२	०	४,५१,५२,५४

पान क्र. ३५ पैकी १०१

अ.क्र.	प्रचार प्रसिध्दी बाब/ माध्यम	मुळ तरतुद रक्कम (वस्तू व सेवा कर वगळून)	कार्यादेश रक्कम (वस्तू व सेवा कर वगळून)	पुर्नविनिवियोजनाव्दारे करण्यात आलेली तरतूद	अंतिम तरतूद रक्कम रू.
					२
१५	ST Stand audio Jingle at १४० ST depots across the state	५,००,००,०००	४,९९,३९,३७२	०	४,९९,३९,३७२
१६	Social Media Campaign for १ Month	५,००,००,०००	४,१८,००,०००	२,०६,९९,०००	६,२४,९९,०००
१७	२२ TVC (४५ to ६० Sec) as per DAVP rate	१,५४,००,०००	१,२८,९०,९७५	०	१,२८,९०,९७५
	२० TVC (४५ to ६० Sec) with Celebrity as per DAVP rate	४,००,००,०००	३,३४,८३,०५१	०	३,३४,८३,०५१
	३० Audio Jingle (६० sec)	१३,५०,०००	११,३०,०५३	०	११,३०,०५३
	मंडळाच्या विविध योजनांवर आधारीत ४ गीताची निर्मिती (१६ ते ६० सेंकद) with celebrity	८०,००,०००	६६,९६,६१०	०	६६,९६,६१०
	४८ Documentary १६ ते ३० मिनिटे	६,००,००,०००	५,०२,२४,५७६	०	५,०२,२४,५७६
	Print Creative-५०	७,५०,०००	५,५०,८४७	०	५,५०,८४७
	Adaptation, Translation, formatting from one media to other media	१०,००,०००	०	०	०
१८	**Feedback Report**				०
१९	शा.नि. दिनांक १३.८.२०२१ नुसार Administrative expenses ४% below ५ Cr and above ५ Cr २% extra on every increasing amt. क्रमप्राप्त	१,६०,४२,०००	१,६०,४२,०००	०	१,६०,४२,०००

पान क्र. ३६ पैकी १०१

अ.क्र.	मंडळाकडील बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण व विविध कल्याणकारी योजनांची प्रचार, प्रसिध्दी व जनजागृती माध्यमे	सन २०२४-२५ करीता तरतूद (रू.कोटी) (वस्तू व सेवाकर वगळून)
२३	Whatsapp/ Chatbox massaging	२.५०
२४	Digital Media	२.५०
२५	Presentation	२.००
२६	Pune BQS	१.००
२७	Mumbai Metro Station Line २ A & ७	५.००
TOTAL		१५०.०० (वस्तू व सेवाकर वगळून)

उपरोक्तप्रमाणे सन २०२४-२५ करीता रक्कम रू. १५०.०० कोटीचा माध्यमनिहाय प्रचार प्रसिध्दीचा आराखडा मा.मंत्री (कामगार) तथा मा.अध्यक्ष यांच्या मान्यतेने शासनास सादर करण्यात आला आहे.

ठराव क्र.६० (१२)/२०२४ :-

१. **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांची प्रचार-प्रसिध्द करणेबाबत २०२२-२०२३ व २०२३-२०२४ चा रू.१००.०० कोटीचा वस्तू व सेवाकर वगळून) प्रचार प्रसिध्दी आराखडा राबविण्याबाबत व मे. ओम एंटरप्रायजेस, मुंबई या संस्थेसोबत केलेला करारनामा व पुरवठा आदेशाबाबत शासन मान्यतेने केलेल्या कार्यवाहीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

२. **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांची प्रचार-प्रसिध्द करणेबाबत २०२४-२०२५ करीता रू.१५०.०० कोटीचा (वस्तू व सेवाकर वगळून) आराखडा राबविण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

विषय क्र.१३ :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या विविध योजनांच्या प्रचार -प्रसिध्दीसाठी सर्वसमावेशक माहिती पुस्तिका तयार करण्याबाबत.

मंडळ सचिव यांनी सादर केले की, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांकरीता विविध प्रकारच्या शैक्षणिक सहाय्य योजना, आर्थिक सहाय्य योजना, सामाजिक सुरक्षा व अन्य योजना व आरोग्य विषयक योजना अशा ३२ कल्याणकारी योजना राबविल्या जातात यानुषंगाने बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण व विविध कल्याणकारी योजनांची माहिती जास्तीत जास्त बांधकाम कामगारांपर्यत पोहचविण्यासाठी मंडळाची 'सर्वमसावेशक माहिती पुस्तीका' तयार करून वितरीत करून वितरीत करणे प्रस्तावित होते.

२. सदर माहितीपुस्तिकाद्वारे बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण व मंडळाच्या विविध कल्याणकारी योजना जास्तीत जास्त बांधकाम कामगारांपर्यंत पोहचविण्यासाठी छपाई करून वितरीत करण्यात येणार आहे. माहे मे २०२३ अखेर मंडळाकडे २५.२४ लक्ष इतक्या बांधकाम कामगारांची नोंदणी झाली असून आगामी काळात मंडळाच्या चालू प्रचार प्रसिध्दी आराखडयाच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे सदर नोंदणी ३० लाखाहून अधिक होण्याची शक्यता आहे. सबब, ३० लाख सर्व समावेशक माहीतीपुस्तीका छपाई करून वितरीत करणे आवश्यक असल्याने मा. अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ यांच्या दिनांक ०४.०५.२०२३ व दिनांक २०.०७.२०२३ रोजीच्या मान्य प्रस्तावन्वये मा. अध्यक्ष, खरेदी समिती यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०१.०९.२०२३ रोजी पार पडलेल्या खरेदी समितीच्या बैठकीमध्ये सदर ई- निविदा अर्जाचे प्रारूप अंतिम करण्यात आले होते.सदर मान्यतेच्या अनुषंगाने मंडळाच्या दिनांक ०८.०५.२०२३ रोजीच्या पत्रान्वये ई-निविदा पध्दतीने सर्वसमावेशक माहितीपुस्तिका छपाईची कार्यवाही करणेसाठीचा प्रस्ताव शासन मान्यतेस्तव सादर करण्यात आला होता.उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दिनांक १२.०५.२०२३ अन्वये मंडळाकडील विविध कल्याणकारी योजनांची माहिती जास्तीत जास्त बांधकाम कामगारांपर्यंत पोहचविण्यासाठी मंडळाची "सर्व समावेशक माहिती पुस्तिका" तयार करून वितरीत करण्यास मान्यता प्रदान केली आहे. सदर मान्यतेनुसार मा. अध्यक्ष, मंडळ यांच्या मान्यतेने मा. कामगार आयुक्त मा. अध्यक्ष ई-निविदा खरेदी समिती यांच्या अध्यक्षतेखाली ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती.सदरच्या ई-निविदा प्रक्रियेत मे. NACOF India Ltd, चेंबुर (पुर्व) मुंबई या निविदाकरांचे दर (L१) इतर निविदाकारांपेक्षा कमी असल्याने मे. NACOF India Ltd, चेंबुर (पुर्व) मुंबई या संस्थेच्या निवडीबाबतचा प्रस्ताव मंडळाच्या दिनांक ०५.०१.२०२४ च्या पत्रान्वये प्रस्ताव शासन मान्यतेस्तव सादर करण्यात आला होता.दरम्यानच्या कालावधीत शासनाच्या दिनांक ११.०१.२०२४ रोजीच्या प्राप्त निर्देशाच्या अनुषंगाने सदर निविदा प्रक्रियेतील न्यूनतम निविदाकरासोबत दर कमी

अ.क्र.	प्रचार प्रसिध्दी बाब/ माध्यम	मुळ तरतुद रक्कम (वस्तू व सेवा कर वगळून)	कार्यादेश रक्कम (वस्तू व सेवा कर वगळून)	पुर्नविनिवियोजनाव्दारे करण्यात आलेली तरतूद	अंतिम तरतूद रक्कम रू.
	एकुण	८९,४६,४२,०००	७५,१६,८२,४५१	१२,२८,८८,६००	८७,४५,७१,०५१
ब.	Mobile LED Van व्दारे ई-निविदेव्दारे प्रचार प्रसिध्दी	१०,५३,५८,०००	९,७९,२०,०००	०	९,७९,२०,०००
	एकुण रक्कम रू.	१,००,००,००,०००	८४,९६,०२,४५१	१२,२८,८८,६००	९७,२४,९१,०५१
क					
१	शेगाव LED/LCD screens (Phase-०१)	०	०	३७,४२,२००	३७,४२,२००
२	शेगाव LED/LCD screens (Phase-०२)	०	०	३७,५४,०८०	३७,५४,०८०
३	Local Cable All Over Maharashtra	०	०	१,९७,००,१००	१,९७,००,१००
	एकुण रक्कम रू.	०	०	२,७१,९६,३८०	२,७१,९६,३८०
	एकुण रक्कम (अ+ब+क)	१,००,००,००,०००	८४,९६,०२,४५१	१५,००,८४,९८०	९९,९६,८७,४३१
	शिल्लक रक्कम				३,१२,५६९

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाकडील नियोजन व अंमलबजावणी समितीच्या विशेष टिपमध्ये "Mobile LED Van माध्यमाव्दारे जाहिरात प्रसिध्द करण्याकरीता DAVP दर उपलब्ध नसून मंडळामार्फत इतर DAVP माध्यमे सुचविण्यात यावी किंवा सदर माध्यमाव्दारे प्रसिध्दी करावयाची असल्यास याबाबत मंडळ स्तरावर निर्णय घेण्यात यावा" असे कळविण्यात आले असल्याने मंडळामार्फत ई-निविदा काढण्यात आली होती सदरच्या निविदा प्रक्रियेत न्युनतम दरधारक मे. ओम एंटरप्रायजेस, मुंबई यांचे दर इतर पुरवठाधारकापेक्षा कमी असल्याने दिनांक ०५.०१.२०२४ च्या पत्रान्वये प्रस्ताव शासन मान्यतेस्तव सादर करण्यात आला होता. दरम्यानच्या कालावधीत शासनाच्या प्राप्त निर्देशाच्या अनुषंगाने सदर निविदा प्रक्रियेतील न्यूनतम निविदाकरासोबत दर कमी करण्याबाबत वाटाघाटी केल्या असता, सदर निविदाधारकाने त्याचे दर प्रति कार्यक्रम रू.६८००/- अधिक १८% वस्तू व सेवाकर असे एकुण ८,०२४/- (सर्व करांसहीत) असे दर कळविले असल्याने अशा सुधारीत दरास शासनाच्या दिनांक २३.०१.२०२४ रोजीच्या पत्रान्वये शासन मान्यता प्रदान केली आहे.सदर शासन मान्यतेस अनुसरून Mobile LED Van व्दारे प्रचार प्रसिध्दीबाबीकरीता ई-निविदा पध्दतीने नियुक्त संस्था मे. ओम एंटरप्रायजेस, मुंबई या संस्थेसोबत दिनांक २५.०१.२०२४ रोजी करारनामा करून कार्यादेश

पान क्र. ३७ पैकी १०१

दिनांक ३१.०१.२०२४ रोजी देण्यात आले आहे.उपरोक्त तक्त्यात नमूदप्रमाणे मंडळ ठराव दिनांक १२.१२.२०२२ व उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग दिनांक ०८.०२.२०२३ अन्वये सन २०२२-२३ च्या १०० कोटी आराखडयाअंतर्गतच्या तरतूदीअन्वये एकुण रक्कम रू. ९९,९६,८७,४३१ (वस्तू व सेवाकर वगळून) मंडळामार्फत प्रचार प्रसिध्दी बाबीवर खर्च करण्यात आला आहे.

मंडळाअंतर्गत बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतणीकरण व लाभ वाटप जलद होण्याच्या हेतुने सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरीता खालीलप्रमाणे माध्यमनिहाय प्रचार, प्रसिध्दी व जनजागृती आराखडा तयार करण्यात आलेला आहे.

अ.क्र.	मंडळाकडील बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण व विविध कल्याणकारी योजनांची प्रचार, प्रसिध्दी व जनजागृती माध्यमे	सन २०२४-२५ करीता तरतूद (रू.कोटी) (वस्तू व सेवाकर वगळून)
१	News Paper Advertise	२.००
२	५ News+ ९ ent.TV Channels (Marathi) as on DAVP List	३.००
३	St stand LED Screen	२०.००
४	Navi Mumbai Muncipal Corporation Wrap	१.००
५	Pune Corporation Wrap	१.००
६	BEST Buses Wrap	७.००
७	MSRTC Bus Panel (३ Side panel)	१०.००
८	Chitrarath	८.००
९	Private and DGIPR Hording (As per availability)	२०.००
१०	Mumbai BQS	१०.००
११	Mobile Kiosks	५.००
१२	ST Stand Audio jingle at १४० ST depots across the state	३.००
१३	Social Media Campaign	४.५०
१४	Mobile LED Van	१२.००
१५	Cable Broadcasting	१०.००
१६	Mumbai Pol Kiosk	८.३५
१७	Central Local Train Audio Jingle	३.००
१८	Solapur BQS	०.१५
१९	Sambhajinagar BQS	०.५०
२०	Mumbai Local Train LED/LCD	३.००
२१	Central Railway Wrap	३.००
२२	Bulk SMS	२.५०

पान क्र. ३८ पैकी १०१

करण्याबाबत वाटाघाटी केल्या असता, सदर निविदाधारकाने त्याचे दर रू.१६६/- प्रति माहिती-पुस्तीका असे कळविल्याने त्या दरास शासनाच्या दिनांक २३.०१.२०२४ अन्वये मान्यता प्रदान करण्यात आली आहे.उपरोक्त शासन मान्यतेनुसार करण्याबाबत मे. NACOF India Ltd (Consortium Member : Akruti Print Solutions Pvt Ltd.) या पुरवठादार संस्थेसोबत "सर्व समावेशक माहिती पुस्तिका" तयार करून वितरीत करण्याबाबत करारनामा प्रारूप, पुरवठा आदेश प्रारूप व जिल्हा स्तरावर वितरण करावयाची सर्व समावेशक माहिती पुस्तीका (Booklet) तपशिल दर्शविणारे प्रपत्र (प्रपत्र - अ) यांस मान्यता प्रदान करण्याबाबत मंडळाच्या दिनांक ०७.०२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये शासन मान्यतेस प्रस्ताव सादर करण्यात आला होता. शासनाच्या १५.०२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये सदर संस्थेसोबत करावयाचा करारनामा व सदर नियुक्त संस्थेस मंडळामार्फत द्यावयाचा पुरवठा आदेशाच्या प्रारूपास शासन मान्यता प्रदान करण्यात आली आहे. त्यानुसार मंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती जास्तीत जास्त बांधकाम कामगारांपर्यत पोहचविण्यासाठी मंडळाची "सर्वसमावेशक माहितीपुस्तीका" तयार करून वितरीत करण्याबाबत सदर संस्थेसोबत दिनांक १६.०२.२०२४ रोजी करारनामा करण्यात आला असून दिनांक १६.०२.२०२४ रोजी पुरवठा आदेश देण्यात आले आहेत.

ठराव ६० क्र. (१३)/२०२४ :-

मंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती जास्तीत जास्त बांधकाम कामगारांपर्यत पोहचविण्यासाठी मंडळाची "सर्वसमावेशक माहितीपुस्तीका" तयार करून वितरीत करणेकरीता ई-निविदा प्रक्रिया राबवून न्यूनतम निविदाकार मे. NACOF India Ltd. (Consortium member Akruti Print Solutions Pvt. Ltd.)यांचेसेबत करारनामा करणे व पुरवठा आदेश देण्याबाबत शासन मान्यतेने केलेल्या कार्यवाहीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

विषय क्र.१४ :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे जमा होणाऱ्या उपकरासंबंधी संगणक प्रणाली विकसीत करणेबाबत.

मंडळ सचिव यांनी सादर केले की, इमारत व इतर बांधकाम आराखडयास मंजूरी देण्यास सक्षम असणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था/ प्राधिकरणे यांनी विविध प्रकल्पांना/ योजनांना/ बांधकामास मंजूरी देताना प्रत्येक प्रकरणात बांधकाम मूल्याच्या (जमिनीचे मूल्य वगळून) किमान १% दराने उपकराची रक्कम Demand Draft/NEFT/RTGS द्वारे मंडळाच्या नावे राष्ट्रीयकृत बँकांच्या खात्यात जमा करण्यात येतात.

२. मंडळाकडे ज़मा होणाऱ्या उपकरासंबंधी संगणक प्रणाली विकसित करण्यासाठी खुल्या ई- निविदेद्वारे प्रक्रिया करण्यास मा. अध्यक्ष तथा मंत्री (कामगार) यांनी मान्यता प्रदान केली आहे. सदर मान्यतेनुसार मंडळामार्फत दिनांक ०५.०२.२०२४ रोजी शासन मान्यतेस्तव प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावास शासन मान्यता प्रदान करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासन वित्त विभागाकडील महसुल जमा करण्यासाठी निर्मित ग्रास (GRAS) प्रणालीच्या धर्तीवर मंडळाकडील कामकाजाच्या व्याप्तीनुसार खालील नमूद उद्दीष्टांकरीता मंडळाची स्वतंत्र संगणक प्रणाली विकसीत करणे प्रस्तावित होते त्या अनुषंगाने खरेदी समितीच्या बैठकीअंती ई-निविदा प्रारूप अर्ज तयार करण्यात आले असून ई-निविदा प्रारूप अर्ज एका राष्ट्रीय वर्तमानपत्रात आणि एका राज्यस्तरीय वर्तमानपत्रात सर्व आवृत्यांमध्ये शासकीय दराने प्रसिध्द करण्यात आले आहे.ई- निविदा प्रक्रियेतील तांत्रीक मुल्यांकनाअंती पात्र ठरलेल्या तीन निविदाकारांचा आर्थिक लिफाफा उघडण्यात आला. आर्थिक मुल्यांकनाचा गोषवारा खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	निविदाकार	सादर केलेले दर (कर वगळून)	शेरा
१	मे. इन्स्टालॉजिक सोल्यूशन प्रा.लि. कन्सॉर्शिअम डाटा लुमिन	१५,१३,७०,०००/-	L१
२	मे. एक्सपोनेशिया. प्रा.लि.	१६,०७,००,२००/-	L१
३	मे. लेगॉझोन टेक्नोलॉजिस प्रा.लि	१६,५१,५०,९४०/-	L३

वरील तुलनात्मक दराच्या तक्त्यानुसार शासन निर्णय उद्योग, उर्जा वकामगार विभाग दिनांक ०१.१२.२०१६ मधील ४.५.२ नुसार मे. इन्स्टालॉजिक सोल्यूशन प्रा.लि. कन्सॉर्शिअम डाटा लुमिन या निविदाकारांनी सादर केलेले दर रू. १५,१३,७०,०००/- (कर वगळून) हे सर्वात न्यूनत्तम (L१) दर आहेत. मे. इन्स्टालॉजिक सोल्यूशन प्रा.लि. कन्सॉर्शिअम डाटा लुमिन या निविदाकारांनी सादर केलेले दर निविदेच्या अंदाजित मूल्य रू. १५,०५,००,९८२/- कोटी (वस्तू व सेवाकर वगळून) पेक्षा जास्त आहे. मे. इन्स्टालॉजिक सोल्यूशन प्रा.लि. कन्सॉर्शिअम डाटा लुमिन यांनी सादर केलेले दर निविदेच्या अंदाजित

खरेदी मूल्य रू. १५,०५,००,९८२/- पेक्षा ०.५८ % ने जास्त (+) आहे व उपरोक्त शासन निर्णयातील नियम क्र.३.१.२.१ व ४.४.३.१ नुसार सादर दर निविदेचे अंदाजित मूल्य रू. १५,०५,००,९८२/- कोटीच्या (-) २० टक्के ते (+) १० टक्के या किंमत श्रेणीमध्ये असल्याने रू. १५,१३,७०,०००/- (वस्तू व सेवाकर वगळून) चे दर मान्य करून मे. इन्स्टालॉजिक सोल्यूशन प्रा.लि. कन्सॉर्शिअम डाटा लुमिन यांनी सादर केलेला दर खरेदी समितीने अंतिम केलेला आहे. सदर दरास मा. मंत्री (कामगार) मा. अध्यक्ष यांनी मान्यता प्रदान केली असून शासन मान्यतेस्तव प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. सदर प्रस्तावास शासनाने दिनांक १४.०३.२०२४ रोजीच्या पत्रान्वये मान्यता प्रदान केली आहे. सदर मान्यतेच्या अनुषंगाने मे. इन्स्टालॉजिक सोल्यूशन प्रा.लि. कन्सॉर्शिअम डाटा लुमिन या संस्थेसोबत करारनामा करून दिनांक १५.०३.२०२४ रोजी कार्यादेश निर्गमित करण्यात आले आहेत.

ठराव क्र.६० (१४)/२०२४ :-

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे जमा होणाऱ्या उपकरासंबंधी संगणक प्रणाली विकसीत करणेकरीता ई-निविदा प्रक्रिया राबवून न्यूनतम निविदाकार मे. इन्स्टालॉजिक सोल्यूशन प्रा.लि. कन्सॉर्शिअम डाटा लुमिन मुंबई यांचेसेबत करारनामा करणे व पुरवठा आदेश देण्याबाबत शासन मान्यतेने केलेल्या कार्यवाहीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

विषय क्र.१५ :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे सन २०२१-२२ चे सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास व सन २०२२-२३ च्या मूळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत.

मंडळ सचिव यांनी सादर केले की, इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम १९९६ मधील कलम २५ नुसार मंडळाने प्रत्येक आर्थिक वर्षांचे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक विहित केलेल्या नमुन्यात तयार करुन केंद्र व राज्य शासनास सादर करणेबाबत तरतूद आहे. त्यानुसार मंडळाने सन २००७-०८ पासून सन २०२०-२१ अखेर आर्थिक वर्षनिहाय मुळ व सुधारीत अंदाजपत्रके तयार करून त्यास वेळोवेळी मंडळाची मान्यता घेतली आहे. सन २०२१-२२ च्या सुधारीत व सन २०२२-२३ च्या मुळ अंदाजपत्रक मा. अध्यक्ष मंडळ यांचे मान्यतेने शासनास सादर केली आहेत.

अ. मंडळाचे सन २०२१-२२ चे सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक

मंडळाचे सन २०२१-२२ या आर्थिक वर्षांचे रू. १९५३.३० कोटी जमेचे व रू. १६११.५८ कोटी एवढया खर्चाच्या मुळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास मंडळाच्या दिनांक ०२.०३.२०२१ रोजीच्या बैठकीत मान्यता प्रदान करण्यात आली होती. मंडळ मान्यतेनंतर सदर अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक शासनास सादर करण्यात आले होते.

शासनास सादर करण्यात आलेल्या सन २०२१-२२ च्या मुळ अंदाजपत्रकाच्या अनुषंगाने, माहे नोव्हें.,२०२१ अखेर आठमाही प्रत्यक्ष जमा व खर्चावर आधारीत उर्वरीत चारमाही करीता संभाव्य जमा व खर्चाच्या आधारे सन २०२१-२२ चे रू. २५२६.१९ कोटी जमा व रू. १८६९.९८ कोटी खर्चाचे सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. (प्रत संलग्न) त्यास मंडळाच्या दिनांक ०४.०२.२०२२ रोजीच्या प्रस्तावानुसार, मा. अध्यक्ष, मंडळ यांची मान्यता प्राप्त झाली आहे.

सन २०२१-२२ चे सुधारित अंदाजपत्रकाचा गोषवारा पुढीलप्रमाणे-

सुधारित अंदाजपत्रक जमेचा गोषवारा (रु. कोटीत)

अ.क्र.	बाब (जमा)	मूळ अंदाजपत्रक सन २०२१-२२	माहे एप्रिल २०२१ ते नोव्हें., २०२१ ची प्रत्यक्ष जमा	माहे डिसें. २०२१ ते मार्च २०२२ ची अंदाजित जमा	सन २०२१-२२ मधील जमेचे सुधारित अंदाज
१	२	३	४	५	६(४+५)
१	उपकर	१५५०.००	१३७३.८४	७२६.१६	२१००.००
२	बँकेतील बचत व मुदत	३६८.००	२७४.७७	१४५.५१	४२०.२८

पान क्र. ४४ पैकी १०१

	ठेवीवरील व्याज				
३	बांधकाम कामगार नोंदणी फी	१.२५	१.३१	०.६५	१.९४
४.	बांधकाम कामगार मासिक वर्गणी	१.२०	०.६५	०.३२	०.९७
५.	मध्यान्ह भोजन बांधकाम कामगार हिस्सा (रू.०५/- प्रमाणे)	३२.८५	०.००	३.००	३.००
	एकूण जमा	**१९५३.३०**	**१६५०.५७**	**८७५.६४**	**२५२६.१९**

सुधारित अंदाजपत्रक खर्चाचा गोषवारा

(रु. कोटीत)

अ.क्र	बाब (खर्च)	अर्पेक्षित खर्च	माहे एप्रिल २०२१ ते नोव्हें., २०२१ चा प्रत्यक्ष खर्च	माहे डिसें. २०२१ ते मार्च २०२२ चा अंदाजित खर्च	सन २०२१-२२ मधील खर्चाचे सुधारित अंदाज खर्च
अ.	विविध कल्याणकारी योजनांवरील खर्च	१०४८.००	८३३.५१	९५९.२३	१७९२.७४
ब.	प्रस्तावित योजना	५१०.००	०.००	१०.००	१०.००
क.	प्रशासकिय खर्च	३६.०८	२५.८३	३५.५६	६१.३९
ड	उपकर परतावा	१७.५०	२.३५	३.५०	५.८५
	एकूण खर्च	**१६११.५८**	**८६१.६९**	**१००८.२९**	**१८६९.९८**

ब. सन २०२२-२३ चे मूळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक

इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम १९९६ मधील कलम २५ नुसार, मंडळाचे सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाचे रू. २८१६.५० कोटी जमा व रू. १८८०.४१ कोटी खर्चाचे मूळ अर्थसंल्पीय अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. मा. अध्यक्ष महोदय यांच्या मंजूरीनुसार आणि मंडळाचे पत्र दिनांक १६.०२.२०२२ अन्वये सदर अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक शासनास सादर करण्यात आले आहे.

सन २०२२-२३ चे मूळ अंदाजपत्रकाचा गोषवारा खालीलप्रमाणे-

सन २०२२-२३ मधील जमा व खर्चाचा गोषवारा

(रूपये कोटीत)

अ.क्र.	बाब (जमा)	अपेक्षित जमा	बाब (खर्च)	अपेक्षित खर्च
१	उपकर	२३१०.००	विविध कल्याणकारी योजनांवरील खर्च	१५९६.१०
२	बँकेतील मुदतठेवीवरील व्याज	४६२.००	प्रस्तावित योजना	२१०.००
३	नोंदणी फी	२.१३	प्रशासकिय खर्च	४५.२६
४	मासिक वर्गणी	१.२६	उपकर जमा रक्कमेपोटी देय प्रशासकीय खर्चाची (१%) तरतूद	२१.३०
५	मध्यान्ह भोजन लाभ शुल्क	४१.०६	नजर चुकीने/ अनावधानाने जमा रक्कमेचा परतावा	५.००
६	इतर जमा	०.०५	इतर खर्च	२.७५
	एकूण जमा	**२८१६.५०**	**एकूण खर्च**	**१८८०.४१**

ठराव क्र.६० (१५)/२०२४ :-

मंडळाच्या सन २०२१-२२ चे रू. २५२६.१९ कोटी जमा व रू. १८६९.९८ कोटी खर्चाचे सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक मा. अध्यक्ष, मंडळ यांचे मान्यतेस सादर केला आहे अशा सन २०२१-२२ च्या सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास मान्यता व मंडळाच्या सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाचे रू. २८१६.५० कोटी जमा व रू. १८८०.४१ कोटी रक्कमेच्या मुळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास मंडळाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

विषय क्र.१६ :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे सन २०२२-२३ चे सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास व सन २०२३-२४ च्या मूळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत.

बांधकाम कामगार (रोजगार विनियमन व सेवाशर्ती) केंद्रीय नियम, १९९८ पारित केले आहेत. त्यास अनुसरुन इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार विनियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ च्या अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार विनियमन व सेवाशर्ती) नियम, २००७ प्रसारीत करण्यात आलेले आहेत. उक्त अधिनियमाच्या कलम १८ अन्वये राज्यात महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची स्थापना करण्यात आली आहे.

राज्यातील इमारत व इतर बांधकाम क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या कामगारांची मंडळामार्फत नोंदणी करण्यात येत असून त्यांना मंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांचे लाभ दिले जातात. त्यास अनुसरुन महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांतर्गत राज्यातील नोंदीत सक्रिय (जिवित) बांधकाम कामगारांकरीता सुरक्षा संच (Safety Kit) पुरविणे या योजनेस संदर्भाधीन क्र.५ येथील शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली होती.

मंडळांतर्गत बांधकाम कामगारांकरीता सुरक्षा संच वाटप ही यापूर्वी सुरु असलेली योजना शासनाच्या संदर्भाधीन क्र.६ च्या पत्रान्वये संपुष्टात आली आहे. तद्नंतर मंडळांतर्गत नोंदीत सक्रिय (जिवित) बांधकाम कामगारांना वितरीत करावयाच्या सुधारित सुरक्षा संच योजना सुरु करण्यास मंडळाच्या दिनांक २६.०३.२०२५ रोजीच्या बैठकीत ठराव पारित करण्यात आला आहे. तसेच महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाने नोंदणीकृत बांधकाम कामगारांकरीता सुधारित सुरक्षा संच (Safety Kit) वाटपासाठी तांत्रिक समिती गठीत करण्याबाबत संदर्भ क्र.८ येथील पत्रान्वये शासनास प्रस्ताव सादर केला होता. त्यास अनुसरुन शासनाच्या संदर्भ क्र.९ च्या पत्रान्वये मंडळाकडील नोंदणीकृत बांधकाम कामगारांकरीता सुधारित सुरक्षा संच (Safety Kit) वाटपासाठी सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली तांत्रिक समिती गठीत केली आहे.

त्यानुषंगाने सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांनी संदर्भ क्र.१० च्या पत्रान्वये मंडळाने बांधकाम कामगारांकरीता सुधारित सुरक्षा संच (Safety Kit) वितरण योजनेबाबत केलेला ठराव आणि मंडळाकडील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांकरीता वितरीत करावयाच्या सुधारित सुरक्षा संच (Safety Kit) पुरवठा योजनेस मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदीत सक्रिय (जिवित) बांधकाम कामगारांना सुरक्षा संच (Safety Kit) पुरविणे या सुधारित योजनेस प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याबाबत शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे:-

शासन निर्णय :-

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदीत सक्रिय (जिवित) बांधकाम कामगारांना सुरक्षा संच (Safety Kit) पुरविणे या सुधारित योजनेस खालील अटींच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

<u>योजनेच्या अटी व शर्ती:-</u>

१. मंडळाकडील नोंदीत सक्रिय (जिवित) बांधकाम कामगार या योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र राहतील. या पात्रताधारक कामगारांनी विहित नमुन्यातील मागणी अर्ज प्राधिकृत प्रभारी कामगार उपायुक्त/सहायक कामगार आयुक्त/सरकारी कामगार अधिकारी, जिल्हा कामगार सुविधा केंद्र (सर्व) यांच्याकडे भरुन दिल्यानंतर त्यांना सुरक्षा संच (Safety Kit) पुरविण्यात यावे.

२. पात्र बांधकाम कामगारांना पुरवावयाच्या सुरक्षा संच (Safety Kit) मध्ये खालील वस्तूंचा समावेश असावा.

(१) सुरक्षा हार्नेस बेल्ट (Safety Harness), (२) सुरक्षा बुट (Safety Shoes), (३) कानासाठी सुरक्षा प्लग (Ear Plug), (४) मुखपट्टी (Mask), (५) रिफ्लेक्टीव्ह जॅकेट (Reflective Jacket), (६) शिरस्त्राण (Helmet), (७) सुरक्षा हातमोजे (Safety Gloves), (८) सुरक्षा गॉगल (Safety Goggles), (९) मच्छरदाणी (Mosquito Net), (१०) पाण्याची बाटली (Water Bottle), (११) स्टीलचा जेवणाचा डब्बा (Steel Tiffin Box), (१२) सौर टॉर्च (Solar Torch), (१३) प्रवासी बॅग (Travel Kit Bag)

३. मंडळांतर्गत नोंदीत सक्रिय (जिवित) बांधकाम कामगारांना सुरक्षा संच (Safety Kit) पुरविण्याबाबत ई-निविदा पध्दतीने प्रक्रिया राबविण्यास शासन मान्यता प्रदान करण्यात येत आहे. त्याकरीताच्या ई-निविदा प्रक्रियेअंती नोंदणीकृत, नामांकीत व अनुभवी संस्थेच्या निवडीबाबतचा प्रस्ताव मंडळाने शासनास सादर करावा. तसेच, या संपूर्ण प्रक्रियेकरीता उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दिनांक १.१२.२०१६ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदींचे काटेकोर पालन करण्यात यावे.

४. नोंदणीकृत बांधकाम कामगारांना वितरीत करण्यात येणाऱ्या सुधारित सुरक्षा संच (Safety Kit) मधील वस्तूंचे दर, पुरवठा, वाहतूक, वितरण व सर्व करांसह निश्चित करण्यात यावे.

५. सुरक्षा संच (Safety Kit) च्या निविदा स्विकृत करण्यापूर्वी सुरक्षा संच (Safety Kit) मधील वस्तूंच्या दर्जाची शासनमान्य प्रयोग शाळेकडून तपासणी व खात्री करून घ्यावी व तसे प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतरच अशा वस्तूंची पात्र लाभार्थ्यास वितरणाची कार्यवाही करावी.

६. प्रभारी कामगार उपायुक्त/सहायक कामगार आयुक्त/सरकारी कामगार अधिकारी, जिल्हा कामगार सुविधा केंद्र (सर्व) यांनी रितसर प्रमाणित केलेल्या पात्र नोंदीत बांधकाम कामगारांच्या यादीनुसारच विहीत मुदतीचे आत सुरक्षा संच (Safety Kit) चा पुरवठा करण्यात यावा.

७. पात्र बांधकाम कामगारांना सुरक्षा संच (Safety Kit) प्राप्त झाल्याचे प्रभारी सहायक कामगार आयुक्त/सरकारी कामगार अधिकारी, जिल्हा कामगार सुविधा केंद्र (सर्व) यांनी खात्री करावी व पुरवठा केल्याची पोचपावती प्रभारी अपर कामगार आयुक्त/ कामगार उपायुक्त/प्रादेशिक कार्यकारी अधिकारी (विभाग स्तर) यांना सादर करावी. प्रभारी अपर कामगार आयुक्त/ कामगार उपायुक्त/प्रादेशिक कार्यकारी अधिकारी (विभाग स्तर) यांनी अशा सर्व लाभार्थ्यांचे साहित्य प्राप्त

झाल्याबाबतच्या पोचपावत्या पाहून खात्री करुन त्याबाबतचा अहवाल देयकाची अदायगी करण्याच्या प्रमाणपत्रासह महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांना सादर करावा व महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाने सदरहू अहवाल व त्याबाबतचे देयक अदायगी करण्याचे प्रमाणपत्र तपासून त्याबाबतची खात्री झाल्यानंतर पुरवठादाराची देयके नियमानुसार प्रदान करावीत.

८. नोंदणीकृत बांधकाम कामगारांना वितरीत करण्यात येणाऱ्या सुरक्षा संच (Safety Kit) पुरवठयाचा खर्च मंडळाकडील जमा उपकर निधीतून भागविण्यात यावा.

९. सदर योजनेची परिणामकारक अंमलबजावणी व देखरेखीचे काम सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांनी पहावे.

१०. पात्र बांधकाम कामगारांना सुरक्षा संच (Safety Kit) पुरवठा करण्याची कार्यवाही महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाने निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करावी. उक्त कालावधी वाढविण्यास मान्यता देण्याबाबतचे सर्वस्वी अधिकार शासनास राहतील.

सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून, त्याचा संगणक संकेतांक २०२५०६१८१५३६१०५११० असा आहे. तसेच सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

DEEPAK UTTAMRAO POKALE

Digitally signed by DEEPAK UTTAMRAO POKALE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=INDUSTRIES ENERGY AND LABOUR DEPARTMENT, 2.5.4.20=856b31c793b12e4f22cb247c5cff7f3358867f2482aa2234f6131bf8940dbd2e, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=F4163205E7B4960CC7CA6F973D6DEB06502B2E8FC47A411BABCF42A0E99CF34B, cn=DEEPAK UTTAMRAO POKALE
Date: 2025.06.18 15:37:09 +05'30'

(दिपक पोकळे)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१. मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, राजभवन, मुंबई.
२. मा.सभापती, महाराषट्र विधानपरिषद, विधानमंडळ, मुंबई.
३. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा , विधानमंडळ, मुंबई.
४. सर्व विधीमंडळ सदस्य
५. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. प्रधान सचिव, विधानमंडळ, मुंबई.
७. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालयीन विभाग, मंत्रालय,मुंबई.
८. मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
९. मा. उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
१०. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे उपसचिव, मुंबई.
११. विकास आयुक्त, असंघटीत कामगार, मुंबई.

१२. कामगार आयुक्त , महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१३. मा. मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव, मंत्रलय, मुंबई.
१४. सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१५. सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराषट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई.
१६. निवड नस्ती.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदीत पात्र बांधकाम कामगारांना अत्यावश्यक संच (Essential kit) पुरविण्याच्या सुधारित योजनेस शासन मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन

उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग

शासन निर्णय क्रमांक: इबांका-०६२५/प्र.क्र.८४/कामगार-७

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १८ जून, २०२५

वाचा-

१. इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६

२. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) नियम, २००७

३. उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र.भांखस-२०१४/प्र.क्र.८२ भाग III/ उद्योग-४, दिनांक ०१.१२.२०१६

४. नियोजन विभाग शासन निर्णय डिसीटी २३१६/प्र.क्र.१३३/का.१४१७ दिनांक ०५.१२.२०१६ व दिनांक ०३.३.२०१७

५. उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र.इबांका-२०१७/प्र.क्र.४८३/ काम-७, दिनांक २२.११.२०१७

६. शासन पत्र क्र.इबांका-२०२१/प्र.क्र.८४/कामगार-७, दिनांक ०१.१०.२०२४

७. मंडळ बैठक दि.२६.०३.२०२५ रोजीचा ठराव क्र. ६२ (१९)/२०२५

८. मंडळ कार्यालयाचे पत्र क्र.७३३-अ/२०२५, संचवा-२०२५/प्र.क्र.३९/ योजना-०४, दिनांक ०२.०४.२०२५

९. शासन पत्र क्र.इबांका-०४२५/प्र.क्र.४९/काम-७, दिनांक ०८.०४.२०२५

१०. मंडळ कार्यालयाचे पत्र क्र.११९७/२०२५ संचवा-२०२५/प्र.क्र.३९/ योजना-०४ दि.१२.०६.२०२५

प्रस्तावना :-

इमारत व इतर बांधकाम क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांच्या रोजगाराचे व सेवाशर्तींचे नियमन करण्यासाठी तसेच बांधकाम कामगारांची सुरक्षा, आरोग्य आणि त्यांच्याकरीता कल्याणकारी उपाययोजना करण्यासाठी केंद्र शासनाने इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार विनियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ लागू केला आहे. इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती नियमन) अधिनियम, १९९६ मार्फत बांधकाम कामगारांची सुरक्षा, आरोग्य व कल्याणकारी योजना यांची अंमलबजावणी केली जाते. उक्त अधिनियमाच्या अनुषंगाने केंद्र शासनाने इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार विनियमन व सेवाशर्ती) केंद्रीय नियम, १९९८ पारित केले आहेत. त्यास अनुसरुन इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार विनियमन व सेवाशर्ती) अधिनियम,

१९९६ च्या अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार विनियमन व सेवाशर्ती) नियम, २००७ प्रसारीत करण्यात आलेले आहेत. उक्त अधिनियमाच्या कलम १८ अन्वये राज्यात महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची स्थापना करण्यात आली आहे.

राज्यातील इमारत व इतर बांधकाम क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या कामगारांची मंडळामार्फत नोंदणी करण्यात येत असून त्यांना मंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांचे लाभ दिले जातात. त्यास अनुसरुन महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांतर्गत राज्यातील नोंदीत सक्रिय (जिवित) बांधकाम कामगारांकरीता अत्यावश्यक संच (Essential Kit) पुरविणे या योजनेस संदर्भाधीन क्र.५ येथील शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली होती.

मंडळांतर्गत बांधकाम कामगारांकरीता अत्यावश्यक संच वाटप ही यापूर्वी सुरु असलेली योजना शासनाच्या संदर्भाधीन क्र.६ च्या पत्रान्वये संपुष्टात आली आहे. तद्नंतर मंडळांतर्गत नोंदीत सक्रिय (जिवित) बांधकाम कामगारांना वितरीत करावयाच्या सुधारित अत्यावश्यक संच योजना सुरु करण्यास मंडळाच्या दिनांक २६.०३.२०२५ रोजीच्या बैठकीत ठराव पारित करण्यात आला आहे. तसेच महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाने नोंदणीकृत बांधकाम कामगारांकरीता सुधारित अत्यावश्यक संच (Essential Kit) वाटपासाठी तांत्रिक समिती गठीत करण्याबाबत संदर्भ क्र.८ येथील पत्रान्वये शासनास प्रस्ताव सादर केला होता. त्यास अनुसरुन शासनाच्या संदर्भ क्र.९ च्या पत्रान्वये मंडळाकडील नोंदणीकृत बांधकाम कामगारांकरीता सुधारित अत्यावश्यक संच (Essential Kit) वाटपासाठी सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली तांत्रिक समिती गठीत केली आहे.

त्यानुषंगाने सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांनी संदर्भ क्र.१० च्या पत्रान्वये मंडळाने बांधकाम कामगारांकरीता सुधारित अत्यावश्यक संच वितरण योजनेबाबत केलेला ठराव आणि मंडळाकडील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांकरीता वितरीत करावयाच्या सुधारित अत्यावश्यक संच पुरवठा योजनेस मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदीत सक्रिय (जिवित) बांधकाम कामगारांना अत्यावश्यक संच पुरविणे या सुधारित योजनेस प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याबाबत शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे:-

शासन निर्णय :-

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदीत सक्रिय (जिवित) बांधकाम कामगारांना अत्यावश्यक संच (Essential Kit) पुरविणे या सुधारित योजनेस खालील अटींच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

योजनेच्या अटी व शर्ती:-

१. मंडळाकडील नोंदीत सक्रिय (जिवित) बांधकाम कामगार या योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र राहतील. या पात्रताधारक कामगारांनी विहित नमुन्यातील मागणी अर्ज प्रभारी कामगार उपायुक्त/ सहायक कामगार आयुक्त/सरकारी कामगार अधिकारी, जिल्हा कामगार सुविधा केंद्र (सर्व) यांच्याकडे भरुन दिल्यानंतर त्यांना अत्यावश्यक संच (Essential Kit) पुरविण्यात यावे.

२. मंडळांतर्गत पात्र बांधकाम कामगारांना पुरवावयाच्या अत्यावश्यक वस्तू संच (Essential Kit) मध्ये खालील वस्तूंचा समावेश असावा.

(1) पत्र्याची पेटी (Galvanized Trunk), (२) प्लास्टिकची चटई (Plastic Mat), (३) धान्य साठवण कोठी (क्षमता २५ किलो) (Grain Storage Tank) (Capacity 25 Kg), (४) धान्य साठवण कोठी (क्षमता २२ किलो) (Grain Storage Tank) (Capacity 22 Kg), (५) बेडशीट (Bedsheet), (६) चादर (Chaddar), (७) ब्लँकेट (Blanket), (८) साखर ठेवण्यासाठीचा डबा (क्षमता १ किलो) (एसएस २०२) (Sugar Container) (1 Kg) (SS 202), (९) चहा पावडर ठेवण्यासाठीचा डबा (क्षमता ५०० ग्रॅम) (एसएस २०२) (Tea Container) (500 gram) (SS 202), (१०) वॉटर प्युरिफायर (१८ लिटर) (Water Purifier) (18 ltr) (SS 202) with 2 Candle.

३. मंडळांतर्गत नोंदीत सक्रिय (जिवित) बांधकाम कामगारांना अत्यावश्यक संच (Essential Kit) पुरविण्याबाबत ई-निविदा पध्दतीने प्रक्रिया राबविण्यास शासन मान्यता प्रदान करण्यात येत आहे. त्याकरीताच्या ई-निविदा प्रक्रियेअंती नोंदणीकृत, नामांकीत व अनुभवी संस्थेच्या निवडीबाबतचा प्रस्ताव मंडळाने शासनास सादर करावा. तसेच, या संपूर्ण प्रक्रियेकरीता उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दिनांक १.१२.२०१६ रोजीचा शासन निर्णय व त्यामध्ये वेळोवेळी केलेल्या सुधारणांमधील तरतूदींचे काटेकोर पालन करण्यात यावे.

४. नोंदणीकृत बांधकाम कामगारांना वितरीत करण्यात येणाऱ्या सुधारित अत्यावश्यक संच (Essential Kit) मधील वस्तूंचे दर, पुरवठा, वाहतूक, वितरण व सर्व करांसह निश्चित करण्यात यावे.

५. अत्यावश्यक संच (Essential Kit) च्या निविदा स्विकृत करण्यापूर्वी अत्यावश्यक संच (Essential Kit) मधील वस्तूंच्या दर्जाची शासनमान्य प्रयोगशाळेकडून तपासणी व खात्री करून घ्यावी व तसे प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतरच अशा वस्तूंची पात्र लाभार्थ्यास वितरणाची कार्यवाही करावी.

६. प्रभारी कामगार उपायुक्त/सहायक कामगार आयुक्त/सरकारी कामगार अधिकारी, जिल्हा कामगार सुविधा केंद्र (सर्व) यांनी रितसर प्रमाणित केलेल्या पात्र नोंदीत बांधकाम कामगारांच्या यादीनुसारच विहीत मुदतीत अत्यावश्यक संच (Essential Kit) चा पुरवठा पात्र लाभार्थ्यांना करण्यात यावा.

७. पात्र बांधकाम कामगारांना अत्यावश्यक संच (Essential Kit) प्राप्त झाल्याचे प्रभारी सहायक कामगार आयुक्त/सरकारी कामगार अधिकारी, जिल्हा कामगार सुविधा केंद्र (सर्व) यांनी खात्री करावी व पुरवठा केल्याची पोचपावती प्रभारी अपर कामगार आयुक्त/ कामगार उपायुक्त/प्रादेशिक

कार्यकारी अधिकारी (विभाग स्तर) यांना सादर करावी. प्रभारी अपर कामगार आयुक्त/ कामगार उपायुक्त/प्रादेशिक कार्यकारी अधिकारी (विभाग स्तर) यांनी अशा सर्व लाभार्थ्यांचे साहित्य प्राप्त झाल्याबाबतच्या पोचपावत्या तपासून/खात्री करुन त्याबाबतचा अहवाल देयकाची अदायगी करण्याच्या प्रमाणपत्रासह महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांना सादर करावा. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाने सदरहू अहवाल व त्याबाबतचे देयक अदायगी करण्याचे प्रमाणपत्र तपासून, त्याबाबतची खात्री झाल्यानंतर पुरवठादाराची देयके नियमानुसार प्रदान करावीत.

८. नोंदणीकृत बांधकाम कामगारांना वितरीत करण्यात येणाऱ्या अत्यावश्यक संच (Essential Kit) पुरवठयाचा खर्च मंडळाकडील जमा उपकर निधीतून भागविण्यात यावा.

९. सदर योजनेची परिणामकारक अंमलबजावणी व देखरेखीचे काम सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांनी पहावे.

१०. पात्र बांधकाम कामगारांना अत्यावश्यक संच (Essential Kit) पुरवठा करण्याची कार्यवाही महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाने निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करावी. उक्त कालावधी वाढविण्यास मान्यता देण्याबाबतचे सर्वस्वी अधिकार शासनास राहतील.

सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून, त्याचा संगणक संकेतांक २०२५०६१८१५३१३८९३१० असा आहे. तसेच सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

DEEPAK UTTAMRAO POKALE

Digitally signed by DEEPAK UTTAMRAO POKALE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=INDUSTRIES ENERGY AND LABOUR DEPARTMENT, 2.5.4.20=856b31c793b12e4f22cb247c5cff7f3358867f2482aa2234f6131bf8940dbd2e, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=F4163205E7B4960CC7CA6F973D6DEB06502B2E8FC47A411BABCF42A0E99CF34B, cn=DEEPAK UTTAMRAO POKALE
Date: 2025.06.18 15:34:42 +05'30'

(दिपक पोकळे)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१. मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, राजभवन, मुंबई.
२. मा.सभापती, महाराषट्र विधानपरिषद, विधानमंडळ, मुंबई.
३. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा , विधानमंडळ, मुंबई.
४. सर्व विधीमंडळ सदस्य
५. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. प्रधान सचिव, विधानमंडळ, मुंबई.
७. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालयीन विभाग, मंत्रालय,मुंबई.
८. मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
९. मा. उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.

१०. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे उपसचिव, मुंबई.
११. विकास आयुक्त, असंघटीत कामगार, मुंबई.
१२. कामगार आयुक्त , महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१३. मा. मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव, मंत्रलय, मुंबई.
१४. सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१५. सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराषट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई.
१६. निवड नस्ती.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई अंतर्गत नोंदित बांधकाम कामगारांना लागू करण्यात आलेल्या निवृत्तीवेतन योजनेची सविस्तर कार्यपद्धती (SOP-Standard Operating Procedure) विहीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग
शासन निर्णय क्रमांक:- इबांका-०३२५/प्र.क्र.४५/कामगार-७
मंत्रालय मुंबई - ४०० ०३२
दिनांक: १९ जून, २०२५.

संदर्भ:-

१. केंद्रिय श्रम व रोजगार मंत्रालयाचे पत्र क्रमांक झेड-२००१२/०९/२०१८-बी.एल., दिनांक २५ सप्टेंबर,२०१८.

२. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांची बैठक क्र. ६२, दिनांक २६ मार्च, २०२५ मधील ठराव क्र.०२

३. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांचे पत्र क्रमांक ६९५/२०२५/पेन्शन-२०२५/प्र.क्र.१०७/योजना-०६, दिनांक २७ मार्च,२०२५.

४. शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, क्र.इबांका-०३२५/प्र.क्र.४५/ कामगार-७, दि.२८.०३.२०२५

५. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांचे पत्र क्रमांक ११२६/२०२५/पेन्शन-२०२५/प्र.क्र.१०७/योजना-०६, दिनांक ०३ जून,२०२५.

प्रस्तावना : -

इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ च्या कलम (२२) (ब) मध्ये वयाची ६० वर्षे पुर्ण झालेल्या मंडळाकडील नोंदित बांधकाम कामगारांना निवृत्तीवेतन देण्याची तरतूद आहे. याबाबत केंद्र शासनाने विषद केलेल्या आदर्श कल्याणकारी योजनांचे मार्गदर्शक तत्वांच्या अनुषंगाने संदर्भाधीन दिनांक २८.०३.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंडळाकडील नोंदित बांधकाम कामगारांना त्यांच्या वयाची ६० वर्षे पूर्ण झाल्यानंतर त्यांना निवृत्तीवेतन लागू करण्यास मान्यता देण्यात आली आहे. उक्त शासन निर्णयातील परिच्छेद ४ (घ) मध्ये प्रस्तुत योजनेबाबत आवश्यकतेनुसार सविस्तर कार्यपद्धती निश्चित करण्याबाबत नमूद करण्यात आले होते. त्यानुषंगाने मंडळांतर्गत नोंदीत बांधकाम कामगारांना लागू करण्यात आलेल्या निवृत्तीवेतन योजनेबाबत सविस्तर कार्यपद्धती SOP (Standard Operating Procedure) विहीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई अंतर्गत नोंदित बांधकाम कामगारांनी त्यांच्या वयाची ६० वर्षे पूर्ण झाल्यानंतर लागू करण्यात आलेल्या निवृत्तीवेतन योजनच्या सविस्तर कार्यपद्धतीस या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे. त्यास अनुसरुन मंडळांतर्गत नोंदीत बांधकाम कामगारांना लागू करण्यात आलेल्या निवृत्तीवेतन योजनेची सविस्तर कार्यपद्धती (SOP) पुढीलप्रमाणे विहित करणेत येत आहे.

१. निवृत्तीवेतन योजनेचे पात्रता निकष :-

(अ) वयाची ६० वर्षे पुर्ण केलेली व मंडळाकडे सलग किमान १० वर्ष नोंदित असलेले सर्व बांधकाम कामगार सदर योजनेअंतर्गत पात्र राहतील. तसेच त्याच्या कुटुंबातील पती व पत्नी दोघेही बांधकाम कामगार असतील तर ते स्वतंत्रपणे पात्र राहतील.

(ब) पती/पत्नी च्या मृत्यूनंतर संबधित बांधकाम कामगाराचे पती/पत्नी निवृत्तीवेतनाकरिता पात्र राहतील. तथापि, पती/पत्नी सदर योजनेअंतर्गत निवृत्तीवेतन मिळत असेल तर संबधितास दुबार निवृत्तीवेतनाचा लाभ मिळणार नाही.

(क) केंद्र शासनाच्या आदर्श कल्याणकारी योजनांच्या मार्गदर्शक तत्वानुसार, कर्मचारी राज्य विमा कायदा, १९४८ (Employees State Insurance Act, १९४८) व कर्मचाऱ्यांचे प्रदाता निधी आणि विविध तरतूदी कायदा, १९५२ (The Employees Provident Fund and Miscellaneous Provision Act, १९५२) अंतर्गत लाभ प्राप्त करणारे बांधकाम कामगार निवृत्तीवेतनास पात्र राहणार नाहीत.

२. निवृत्तीवेतनाचे निकष आणि प्रमाण/दर :-

(अ) मंडळाकडे नोंदित पात्र बांधकाम कामगारांना त्यांच्या मंडळाकडील नोंदणीच्या कालावधीनुसार निवृत्तीवेतन अदा करण्यात येईल.

(ब) मंडळाकडे नोंदणी असलेल्या वर्षानुसार निवृत्तीवेतनाचे प्रमाण/दर खालीलप्रमाणे राहील :-

अ.क्र.	मंडळाकडे नोंदणीची एकूण वर्षे	दरवर्षी मिळणारे निवृत्तीवेतन (रू.)
१	१० वर्षे	५०% (रू.६,०००/-)
२	१५ वर्षे	७५%(रू.९,०००/-)
३	२० वर्षे	१००% (रू.१२,०००/-)

(क) मंडळाकडे जमा होणाऱ्या कामगार उपकराचा वेळोवेळी आढावा घेवून, सदर योजनेअंतर्गत देय निवृत्तीवेतनामध्ये कमी अथवा वाढ करणे, अटी व शर्तींमध्ये बदल करणे याबाबत निर्णय मंडळ मान्यतेअंती शासन स्तरावर घेतला जाईल.

३. निवृत्तीवेतन लाभ मंजूर करण्याची कार्यपद्धती :-

(अ) सदर योजनेअंतर्गत पात्र ठरणाऱ्या मंडळाकडे नोंदित बांधकाम कामगाराने https://mahabocw.in/ या मंडळ अधिकृत संकेतस्थळावरील विहित नमुना अर्ज विनामूल्य प्राप्त (Download) करून घ्यावा. (अर्जाचा नमूना "**प्रपत्र-अ**" प्रमाणे)

(ब) सदरचा अर्ज पूर्णपणे भरून पात्र नोंदीत बांधकाम कामगाराने त्याचे आधार कार्ड ज्या जिल्ह्यामधील आहे त्या जिल्हा बांधकाम कामगार सुविधा केंद्राचे (WFC) प्रभारी (कामगार उपायुक्त/सहायक कामगार आयुक्त/सरकारी कामगार अधिकारी) यांच्याकडे जमा करावा.

(क) निवृत्तीवेतन अर्जासोबत खालील कागदपत्रे जोडावीत :-

१. पत्त्याचा पुरावा-आधार कार्ड साक्षांकित छायाप्रत

२. जन्मतारखेचा पुरावा-जन्म दाखला/शाळा सोडल्याचा दाखला साक्षांकित छायाप्रत

३. बँक खाते पासबुक साक्षांकित छायाप्रत

(ड) संबधित प्रभारी, जिल्हा कामगार सुविधा केंद्र यांनी सदर अर्जाची छानणी करून **"निवृत्तीवेतन शिफारस प्रमाणपत्र"** (प्रपत्र-ब) सह प्रस्ताव मंडळ मुख्यालयास मान्यतेस सादर करावा. एकापेक्षा जास्त जिल्ह्यामध्ये नोंदणी/नुतनीकरणाचा कालावधी असल्यास संबधित जिह्यामधून **"वर्षनिहाय नोंदणी प्रमाणपत्र"** (प्रपत्र-क) संबधित प्रभारी, जिल्हा बांधकाम कामगार सुविधा केंद्र यांनी प्राप्त करून घ्यावे.

(ड) मंडळ स्तरावर सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मान्यतेअंती संबधित बांधकाम कामगारास **"निवृत्तीवेतन क्रमांक प्रमाणपत्र"** देण्यात येईल. (प्रपत्र-ड)

(ई) निवृत्तीवेतन क्रमांक प्रमाणपत्र दिल्याचा दिनांक हा संबधित बांधकाम कामगाराचा निवृत्तीवेतन दिनांक समजण्यात येईल व त्यानुसार वर्ष गणना करण्यात येईल.

(फ) दरवर्षी माहे नोव्हेंबर मध्ये मंडळाच्या निवृत्तीवेतनधारक बांधकाम कामगारास त्याच्या हयातीचा दाखला(प्रपत्र-इ) पुरावा स्वरूपात मंडळाकडे सादर करावा लागेल त्यासाठी त्याने आधारकार्ड/मंडळाचे नोंदणी कार्ड व निवृत्तीवेतन क्रमांक प्रमाणपत्रासह संबंधित जिल्हा कामगार सुविधा केंद्रामध्ये समक्ष उपस्थित राहून जिल्ह्याचे प्रभारी

अधिका-यांकडून हयातीचा दाखला प्राप्त करून द्यावा.जेणेकरून, त्या वर्षीचे निवृत्तीवेतन त्याच्या खात्यात जमा करता येईल.

(क) मंडळाच्या निवृत्तीवेतनधारक बांधकाम कामगारास त्याचे बँक खाते बदलावयाचे असल्यास तसा अर्ज त्यास प्रभारी, जिल्हा बांधकाम कामगार सुविधा केंद्रामार्फत मंडळास करावा लागेल.

(ख) मंडळाच्या निवृत्तीवेतनधारक बांधकाम कामगाराचा मृत्यू झाल्यास, त्याचा/ तीचा वारसदार पती/पत्नीने वारस नोंदीचा अर्ज प्रभारी, जिल्हा बांधकाम कामगार सुविधा केंद्रामार्फत मंडळास करावा लागेल.

(ग) सदर निवृत्तीवेतन क्रमांकाची नोंद एकात्मिक कल्याणकारी मंडळ संगणकीय प्रणाली (IWBMS) या प्रणालीवर घेण्यात येईल व दरमहा संबधित निवृत्तीवेतनधारक बांधकाम कामगाराच्या खात्यावर निवृत्तीवेतन जमा करण्यात येईल.

४. मासिक निवृत्ती वेतन प्रदानाची कार्यवाही :-

मंडळ मुख्यालयाकडून वेळोवेळी निर्गमित होणा-या **"निवृत्तीवेतन क्रमांक प्रमाणपत्रांचे आधारे"** प्रत्येक महीन्याच्या शेवटच्या आठवडयात त्यामहिन्याच्या १५ तारखेअखेर निर्गत निवृत्तीवेतन क्रमांक धारकांची मंडळ मुख्यालय स्तरावरील IWBMS प्रणालीचे व्यवस्थापक- मे.आरसीएस इन्फोटेक प्रा.लि. यांचेकडून पुढील महिन्याच्या प्रदानार्थ निवृत्तीवेतन धारकांची प्रदान फाईल (Claim disbursement File) बँकेस आवश्यक नमून्यात तयार करण्यात येईल, सदर फाईल तयार करताना त्यामध्ये निवृत्ती वेतन धारकांचे बँक तपशील, व्दिरूक्ती इ.बाबींच्या अनुषंगाने तपासणी करण्यात येईल, सदर प्रदान फाईल मंडळाच्या लेखा शाखेस सादर होईल. लेखा शाखेच्या संबंधित कार्यासनाने सदर फाईलची आवश्यक तपासणी करून सदर प्रदान फाईल सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अंतिम मान्यतेस्तव सादर करावी. सदर मान्यतेअंती प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत संबधित पात्र निवृत्तीवेतन धारक बांधकाम कामगारांच्या बँक खात्यावर DBT in Cash प्रकाराने निवृत्ती वेतन जमा करण्यासाठी बँकेस पाठविण्यात यावी. लेखा शाखेने बँकेकडून वेळोवेळी यशस्वी /अयशस्वी प्रदानांचा ताळमेळ घ्यावा. अयशस्वी प्रदानाची स्वतंत्र प्रदान फाईल करण्यात यावी. व प्रत्येक महिन्याचा मासिक प्रगती अहवाल सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे निदर्शनास आणून द्यावा.

५. मंडळ मुख्यालय स्तरावरील निवृत्तीवेतन समन्वय कक्ष :-

उपरोक्त प्रमाणे कामकाजाचे समन्वय करण्याकरिता खालीलप्रमाणे समन्वय कक्ष गठीत करण्यात येत आहे.

अ.क्र.	अधिकारी	पद
१	जिल्हा कार्यकारी अधिकारी	कक्ष प्रमुख
२	लेखाधिकारी	समन्वयक
३	संबंधित जिल्हयाचे जिल्हा कार्यालय प्रमुख	सदस्य
४	आयडब्ल्यूबीएमएस प्रणालीचे व्यवस्थापक संस्था मे.आरसीएस इन्फोटेक लिमिटेड यांचेकडील प्रकल्प संचालक	सदस्य

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५०६१९१५२७३२९०१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SAGUNA GANESH THENGIL

Digitally signed by SAGUNA GANESH THENGIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=INDUSTRY ENERGY LABOUR AND MINING DEPARTMENT, 2.5.4.20=d46fe3bd37ed5770bdb52fb3a029adc135025943cb93cc90de6ceb564ced5ea3, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=8B4022592C046656175981351F8579C9ABD8539AE9376883FF96B29E67B146A80, cn=SAGUNA GANESH THENGIL
Date: 2025.06.19 15:28:18 +05'30'

(सगुणा काळे-ठेंगील)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१. मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, राजभवन, मुंबई.
२. मा.सभापती, महाराषट्र विधानपरिषद, विधानमंडळ, मुंबई.
३. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा , विधानमंडळ, मुंबई.
४. सर्व विधीमंडळ सदस्य
५. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. प्रधान सचिव, विधानमंडळ, मुंबई.
७. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालयीन विभाग, मंत्रालय,मुंबई.
८. मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
९. मा. उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
१०. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे उपसचिव, मुंबई.
११. विकास आयुक्त, असंघटीत कामगार, मुंबई.
१२. कामगार आयुक्त , महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१३. मा. मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव, मंत्रलय, मुंबई.
१४. सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१५. सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराषट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई.
१६. निवड नस्ती.

प्रपत्र-अ

बांधकाम कामगार निवृत्तीवेतन अर्ज

१. बांधकाम कामगाराचे नाव :-

२. बांधकाम कामगाराचा नोंदणी क्रमांक:-

३. आधार क्रमांक:-

४. जन्मदिनांक:-

५. वयाची ६० वर्षे पूर्ण झाल्याचा दिनांक:-

६. प्रथम नोंदणी झाल्याचा दिनांक:-

७. प्रथम नोंदणी झालेल्या जिल्ह्याचे ठीकाण:-

८. नोंदणी कालावधीचा तपशिल:-

अ.क्र.	नोंदणी / नुतनीकरणाचा दिनांक	नोंदणी / नुतनीकरणाचा कालावधी	जिल्हा
१	दि.--------	दि. ------ ते दि. ---------	
२	दि.--------	दि. ------ ते दि. ---------	
३	दि.--------	दि. ------ ते दि. ---------	
४	दि.--------	दि. ------ ते दि. ---------	
५	दि.--------	दि. ------ ते दि. ---------	

९. बँक खात्याचा तपशिल :-

(अ) बँकेचे नाव -

(ब) खाते क्रमांक -

(क) आय.एफ.एस.सी. क्रमांक -

१०. कर्मचारी राज्य विमा कायदा, १९४८ (Employees State Insurance Act,१९४८) अंतर्गत लाभ घेण्यात येतो का ? (होय/नाही) :-

११. कर्मचा-यांचे प्रदाता निधी आणि विविध तरतूदी कायदा, १९५२ (The Employees Provident Fund and Miscellaneous Provision Act, १९५२) अंतर्गत लाभ घेण्यात येतो का ? (होय/नाही) :-

उपरोक्त प्रमाणे सादर करण्यात आलेली माहीती सत्य असून, खोटी आढळून आल्यास नियमानुसार माझ्याविरूद्धच्या उचित कारवाईस पात्र असेन याची मला जाणीव आहे.

(बांधकाम कामगाराचे नाव)

प्रपत्र-ब

-: निवृत्तीवेतन शिफारस प्रमाणपत्र :-

प्रमाणित करण्यात येते की, श्री./श्रीमती ----------,नोंदणी क्रमांक ---------हे महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई अंतर्गत ------- वर्षे नोंदित होते. त्यांनी वयाची ६० वर्षे दिनांक ------ रोजी पूर्ण केली असून, त्यांना कर्मचारी राज्य विमा कायदा,१९४८ (Employees State Insurance Act,१९४८) व कर्मचा-यांचे प्रदाता निधी आणि विविध तरतूदी कायदा, १९५२ (The Employees Provident Fund and Miscellaneous Provision Act,१९५२) अंतर्गत लाभ प्राप्त होत नाही. निकषानुसार ते दरवर्षी रक्कम रू. ------ (--%) निवृत्तीवेतनास पात्र आहेत.

प्रभारी
(कामगार उपायुक्त/सहायक कामगार आयुक्त/
सरकारी कामगार अधिकारी)
जिल्हा इमारत कामगार सुविधा केंद्र
जिल्हा -----

प्रपत्र-क

-: वर्षनिहाय नोंदणी प्रमाणपत्र :-

प्रमाणित करण्यात येते की, श्री./श्रीमती ----------, नोंदणी क्रमांक ---------हे जिल्हा इमारत कामगार सुविधा केंद्र ------ अंतर्गत दिनांक ---- ते दिनांक --- अखेर नोंदित होते.

प्रभारी
(कामगार उपायुक्त/सहायक कामगार आयुक्त/
सरकारी कामगार अधिकारी)
जिल्हा इमारत कामगार सुविधा केंद्र
जिल्हा -----

प्रपत्र-ड

-: निवृत्तीवेतन क्रमांक प्रमाणपत्र:-

प्रमाणित करण्यात येते की, श्री./श्रीमती ----------,नोंदणी क्रमांक ---------हे महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई अंतर्गत ------- वर्षे नोंदित होते. त्यांनी वयाची ६० वर्षे दिनांक ------ रोजी पूर्ण केली असून, त्यांना कर्मचारी राज्य विमा कायदा,१९४८ (Employees State Insurance Act, १९४८) व कर्मचा-यांचे प्रदाता निधी आणि विविध तरतूदी कायदा, १९५२ (The Employees Provident Fund and Miscellaneous Provision Act, १९५२) अंतर्गत लाभ प्राप्त होत नाही. निकषानुसार ते दरवर्षी रक्कम रू. ------ (--%) निवृत्तीवेतनास पात्र आहेत. त्यांना दिनांक ------- पासून निवृत्तीवेतनास पात्र ठरविण्यात येत असून, त्यांता निवृत्तीवेतन क्रमांक------- हा राहील.

(लेखा अधिकारी)
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

एम एम टी सी हाऊस, पाचवा मजला,
प्लॉट क्र. सी २२, ब्लॉक - ई,
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पुर्व), मुंबई - ४०० ०५१.

संकेत स्थळ : www.mahabocw.in
दुरध्वनी व फॅक्स क्र. : 022-2657 2631
ई-मेल : bocwwboardmaha@gmail.com

जा.क्र./१३०५/२०२५/गृहसं-२०२५/प्र.क्र.०१/योजना-१२ दिनांक :- 30 JUN 2025

प्रति,

१. अपर कामगार आयुक्त/कामगार उप आयुक्त
कोकण/पुणे/नागपूर/अमरावती/ नाशिक, छ.संभाजीनगर
२. कामगार उप आयुक्त/सहायक कामगार आयुक्त/जिल्हा कामगार अधिकारी, जिल्हा कामगार सुविधा केंद्र (सर्व)

विषय:- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत नोंदित सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना वितरीत करावयाच्या गृहपयोगी वस्तु संचाच्या सुधारित कार्यपद्धतीबाबत.

संदर्भ:- १. उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग यांचे पत्र क्र. इबांका-०७२४/प्र.क्र.८४/कामगार-७, दिनांक १२.०७.२०२५.

२. मंडळाचे पत्र क्रमांक ११४२/२०२५/गृहसं-२०२५/प्र.क्र.०१/योजना-१२, दिनांक ०३.०६.२०२५.

३. मंडळाचे पत्र क्रमांक ११४३/२०२५/गृहसं-२०२५/प्र.क्र.०१/योजना-१२, दिनांक ०३.०६.२०२५.

४. उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग यांचे पत्र क्र. इबांका-०६२५/प्र.क्र.७५/कामगार-७, दिनांक १९.०६.२०२५.

उपरोक्त विषयाबाबतच्या संदर्भाधीन क्र. (१) अन्वये, गृहपयोगी वस्तु संच वितरणाची कार्यपद्धती निश्चित करण्यात आली होती. सदरच्या वितरण कार्यपद्धतीमध्ये बदल करण्याचा प्रस्ताव संदर्भाधीन क्र. (३) अन्वये शासनास सादर करण्यात आला होता.सदरच्या सुधारीत कार्यपद्धतीस संदर्भाधीन क्र. (४) अन्वये शासनाची मान्यता प्राप्त झाली आहे.सबब,गृहपयोगी संच वितरणाबाबत खालीलप्रमाणे सुधारीत सूचना देण्यात येत आहेत -

२. निश्चित दिनांक भेट पद्धत (Appointment System)

- सुधारीत पद्धतीनुसार मे. मफतलाल इंडस्ट्रीज लि. मुंबई या नियुक्त संस्थेच्या जिल्हानिहाय वितरण केंद्रे (Distribution Centre) वर गृहपयोगी संचाचे वितरण करण्यात येईल व याठीकाणी बांधकाम कामगार प्रत्यक्ष उपस्थित राहून गृहपयोगी संच ताब्यात घेईल.
- एका जिल्ह्यात एक अथवा अधिक वितरण केंद्रे (Distribution Centre) निश्चित करण्यात आली आहेत.
- ज्या जिल्ह्यात बांधकाम कामगाराची नोंदणी झालेली असेल, त्या जिल्ह्यामधूनच संबधित बांधकाम कामगारास गृहपयोगी संच मिळेल.
- मंडळाचे गृहपयोगी वस्तू संच वितरणाचे http://hikit.mahabocw.in/appointment हे संकेतस्थळ सर्वांकरीता खुले असेल.
- संकेतस्थळावर निश्चित केलेली वितरण केंद्रे (Distribution Centre) संबधित जिल्ह्यासोबत जोडण्यात (Mapping) आली आहेत. आवश्यकतेनुसार सदरच्या वितरण केंद्रामध्ये वाढ अथवा घट करण्यात येईल.
- बांधकाम कामगार मंडळाच्या संकेतस्थळावर जावून स्वत:चा नोंदणी क्रमांक टाकेल व लॉग-ईन करेल.
- लॉग-ईन झाल्यानंतर संबधित बांधकाम कामगाराची नोंदणी सक्रिय नसल्यास (Inactive) तर तशी उद्घोषणा दिसेल व संबधित बांधकाम कामगार सदर योजनेस अपात्र ठरेल.
- लॉग-ईन झाल्यानंतर संबधित बांधकाम कामगाराने यापूर्वीच गृहपयोगी वस्तू संच घेतला असेल तर तशी उद्घोषणा दिसेल व संबधित बांधकाम कामगार सदर योजनेस अपात्र ठरेल.
- सदर योजनेअंतर्गत गृहपयोगी संच हा कुटुंब (पती / पत्नी) करीता एकच अनुज्ञेय राहणार आहे.त्यामुळे सोबत जोडलेल्या प्रपत्रामधील स्वय:घोषणापत्र भरून देणे बंधनकारक राहील.
- लॉग-ईन झाल्यानंतर संबधित बांधकाम कामगाराच्या पती /पत्नी यांनी यापूर्वीच गृहपयोगी वस्तू संच घेतला असेल अथवा दिनांक (Appointment) घेतली असल्यास तशी उद्घोषणा दिसेल व संबधित बांधकाम कामगार सदर योजनेस अपात्र ठरेल.
- लॉग-ईन झाल्यानंतर संबधित बांधकाम कामगाराने यापूर्वीच गृहपयोगी वस्तू संच घेतला नसल्यास,त्यास प्रत्यक्ष उपस्थित राहून गृहपयोगी संच

घेण्याकरीता त्याच्या सोईचा दिनांक व वितरण केंद्र (Distribution Centre) निवडेल.

- बांधकाम कामगाराने सोईचा दिनांक व वितरण केंद्र (Distribution Centre) निवडल्यानंतर Appointment Letter तयार होईल.
- बांधकाम कामगार मंडळाचे ओळखपत्र अथवा आधार कार्ड व Appointment Letter घेवून त्याने निवडलेल्या दिनांकास वितरण केंद्रावर (Distribution Centre) उपस्थित राहील व तिथे Biometric व Online Photo देईल. त्यानंतर प्रत्यक्ष गृहपयोगी संच ताब्यात घेवून पोहोच देईल.
- वितरण केंद्र निहाय (Distribution Centre) मंडळ प्रतिनिधीची नियुक्ती संबधित जिल्ह्याचा कामगार उप आयुक्त/सहाय्यक कामगार आयुक्त/सरकारी कामगार अधिकारी करतील.
- वितरण केंद्र निहाय (Distribution Centre) नियुक्त संस्थेच्या प्रतिनिधी व कामागारांची नियुक्ती संबधित संस्था करेल व त्याबाबतची माहीती संबधित जिल्ह्याच्या कामगार उप आयुक्त/सहाय्यक कामगार आयुक्त/सरकारी कामगार अधिकारी यांना सादर करेल. संबधित संस्थेने तसे ओळखपत्र त्यांच्या प्रतिनिधी व कामगारांना द्यावे.
- वितरण केंद्रावर (Distribution Centre) त्या दिवशीच्या Appointment Letter धारक बांधकाम कामगार, मंडळ प्रतिनिधी व नियुक्त संस्थेचा प्रतिनिधी व्यतिरीक्त कोणालाही प्रवेश असणार नाही.
- प्रत्येक वितरण केंद्राचा (Distribution Centre) प्रति दिवशीचा गृहपयोगी संच वितरणाचा **लक्ष्यांक २५० निश्चित** करण्यात येत आहे जेणेकरून, तिथे अनावश्यक गर्दी होणार नाही व नियुक्त संस्थेसही लक्ष्यांकानुसार गृहपयोगी संचाचा साठा ठेवता येईल.
- प्रत्येक वितरण केंद्रावर (Distribution Centre) संगणक, Biometric व Online Photo Capturing उपकरणे , इंटरनेट , वीज व पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्याची जबाबदारी नियुक्त संस्थेची राहील.
- प्रत्येक वितरण केंद्रावर (Distribution Centre) सदरची योजना विनामुल्य असल्याची जाहीरात करण्याची जबाबदारी संबधित जिल्ह्याच्या कामगार उप आयुक्त/सहाय्यक कामगार आयुक्त/सरकारी कामगार अधिकारी यांची राहील.
- Appointment Letter शिवाय वितरण केंद्रावरून (Distribution Centre) कोणालाही गृहपयोगी संचाचे वाटप होणार नाही.

- संबधित बांधकाम कामगाराने त्याने घेतलेल्या दिनांकास उपस्थित राहीला नाही तर त्याचा दिनांक व्यपगत होईल व त्यास पुन्हा दिनांक घ्यावा लागेल.

३. वितरण केंद्रावरील कर्मचा-यांनी बांधकाम कामगाराने Appointment Letter **सोबत सादर केलेले मंडळाचे ओळखपत्र अथवा आधार कार्ड व संकेतस्थळावरील बांधकाम कामगाराचा फोटो तपासून तीच व्यक्ती असल्याची खातरजमा करावी.** त्यानंतर केवळ बांधकाम कामगाराचे बोटांचे ठसे (Biometric) व छायाचित्र (online Photo) घ्यावयाचे आहेत व त्यांना गृहपयोगी संच ताब्यात देवून लेखी पोहोच घ्यावयाची आहे. यानुसार कार्यवाही न करता कोणत्याही कारणाने त्यांनी बांधकाम कामगारास परत पाठविल्यास ते कारवाईस पात्र राहतील.बांधकाम कामगारानेही गृहपयोगी संच ताब्यात घेतल्याशिवाय वितरण केंद्र सोडू नये अथवा न मिळालेल्या संचास ते व्यक्तिश: जबाबदार राहतील.**मंडळाची योजना नि:शुल्क असल्याने पैसे / लाचेची मागणी करणा-या संबधितांवर फौजदारी गुन्हे नोंद करण्यात यावेत.**

४. उपरोक्तप्रमाणे गृहपयोगी संच वितरणाचे संकेतस्थळ दिनांक ०१ जुलै,२०२५ पासून सुरू करण्यात येत असून, दिनांक १५ जुलै,२०२५ पासून दिनांक (Appointment) सुरू करण्यात येत आहेत.दरम्यानच्या १० दिवसांच्या कालखंडामध्ये सुधारीत कार्यपद्धतीची प्रसिद्धी व वितरण व्यवस्था करण्यात यावी.

(विवेक कुंभार)
सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई.

प्रति,

मे. मफतलाल इंडस्ट्रीज लि. मुंबई, यांना कळविण्यात येते की, उपरोक्त सूचनांच्या अनुषंगाने संकेतस्थळ सुरू करण्यात यावे व दिलेल्या सूचनांचे पालन करण्यात यावे.

प्रत ,

१. मा.मंत्री (कामगार) तथा मा.अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई.
२. मा.प्रधान सचिव (कामगार), उद्योग,ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय,मुंबई.
३. मा. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य.
४. उप सचिव (कामगार-७) , उद्योग, उर्जा व कामगार विभाग, मुंबई.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

एमएमटीसी हाऊस, ५ वा मजला
प्लॉट नं. सी २२, ब्लॉक - ई ,
वांद्रे कुर्ला संकुल,
वांद्रे (पुर्व),मुंबई ४०० ०५१.

संकेतस्थळ– www.mahabocw.in
दुरध्वनी व फॅक्सक्र. ०२२-२६५७२६३१
ई-मेल- bocwwboardmaha@gmail.com

जावक क्र. ९३७८ /२०२५
गृहसं-२०२५/प्र.क्र.०१/योजना-१२ **दिनांक :-**०१.०७.२०२५

प्रति,

१. **अपर कामगार आयुक्त/कामगार उप आयुक्त**
कोकण/पुणे/नागपूर/अमरावती/नाशिक/छ.संभाजीनगर
२. **कामगार उप आयुक्त/सहायक कामगार आयुक्त/जिल्हा कामगार अधिकारी,**
जिल्हा कामगार सुविधा केंद्र (सर्व)

विषय :- **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई अंतर्गत नोंदीत जिवीत (सक्रीय) बांधकाम कामगारांना वितरीत करावयाच्या गृहपयोगी वस्तू संचाच्या सुधारित कार्यपध्दतीबाबत.**

संदर्भ :- मंडळ कार्यालयाचे पत्र क्र./१३०५/२०२५/गृहसं-२०२५/प्र.क्र.०१/योजना-१२ दि.३०.०६.२०२५

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई अंतर्गत नोंदीत जिवीत (सक्रीय) बांधकाम कामगारांना वितरीत करावयाच्या गृहपयोगी वस्तू संचाबाबत सुधारित कार्यपध्दतीबाबत सूचना निर्गमित करण्यात आलेल्या होत्या. मंडळाच्या गृहपयोगी वस्तू संच वितरणाचे संकेतस्थळ http://hikit.mahabocw.in/appointment वर उपलब्ध असलेले स्वयं:घोषणापत्र बांधकाम कामगारांनी डाऊनलोड केल्यानंतर न भरताच व स्वाक्षरी न करताच अपलोड करत असल्याची बाब निदर्शनास आली आहे.

२. वरील बाबींच्या अनुषंगाने, वितरण केंद्रावरील नियुक्त संस्थेच्या प्रतिनिधीने खालील बाबींची खातरजमा करावी.

(अ) स्वयं:घोषणापत्र बांधकाम कामगाराने पूर्णपणे भरून त्यांची स्वाक्षरी करून ते अपलोड केलेले आहे.

(ब) संकेतस्थळावरील बांधकाम कामगाराचा फोटो व बांधकाम कामगाराने सादर केलेले मंडळाचे ओळखपत्र/ आधारकार्डवरील फोटो एकच आहे.

३. वरील नमूद बाबीं शिवाय बांधकाम कामगाराचा गृहपयोगी वस्तू संचाचा अर्ज नामंजूर करण्यात येऊ नये. तसेच, उपरोक्त बाबी बरोबर असल्यास, बांधकाम कामगाराचे बोटांचे ठसे (Biometric) व छायाचित्र (Online Photo) घेऊन त्यांना गृहपयोगी वस्तू संच ताब्यात देऊन लेखी पोहोच घेण्यात यावी.

09/10/2024

(विवेक कुंभार)
सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

प्रत :-

१. मा. मंत्री महोदय (कामगार) यांचे खाजगी सचिव मंत्रालय मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर
२. मा. प्रधान सचिव (कामगार) उदयोग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर
३. मा. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर
४. मुख्य व्यवस्थापक, (Institutional Sales) मे. मफतलाल इंडस्ट्रिज लिमिटेड, ५ वा मजला, मफतलाल हाऊस, एच.टी. पारेख मार्ग, बॅकबे रिक्लमेशन, मुंबई- ४०० ०२०

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत लोकसेवा नियत कालमर्यादा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीय अपिलीय अधिकारी प्रसिध्द करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन

उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग

शासन निर्णय क्र. संकिर्ण २०२५/प्र.क्र.४२/कामगार ९

मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२

दिनांक : ०९/०७/२०२५.

वाचा:- १. सन २०१५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र. ५, दिनांक २८/०४/२०१५.

२. उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचे शासन निर्णय क्र.संकिर्ण २०१५/ प्र.क्र.१२/कामगार-९, दि.२४/०७/२०१५.

३. उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचे शासन निर्णय क्र.संकिर्ण २०१५/ प्र.क्र.१२/कामगार-९, दि.२९/०६/२०१६.

४. उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचे शासन निर्णय क्र.संकिर्ण २०१७/ प्र.क्र.३९/कामगार-९, दि.२८/०४/२०१७.

५. उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचे शासन निर्णय क्र.संकिर्ण २०१७/ प्र.क्र.६६/कामगार-९, दि.२०/०६/२०१७.

६. उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचे शासन निर्णय क्र.संकिर्ण २०१८/ प्र.क्र.१०४/कामगार-९, दि.११/१२/२०१८.

७. उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचे शासन शुद्धीपत्रक क्र.संकिर्ण २०१५/ प्र.क्र.१२/कामगार-९, दि.११/०३/२०१९.

८. उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाची अधिसूचना क्र.संकिर्ण २०२०/ प्र.क्र.६६/कामगार-९, दि.२३/१२/२०२०.

९. उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचे शासन शुद्धीपत्रक क्र.संकिर्ण २०१५/ प्र.क्र.१२/कामगार-९, दि.१६/०७/२०२४.

प्रस्तावना :-

राज्यातील पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित लोकसेवा देण्याकरिता तसेच लोकांच्या स्थानिक प्रशासनाकडून वाढत्या अपेक्षा विचारात घेवून त्यांना तत्पर व दर्जेदार सेवा पुरविण्याच्या दृष्टीकोनातून महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश-२०१५, दि.२८/०४/२०१५ रोजी महाराष्ट्र राज्यात लागू करण्यात आला आहे. या अध्यादेशातील कलम ३ मध्ये नमूद करण्यात आल्यानुसार प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने अध्यादेश लागू झाल्यानंतर ३ महिने कालावधीच्या आत व त्यानंतर वेळोवेळी ते पुरवित असलेल्या लोकसेवा पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीय अपिलीय अधिकारी आणि नियत कालमर्यादा या अध्यादेशाखाली अधिसूचीत करणे आवश्यक आहे. सदरहू अध्यादेश निर्गमित करण्यामागे सार्वजनिक प्राधिकरणाने त्या पुरवित असलेल्या सेवा अधिनियमांतर्गत प्रसिध्द करून त्याप्रमाणे संबंधित सेवा पुरविणे आवश्यक आहे.

२. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत पुरवावयाच्या सेवांमध्ये महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम-२०१५ च्या कलम ३ नुसार संदर्भाधीन शासन निर्णयान्वये कामगार विभागाच्या प्रशासकीय अधिपत्याखालील कामगार आयुक्त कार्यालय, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय व बाष्पके संचालनालयामार्फत पुरविण्यात येणाऱ्या एकूण -४१ सेवा अधिसूचीत करण्यात आलेल्या आहेत. मा.मुख्य आयुक्त, राज्य सेवा हक्क आयोग यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १३/११/२०२४ रोजी झालेल्या बैठकीमध्ये देण्यात आलेल्या निर्देशानुसार कामगार विभागाच्या अधिपत्याखालील क्षेत्रिय कार्यालयामार्फत पुरविण्यात येणाऱ्या सेवांबाबतचे वरील निर्गमित करण्यात आलेले शासन निर्णय अधिक्रमीत करण्यात येवून खालीलप्रमाणे सेवा अधिसूचित करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्या अनुषंगाने शासनाने खालील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय :-

कामगार विभागाच्या अधिपत्याखालील क्षेत्रिय कार्यालयामार्फत पुरविण्यात येणाऱ्या सेवा अधिसूचित करण्याच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात आलेले संदर्भ क्रमांक २ ते ९ वरील शासन निर्णय अधिक्रमीत करण्यात येत असून, कामगार विभागाच्या अधिपत्याखालील क्षेत्रिय कार्यालयामार्फत (आयुक्तालये, संचालनालये, मंडळे) पुरविण्यात येणाऱ्या खालील तक्त्यातील एकूण-९४ सेवा महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम-२०१५ अंतर्गत या शासन निर्णयान्वये अधिसूचित करण्यात येत आहेत. (कार्यालयनिहाय अधिसूचित सेवांचा तपशील शासन निर्णया सोबतच्या परिशिष्टांमध्ये नमूद करण्यात आला आहे)

अ.क्र.	कार्यालयाचे नाव	एकूण अधिसूचित सेवा	परिशिष्ट क्रमांक
१	कामगार आयुक्त कार्यालय, मुंबई	२३	परिशिष्ट-१
२	औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय	७	परिशिष्ट-२
३	बाष्पके संचालनालय	२९	परिशिष्ट-३
४	महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ	१२	परिशिष्ट-४
५	महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ	२३	परिशिष्ट-५
एकूण		**९४**	

२. या अधिनियमांतर्गत सेवा पुरविण्यासाठी आकारावयाची फी निश्चित करण्याची संबंधित कार्यालय प्रमुखांना मूभा राहील.

३. संबंधित क्षेत्रिय कार्यालयांनी त्यांच्यामार्फत पुरविण्यात येणाऱ्या लोकसेवांची सूची, नियत कालमर्यादा, अर्जाचा विहीत नमूना, फी, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीय अपिलीय अधिकारी यांचा तपशिल कार्यालयाच्या सूचना फलकावर तसेच त्यांच्या संकेतस्थळावर आणि पोर्टलवर प्रदर्शित करावा.

४. सोबतच्या "परिशिष्टांमध्ये" लोकसेवा पुरविण्यासाठी विहित केलेली कालमर्यादा नमूद करण्यात आली आहे. सदर नियत कालमर्यादा ही शासकीय सुट्टीचे दिवस वगळून विहित करण्यात येत आहे.

५. क्षेत्रिय कार्यालयांनी उपरोक्त प्रमाणे उक्त अधिनियमाच्या कलम ३ नुसार सेवा अधिसूचित करणे व त्यांची अंमलबजावणी करण्याची कार्यवाही तात्काळ करावी.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२५०७०९१५४३४८३५१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SWAPNIL YASHWANTRAO KAPADNIS

Digitally signed by SWAPNIL YASHWANTRAO KAPADNIS
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=INDUSTRIES ENERGY AND LABOUR DEPARTMENT, 2.5.4.20=3389518a88af500ef17fd52858804c56d5b0db93ce68c9638764849614f0c8b3, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=824DB7B32ED13AAC7B6F1F11E717770B52D6784F2BC41DDF0E4E9729CDB96F88, cn=SWAPNIL YASHWANTRAO KAPADNIS
Date: 2025.07.10 18:01:04 +05'30'

(स्वप्निल कापडणीस)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. मा. मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव
४. मा. राज्यमंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव
५. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
६. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त, नवीन प्रशासकीय इमारत, मंत्रालयासमोर, मादाम कामा रोड, मुंबई.
८. कामगार आयुक्त, कामगार भवन, भूखंड क्र.सी-२०, ब्लॉक-इ, बांद्रा कुर्ला संकुल, बांद्रा (पूर्व), मुंबई.
९. संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, वांद्रे (पूर्व), मुंबई.
१०. संचालक, बाष्पके, वांद्रे (पूर्व), मुंबई.
११. कल्याण आयुक्त, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, प्रभादेवी, मुंबई.
१२. सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई
१३. सर्व प्रादेशिक कार्यालये, कामगार आयुक्तालय/ औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय/ बाष्पके संचालनालय, महाराष्ट्र राज्य.
१४. अध्यक्ष तथा विकास आयुक्त, मैत्री कक्ष, मुंबई.
१५. सर्व सहसचिव/उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, उद्योग,उर्जा,कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६. निवडनस्ती.

उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई,
शासन निर्णय क्र.संकिर्ण २०२५/प्र.क्र.४२/कामगार ९, दिनांक : ०९/०७/२०२५ सोबतचे

परिशिष्ट-१

कामगार आयुक्त कार्यालयामार्फत अधिसूचित करण्यात आलेल्या एकूण -२३ सेवा					
अ.क्र.	**लोकसेवेचा तपशिल**	**लोकसेवा पुरविण्यासाठी विहित केलेली कालमर्यादा**	**पदनिर्देशित अधिकारी**	**प्रथम अपिलीय अधिकारी**	**द्वितीय अपिलीय अधिकारी**
१	महाराष्ट्र दुकाने आणि आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) अधिनियम, २०१७ अंतर्गत नोंदणी	१ दिवस	सुविधाकार	संबंधित जिल्हा सरकारी कामगार अधिकारी	संबंधित सहायक कामगार आयुक्त
२	महाराष्ट्र दुकाने आणि आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) अधिनियम, २०१७ अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्रातील सुधारणा	१ दिवस	सुविधाकार	संबंधित जिल्हा सरकारी कामगार अधिकारी	संबंधित सहायक कामगार आयुक्त
३	कंत्राटी कामगार (नियमन आणि निर्मुलन) अधिनियम, १९७० अंतर्गत मुख्य मालक नोंदणी प्रमाणपत्र	७ दिवस	सहायक कामगार आयुक्त	अपर कामगार आयुक्त/कामगार उप आयुक्त	कामगार आयुक्त
४	कंत्राटी कामगार (नियमन आणि निर्मुलन) अधिनियम, १९७० अंतर्गत मुख्य मालक नोंदणी प्रमाणपत्रातील सुधारणा	७ दिवस	सहायक कामगार आयुक्त	अपर कामगार आयुक्त/कामगार उप आयुक्त	कामगार आयुक्त
५	कंत्राटी कामगार (नियमन आणि निर्मुलन) अधिनियम, १९७० अंतर्गत कंत्राटदारास अनुज्ञाप्ती देणे	७ दिवस	सहायक कामगार आयुक्त	अपर कामगार आयुक्त/कामगार उप आयुक्त	कामगार आयुक्त
६	कंत्राटी कामगार (नियमन आणि निर्मुलन) अधिनियम, १९७० अंतर्गत कंत्राटदारास अनुज्ञाप्तीचे नुतनीकरण करणे	७ दिवस	सहायक कामगार आयुक्त	अपर कामगार आयुक्त/कामगार उप आयुक्त	कामगार आयुक्त
७	कंत्राटी कामगार (नियमन आणि निर्मुलन) अधिनियम, १९७० अंतर्गत अनुज्ञाप्तीतील सुधारणा	७ दिवस	सहायक कामगार आयुक्त	अपर कामगार आयुक्त/कामगार उप आयुक्त	कामगार आयुक्त
८	इमारत व इतर बांधकाम कामगार (नोकरीचे नियमन आणि शर्ती) अधिनियम, १९९६ अंतर्गत आस्थापनेची नोंदणी	७ दिवस	सहायक कामगार आयुक्त	अपर कामगार आयुक्त/कामगार उप आयुक्त	कामगार आयुक्त
९	इमारत व इतर बांधकाम कामगार (नोकरीचे नियमन आणि शर्ती) अधिनियम, १९९६ अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्रातील सुधारणा	७ दिवस	सहायक कामगार आयुक्त	अपर कामगार आयुक्त/कामगार उप आयुक्त	कामगार आयुक्त
१०	मोटार परिवहन कामगार अधिनियम, १९६१ अंतर्गत नोंदणी	१५ दिवस	कामगार उप आयुक्त (ग्रा.वि.)	सह आयुक्त कामगार (माथाडी)	कामगार आयुक्त

११	मोटार परिवहन कामगार अधिनियम, १९६१ अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्राचे नुतनीकरण	१५ दिवस	कामगार उप आयुक्त (ग्रा.वि.)	सह आयुक्त कामगार (माथाडी)	कामगार आयुक्त
१२	मोटार परिवहन कामगार अधिनियम, १९६१ अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्रातील सुधारणा	१५ दिवस	कामगार उप आयुक्त (ग्रा.वि.)	सह आयुक्त कामगार (माथाडी)	कामगार आयुक्त
१३	बिडी व सिगार (नोकरीच्या शर्ती) वर्कस अधिनियम १९६६ अंतर्गत औद्योगिक वास्तुंची नोंदणी	१५ दिवस	सहायक कामगार आयुक्त	अपर कामगार आयुक्त/कामगार उप आयुक्त	कामगार आयुक्त
१४	बिडी व सिगार (नोकरीच्या शर्ती) वर्कस अधिनियम १९६६ अंतर्गत नोंदणीचे नुतनीकरण करणे	१५ दिवस	सहायक कामगार आयुक्त	अपर कामगार आयुक्त/कामगार उप आयुक्त	कामगार आयुक्त
१५	बिडी व सिगार (नोकरीच्या शर्ती) वर्कस अधिनियम १९६६ अंतर्गत नोंदणीचे प्रमाणपत्रातील सुधारणा	१५ दिवस	सहायक कामगार आयुक्त	अपर कामगार आयुक्त/कामगार उप आयुक्त	कामगार आयुक्त
१६	आंतरराज्य स्थलांतरित कामगार (रोजगार व सेवाशर्तीचे नियमन) अधिनियम १९७९ अंतर्गत आस्थापनांना नोंदणी प्रमाणपत्र	१५ दिवस	सहायक कामगार आयुक्त	अपर कामगार आयुक्त/कामगार उप आयुक्त	कामगार आयुक्त
१७	आंतरराज्य स्थलांतरित कामगार (रोजगार व सेवाशर्तीचे नियमन) अधिनियम १९७९ अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्रातील सुधारणा	१५ दिवस	सहायक कामगार आयुक्त	अपर कामगार आयुक्त/कामगार उप आयुक्त	कामगार आयुक्त
१८	आंतरराज्य स्थलांतरित कामगार (रोजगार व सेवाशर्तीचे नियमन) अधिनियम १९७९ अंतर्गत स्थलांतरीत कामगारांच्या भरतीसाठी कंत्राटदारास अनुज्ञाप्ती देणे	१५ दिवस	सहायक कामगार आयुक्त	अपर कामगार आयुक्त/कामगार उप आयुक्त	कामगार आयुक्त
१९	आंतरराज्य स्थलांतरित कामगार (रोजगार व सेवाशर्तीचे नियमन) अधिनियम १९७९ अंतर्गत स्थलांतरीत कामगारांच्या भरतीसाठी कंत्राटदाराच्या अनुज्ञाप्तीचे नुतनीकरण	१५ दिवस	सहायक कामगार आयुक्त	अपर कामगार आयुक्त/कामगार उप आयुक्त	कामगार आयुक्त
कल्याणकारी मंडळ,मुंबई.
एम.एम.टी.सी. हाऊस, पाचवा मजला, प्लॉट नं. सी २२,
ब्लॉक - ई , वांद्रे- कुर्ला संकुल,
वांद्रे (पूर्व),मुंबई ४०० ०५१ .

मा. अध्यक्ष तथा मा. मंत्री, (कामगार) यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची ६५ व्या बैठकीचे इतिवृत्त

****

बैठक स्थळ :- मा. मंत्री, (कामगार) तथा मा. अध्यक्ष महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ यांचे दालन क्र.८४, जॉली मेकर ०१ प्रिमायसेस को. ऑप. सोसायटी लि., आठवा मजला, नरीमन भवन प्लॉट क्र.९५,९६ व ९७, कफ परेड, कुलाबा, मुंबई- ४०० ००२.
दिनांक. :- १२.०५.२०२६ (मंगळवार)
वेळ :- दुपारी १२:०० वा.

पान क्र. १ पैकी २८

प्रस्तावना:-

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची ६५ वी बैठक मंगळवार, दि. १२.०५.२०२६ रोजी संध्याकाळी १२:०० वा. आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीची विषय सूची खालीलप्रमाणे आहे.:-

अ.क्र.	बैठकीचा विषय	पृष्ठ क्रमांक
०१.	सामाजिक सुरक्षा संहिता — २०२० च्या अनुषंगाने, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई अंतर्गत नोंदित बांधकाम कामगारांकरीता योजनांची अंमलबजावणी करणे.	०१ ते २१
०२.	मा. अध्यक्ष यांच्या मान्यतेने आयत्या वेळेचे विषय	२१ ते २१

पान क्र. २ पैकी २८

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या मंगळवार दिनांक १२.०५.२०२६ रोजी दुपारी १२:०० वाजता संपन्न झालेल्या ६५ व्या बैठकीचे इतिवृत्त.

मा. ना. श्री. आकाश फुंडकर, मा. मंत्री (कामगार) तथा मा. अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची ६५ वी बैठक मंगळवार दिनांक १२.०५.२०२६ रोजी दुपारी १२:०० वा. मा. मंत्री, (कामगार) तथा मा. अध्यक्ष महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ यांचे दालन क्र.८४, जॉली मेकर ०१ प्रिमायसेस को. ऑप. सोसायटी लि., आठवा मजला, नरीमन भवन प्लॉट क्र.९५,९६ व ९७, कफ परेड, कुलाबा, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सन्माननीय सदस्य बैठकीस उपस्थित होते.

अ.क्र.	सदस्याचे नाव	पद
१.	मा. ना. श्री. आकाश फुंडकर	मा. मंत्री (कामगार) तथा मा. अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई
२.	मा. श्रीम. आय. ए. कुंदन, प्रधान सचिव (कामगार)	शासकीय प्रतिनिधी
३.	मा. डॉ. एच. पी. तुम्मोड, कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई	शासकीय प्रतिनिधी
४.	मा. श्री. दिपक पोकळे, उप सचिव (कामगार-७)	शासकीय प्रतिनिधी
५.	मा. श्री. विवेक कुंभार	सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

बैठकीच्या सुरुवातीस मंडळ सचिव यांनी मा. मंत्री (कामगार) तथा मा. अध्यक्ष, मा. प्रधान सचिव, कामगार विभाग मा. कामगार आयुक्त, मंडळ सदस्य या उपस्थितांचे स्वागत केले व बैठकीत करावयाच्या विषयांशी संबंधित कागदपत्रांचा संचाच्या प्रती सर्व उपस्थित सदस्यांना वाटप करण्यात आली.

मंडळ सचिव यांनी नमूद केले की, इमारत व इतर बांधकाम व्यवसायामधील कामगारांच्या हिताचे रक्षण करण्याच्या दृष्टीने, केंद्र शासनाने इमारत व इतर बांधकाम कामगार अधिनियम (रोजगार नियमन व सेवाशर्थी), १९९६ व इमारत व इतर बांधकाम कामगार अधिनियम (उपकर), १९९६ लागू केला आहे.त्याअनुषंगाने महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्थी) नियम, २००७ अस्तित्वात आले आहेत. सदर नियमांच्या अनुषंगाने महाराष्ट्र इमारत

पान क्र. ३ पैकी २८

व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची स्थापना करण्यात आलेली आहे. मंडळामार्फत विविध कल्याणकारी योजना बांधकाम कामगारांकरीता राबविण्यात येत आहेत.

मंडळ सचिव यांनी नमूद केले की, इमारत व इतर बांधकाम कामगार अधिनियम (रोजगार नियमन व सेवाशर्थी), १९९६ व इमारत व इतर बांधकाम कामगार अधिनियम (उपकर), १९९६ अन्य कामगार कायद्यासोबत विलीनिकरण करून केंद्र शासनाने एकूण चार कामगार संहिता दिनांक २१ नोव्हेंबर, २०२५ पासून लागू करण्यात आली आहे.

इमारत व इतर बांधकाम बाबत सदरच्या चार संहितेपैकी सामाजिक सुरक्षा संहिता - २०२० लागू होत असून, सदर कामगार संहितेच्या अनुषंगाने, राज्य शासनाने महाराष्ट्र सामाजिक सुरक्षा संहिता नियम, २०२६ दिनांक ०५ मे, २०२६ रोजी प्रसिद्ध केले असून, पंचेचाळीस दिवसानंतर सदरचे नियम अंतिम होत आहेत.सदरचे नियम अंतिम झाल्यानंतर संहिता व नियमामधील तरतूदींच्या अनुषंगाने योजना राबविणे आवश्यक ठरणार आहे.सबब, सदर बैठक सामाजिक सुरक्षा संहिता — २०२० च्या अनुषंगाने, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई अंतर्गत नोंदित बांधकाम कामगारांकरीता योजनांची अंमलबजावणी करण्याकरीता आयोजित केली असल्याचे मंडळ सचिव यांनी नमूद केले व त्यानुसार चर्चेस सुरुवात करण्यात आली.

विषय क्र. ०१:- सामाजिक सुरक्षा संहिता – २०२० च्या अनुषंगाने, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई अंतर्गत नोंदित बांधकाम कामगारांकरीता योजनांची अंमलबजावणी करणे.

मंडळ सचिव यांनी नमूद केले की, सामाजिक सुरक्षा संहिता – २०२० च्या कलम (७) (६) मध्ये मंडळाची कार्ये नमूद केली असून, त्याअनुषंगाने योजनांची अंमलबजावणी करावयाची आहे. सदर कलमातील (a) ते (h) मध्ये विविध योजना नमूद केल्या असून, (i) व (j) नुसार केंद्र शासनाच्या मान्यतेने अन्य योजना राबविता येणार आहेत. सदरच्या तरतूदी खालीलप्रमाणे आहेत :-

(a) provide death and disability benefits to a beneficiary or his dependants;

(b) make payment of pension to the beneficiaries who have completed the age of sixty years;

(c) pay such amount in connection with premium for Group Insurance Scheme of the beneficiaries as may be prescribed by the appropriate Government;

(d) frame educational schemes for the benefit of children of the beneficiaries as may be prescribed by the appropriate Government;

(e) meet such medical expenses for treatment of major ailments of a beneficiary or, such dependant, as may be prescribed by the appropriate Government;

(f) make payment of maternity benefit to the beneficiaries;

(g) frame skill development and awareness schemes for the beneficiaries;

(h) provide transit accommodation or hostel facility to the beneficiaries;

(i) formulation of any other welfare scheme for the building worker beneficiaries by State Government in concurrence with the Central Government; and

(j) make provision and improvement of such other welfare measures and facilities as may be prescribed by the Central Government.

पान क्र. ५ पैकी २८

(I) **विचारार्थ प्रस्ताव -**

सामाजिक सुरक्षा संहिता — २०२० च्या कलम (७) (६) मधील (a) च्या अनुषंगाने खालीलप्रमाणे चर्चा करण्यात आली :-

१. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई अंतर्गत मृत्यू सहाय्याकरीता सुरू असलेल्या (अंत्यविधी सहाय्य-रक्कम रू.१०,०००/ एकवेळ - F-०६,वारस सहाय्य - रू.२४,०००/- प्रतिवर्ष पाच वर्षाकरीता - F-०७ व शववाहीनी - प्रत्यक्ष होणारा खर्च - F-०८) योजना तसेच, दिव्यांगाकरीता सुरू असलेली कृत्रिम अंग लावणे - प्रत्यक्ष होणारा खर्च - H-०७ ह्या योजना निरसित करून नोंदित जिवीत (सक्रिय) बांधकाम कामगारांना मृत्यू सहाय्य व दिव्यांग सहाय्य योजना लागू करण्याबाबत खालीलप्रमाणे चर्चा करण्यात आली :-

२. **नैसर्गिक मृत्यू सहाय्य योजना :-**

सदरची योजना खालीलप्रमाणे राबविण्यात येईल

(अ) पात्रता निकष

(i) ज्या बांधकाम कामगारांची नोंदणी जिवीत (सक्रिय) आहे असे बांधकाम कामगार सदर योजने करीता पात्र राहतील.

(ii) बांधकाम कामगार किमान तीन वर्षे मंडळाकडे नोंदीत असणे आवश्यक राहील.याबाबत स्पष्ट करण्यात येते की,बांधकाम कामगाराच्या नोंदणीचे दोन वर्षे पुर्ण झाली असतील व तिस-या नोंदणी वर्षामध्ये मृत्यू झाल्यास सदरचा बांधकाम कामगार पात्र राहील. तसेच, तिस-या वर्षाकरीता नोंदणीकरीता अर्ज सादर केला असेल व सदर अर्जावरील अंतिम निर्णयापूर्वीच मृत्यू झाल्यास सदरचा बांधकाम कामगार पात्र राहील. तीन वर्षे नोंदणीचा कालावधी गृहीत धरताना कोणत्याही वर्षाची नोंदणी गृहीत धरण्यात येईल , याकरीता सलग तीन वर्षे नोंदणी असण्याची आवश्यकता राहणार नाही.

(iii) बांधकाम कामगाराचा मृत्यू झाल्यानंतर एक वर्षाच्या आतमध्ये अर्ज सादर करणे आवश्यक राहील अन्यथा बांधकाम कामगार सदर योजने करीता पात्र राहणार नाही.

(iv) सदर योजनेंतर्गत उचित प्राधिकरणाकडून वारस प्रमाणपत्र प्राप्त करून घेणे आवश्यक राहील.

(ब) वित्तीय सहाय्य:-

सदर योजने अंतर्गत रक्कम रू.३,५०,०००/- इतके एकवेळचे सहाय्य म्हणून देण्यात येईल.

(क) आवश्यक कागदपत्रे:-

(i) बांधकाम कामगाराचे मृत्यू प्रमाणपत्र

(ii) वारस प्रमाणपत्र

(iii) वारसदाराचे आधारकार्ड

(iv) वारसदारांच्या बँक खात्याचा तपशिल

३. **अपघाती मृत्यू सहाय्य योजना :-**

सदरची योजना खालीलप्रमाणे राबविण्यात येईल

(आ) पात्रता निकष

पान क्र. ६ पैकी २८

(i) ज्या बांधकाम कामगारांची नोंदणी जिवीत (सक्रिय) आहे असे बांधकाम कामगार सदर योजने करीता पात्र राहतील.

(ii) बांधकाम कामगारने नोंदणीकरीता अर्ज सादर केला असेल व सदर अर्जावरील अंतिम निर्णयापूर्वीच अपघाती मृत्यू झाल्यास सदरचा बांधकाम कामगार पात्र राहील.

(iii) ज्या ठीकाणी इमारत व इतर बांधकाम सुरू असताना अशा ठीकाणी अपघाताद्वारे झालेल्या मृत्यू करीता सदरची योजना लागू राहील.

(iv) बांधकाम कामगाराचा मृत्यू झाल्यानंतर एक वर्षाच्या आतमध्ये अर्ज सादर करणे आवश्यक राहील अन्यथा बांधकाम कामगार सदर योजने करीता पात्र राहणार नाही.

(v) सदर योजनेंतर्गत उचित प्राधिकरणाकडून वारस प्रमाणपत्र प्राप्त करून घेणे आवश्यक राहील.

(ब) वित्तीय सहाय्य:-

सदर योजने अंतर्गत रक्कम रू.६,५०,०००/- इतके एकवेळचे सहाय्य म्हणून देण्यात येईल.

(क) आवश्यक कागदपत्रे:-

(i) पोलिस प्रथम खबरी अहवाल व पंचनामा

(ii) बांधकाम कामगाराचे मृत्यू प्रमाणपत्र

(iii) वारस प्रमाणपत्र

(v) वारसदाराचे आधारकार्ड

(vi) वारसदारांच्या बँक खात्याचा तपशिल

४. <u>दिव्यांग सहाय्य योजना:-</u>

सदरची योजना खालीलप्रमाणे राबविण्यात येईल

(अ) पात्रता निकष

(i) ज्या बांधकाम कामगाराने किमान एकवेळ मंडळाकडे नोंदणी केली असेल असे बांधकाम कामगार सदर योजने करीता पात्र राहतील.

(ii) बांधकाम कामगारने नोंदणीकरीता अर्ज सादर केला असेल व सदर अर्जावरील अंतिम निर्णयापूर्वीच त्यास दिव्यांगत्व आल्यास सदरचा बांधकाम कामगार पात्र राहील.

(iii) मंडळाकडील नोंदणीनंतर आलेल्या दिव्यांगत्वासाठी बांधकाम कामगार सदर योजनेसाठी पात्र राहतील.

(iv) दिव्यांगत्वाचे प्रमाण किमान ७५% असल्यास बांधकाम कामगार सदर योजनेसाठी पात्र राहतील.

(v) बांधकाम कामगारास दिव्यांगत्व प्रमाणपत्र प्राप्त एक वर्षाच्या आतमध्ये अर्ज सादर करणे आवश्यक राहील अन्यथा बांधकाम कामगार सदर योजने करीता पात्र राहणार नाही.

(ब) वित्तीय सहाय्य:-

सदर योजने अंतर्गत रक्कम रू.२,००,०००/- इतके एकवेळचे सहाय्य देण्यात येईल.

(क) आवश्यक कागदपत्रे:-

(i) ७५% दिव्यांगत्व असल्याचे जिल्हा शल्य चिकित्सक यांचे प्रमाणपत्र

५. सध्या मंडळाकडून सुरू असलेल्या F-०१, F-०२ व H-०४ या योजनेच्या संगणकीय प्रणालीमध्ये आवश्यक ते बदल करण्यात यावेत.

(II) विचारार्थ प्रस्ताव –

सामाजिक सुरक्षा संहिता – २०२० च्या कलम (७) (६) मधील **(b)** च्या अनुषंगाने खालीलप्रमाणे चर्चा करण्यात आली :-

१. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई अंतर्गत नोंदित बांधकाम कामगारांनी त्यांच्या वयाची ६० वर्षे पूर्ण झाल्यानंतर, दरवर्षी रक्कम रू.१२,०००/- इतके निवृत्तीवेतन अदा करण्याबाबत खालीलप्रमाणे चर्चा करण्यात आली :-

२. **निवृत्तीवेतन योजनेचे पात्रता निकष :-**

(अ) वयाची ६० वर्षे पुर्ण केलेली व मंडळाकडे सलग किमान १० वर्ष नोंदित असलेले सर्व बांधकाम कामगार सदर योजनेअंतर्गत पात्र राहतील. तसेच त्याच्या कुटुंबातील पती व पत्नी दोघेही बांधकाम कामगार असतील तर ते स्वतंत्रपणे पात्र राहतील.

(ब) पती/पत्नी च्या मृत्यूनंतर संबधित बांधकाम कामगाराचे पती/पत्नी निवृत्तीवेतनाकरिता पात्र राहतील. तथापि, पती/पत्नी सदर योजनेअंतर्गत निवृत्तीवेतन मिळत असेल तर संबधितास दुबार निवृत्तीवेतनाचा लाभ मिळणार नाही.

(क) केंद्र शासनाच्या आदर्श कल्याणकारी योजनांच्या मार्गदर्शक तत्वानुसार, कर्मचारी राज्य विमा कायदा, १९४८ (Employees State Insurance Act, १९४८) व कर्मचाऱ्यांचे प्रदाता निधी आणि विविध तरतूदी कायदा, १९५२ (The Employees Provident Fund and Miscellaneous Provision Act, १९५२) अंतर्गत लाभ प्राप्त करणारे बांधकाम कामगार निवृत्तीवेतनास पात्र राहणार नाहीत.

३. **निवृत्तीवेतनाचे निकष आणि प्रमाण/दर :-**

(अ) मंडळाकडे नोंदित पात्र बांधकाम कामगारांना त्यांच्या मंडळाकडील नोंदणीच्या कालावधीनुसार निवृत्तीवेतन अदा करण्यात येईल.

(ब) मंडळाकडे नोंदणी असलेल्या वर्षानुसार निवृत्तीवेतनाचे प्रमाण/दर खालीलप्रमाणे राहील :-

अ.क्र.	**मंडळाकडे नोंदणीची एकूण वर्षे**	**दरवर्षी मिळणारे निवृत्तीवेतन** (रू.)
१	१० वर्षे	५०% (रू.६,०००/-)
२	१५ वर्षे	७५%(रू.९,०००/-)
३	२० वर्षे	१००% (रू.१२,०००/-)

पान क्र. ८ पैकी २८

(क) मंडळाकडे जमा होणाऱ्या कामगार उपकराचा वेळोवेळी आढावा घेवून, सदर योजनेअंतर्गत देय निवृत्तीवेतनामध्ये कमी अथवा वाढ करणे, अटी व शर्तींमध्ये बदल करणे याबाबत निर्णय मंडळ मान्यतेअंती शासन स्तरावर घेतला जाईल.

४. **निवृत्तीवेतन लाभ मंजूर करण्याची कार्यपद्धती :-**

(अ) सदर योजनेअंतर्गत पात्र ठरणाऱ्या मंडळाकडे नोंदित बांधकाम कामगाराने https://mahabocw.in/ या मंडळ अधिकृत संकेतस्थळावरील विहित नमुना अर्ज विनामूल्य प्राप्त (Download) करून घ्यावा. (अर्जाचा नमूना **"प्रपत्र-अ"** प्रमाणे)

(ब) सदरचा अर्ज पूर्णपणे भरून पात्र नोंदीत बांधकाम कामगाराने त्याचे आधार कार्ड ज्या जिल्ह्यामधील आहे त्या जिल्हा बांधकाम कामगार सुविधा केंद्राचे (WFC) प्रभारी (कामगार उपायुक्त/सहायक कामगार आयुक्त/सरकारी कामगार अधिकारी) यांच्याकडे जमा करावा.

(क) निवृत्तीवेतन अर्जासोबत खालील कागदपत्रे जोडावीत :-

१. पत्त्याचा पुरावा-आधार कार्ड साक्षांकित छायाप्रत

२. जन्मतारखेचा पुरावा-जन्म दाखला/शाळा सोडल्याचा दाखला साक्षांकित छायाप्रत

३. बँक खाते पासबुक साक्षांकित छायाप्रत

(ड) संबधित प्रभारी, जिल्हा कामगार सुविधा केंद्र यांनी सदर अर्जाची छानणी करून **"निवृत्तीवेतन शिफारस प्रमाणपत्र"** (प्रपत्र-ब) सह प्रस्ताव मंडळ मुख्यालयास मान्यतेस सादर करावा. एकापेक्षा जास्त जिल्ह्यामध्ये नोंदणी/नुतनीकरणाचा कालावधी असल्यास संबधित जिह्यामधून **"वर्षनिहाय नोंदणी प्रमाणपत्र"** (प्रपत्र-क) संबधित प्रभारी, जिल्हा बांधकाम कामगार सुविधा केंद्र यांनी प्राप्त करून घ्यावे.

(इ) मंडळ स्तरावर सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मान्यतेअंती संबधित बांधकाम कामगारास **"निवृत्तीवेतन क्रमांक प्रमाणपत्र"** देण्यात येईल. (प्रपत्र-ड)

(ई) निवृत्तीवेतन क्रमांक प्रमाणपत्र दिल्याचा दिनांक हा संबधित बांधकाम कामगाराचा निवृत्तीवेतन दिनांक समजण्यात येईल व त्यानुसार वर्ष गणना करण्यात येईल.

(क) दरवर्षी माहे नोव्हेंबर मध्ये मंडळाच्या निवृत्तीवेतनधारक बांधकाम कामगारास त्याच्या हयातीचा दाखला(प्रपत्र-इ) पुरावा स्वरूपात मंडळाकडे सादर करावा लागेल त्यासाठी त्याने आधारकार्ड/मंडळाचे नोंदणी कार्ड व निवृत्तीवेतन क्रमांक प्रमाणपत्रासह संबंधित जिल्हा कामगार सुविधा केंद्रामध्ये समक्ष उपस्थित राहून जिल्ह्याचे प्रभारी अधिकाऱ्यांकडून हयातीचा दाखला प्राप्त करून द्यावा.जेणेकरून, त्या वर्षीचे निवृत्तीवेतन त्याच्या खात्यात जमा करता येईल.

(ख) मंडळाच्या निवृत्तीवेतनधारक बांधकाम कामगारास त्याचे बँक खाते बदलावयाचे असल्यास तसा अर्ज त्यास प्रभारी, जिल्हा बांधकाम कामगार सुविधा केंद्रामार्फत मंडळास करावा लागेल.

पान क्र. ९ पैकी २८

(ग) मंडळाच्या निवृत्तीवेतनधारक बांधकाम कामगाराचा मृत्यू झाल्यास, त्याचा/तीचा वारसदार पती/पत्नीने वारस नोंदीचा अर्ज प्रभारी, जिल्हा बांधकाम कामगार सुविधा केंद्रामार्फत मंडळास करावा लागेल.

(घ) सदर निवृत्तीवेतन क्रमांकाची नोंद एकात्मिक कल्याणकारी मंडळ संगणकीय प्रणाली (IWBMS) या प्रणालीवर घेण्यात येईल व दरमहा संबधित निवृत्तीवेतनधारक बांधकाम कामगाराच्या खात्यावर निवृत्तीवेतन जमा करण्यात येईल.

५. मासिक निवृत्ती वेतन प्रदानाची कार्यवाही :-

मंडळ मुख्यालयाकडून वेळोवेळी निर्गमित होणा-या **"निवृत्तीवेतन क्रमांक प्रमाणपत्रांचे आधारे"** प्रत्येक महीन्याच्या शेवटच्या आठवडयात त्यामहिन्याच्या १५ तारखेअखेर निर्गत निवृत्तीवेतन क्रमांक धारकांची मंडळ मुख्यालय स्तरावरील IWBMS प्रणालीचे व्यवस्थापक- मे.आरसीएस इन्फोटेक प्रा.लि. यांचेकडून पुढील महिन्याच्या प्रदानार्थ निवृत्तीवेतन धारकांची प्रदान फाईल (Claim disbursement File) बँकेस आवश्यक नमून्यात तयार करण्यात येईल, सदर फाईल तयार करताना त्यामध्ये निवृत्ती वेतन धारकांचे बँक तपशील, व्दिरूक्ती इ.बाबींच्या अनुषंगाने तपासणी करण्यात येईल, सदर प्रदान फाईल मंडळाच्या लेखा शाखेस सादर होईल. लेखा शाखेच्या संबंधित कार्यासनाने सदर फाईलची आवश्यक तपासणी करून सदर प्रदान फाईल सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अंतिम मान्यतेस्तव सादर करावी. सदर मान्यतेअंती प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत संबधित पात्र निवृत्तीवेतन धारक बांधकाम कामगारांच्या बँक खात्यावर DBT in Cash प्रकाराने निवृत्ती वेतन जमा करण्यासाठी बँकेस पाठविण्यात यावी. लेखा शाखेने बँकेकडून वेळोवेळी यशस्वी /अयशस्वी प्रदानांचा ताळमेळ घ्यावा. अयशस्वी प्रदानाची स्वतंत्र प्रदान फाईल करण्यात यावी. व प्रत्येक महिन्याचा मासिक प्रगती अहवाल सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे निदर्शनास आणून द्यावा.

६. मंडळ मुख्यालय स्तरावरील निवृत्तीवेतन समन्वय कक्ष :-

उपरोक्त प्रमाणे कामकाजाचे समन्वय करण्याकरिता खालीलप्रमाणे समन्वय कक्ष गठीत करण्यात येत आहे.

अ.क्र.	अधिकारी	पद
१	जिल्हा कार्यकारी अधिकारी	कक्ष प्रमुख
२	लेखाधिकारी	समन्वयक
३	संबंधित जिल्हयाचे जिल्हा कार्यालय प्रमुख	सदस्य
४	आयडब्ल्यूबीएमएस प्रणालीचे व्यवस्थापक संस्था मे.आरसीएस इन्फोटेक लिमिटेड यांचेकडील प्रकल्प संचालक	सदस्य

(III) विचारार्थ प्रस्ताव –

सामाजिक सुरक्षा संहिता — २०२० च्या कलम (७) (६) मधील (**d**) च्या अनुषंगाने खालीलप्रमाणे चर्चा करण्यात आली :-

१. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई अंतर्गत नोंदित जिवीत (सक्रिय) बांधकाम कामगारांच्या पहिल्या दोन पाल्यांना खालीलप्रमाणे शैक्षणिक सहाय्य योजना लागू करण्याबाबत खालीलप्रमाणे चर्चा करण्यात आली :-

(१) इयत्ता नववी उत्तीर्ण पाल्यास पुढील शिक्षणाकरीता सहाय्य योजना

(२) इयत्ता अकरावी उत्तीर्ण पाल्यास पुढील शिक्षणाकरीता सहाय्य योजना

(३) वैद्यकीय पदवी सहाय्य योजना

(४) अभियांत्रिकी पदवी सहाय्य योजना

(५)निवासी सैनिक शाळांमधील शिक्षणाकरीता सहाय्य योजना

(६) परदेशात पदव्यत्तर पदवी व पी.एच.डी. सहाय्य योजना

(७) मुलभूत वस्तू संच (Basic Item Kit) सहाय्य योजना

२. **इयत्ता नववी उत्तीर्ण पाल्यास पुढील शिक्षणाकरीता सहाय्य योजना :-**

सदरची योजना खालीलप्रमाणे राबविण्यात येईल

(इ) पात्रता निकष

(vi) नोंदित जिवीत (सक्रिय) बांधकाम कामगारांची पहिली दोन पाल्ये सदर योजने करीता पात्र राहतील.

(vii) पती व पत्नी दोघेही बांधाकाम कामगार म्हणून मंडळाकडे नोंदित असल्यास केवळ एकच लाभ अनूज्ञेय राहील.

(viii) यापूर्वी मंडळाच्या E-०१ (इयत्ता पहिले ते सातवी आणि इयत्ता आठवी ते दहावी साठी सहाय्य) योजनेचा पाल्याकरीता लाभ घेतला असल्यास, सदरचा पाल्य लाभाकरीता अपात्र राहील

(ix) ज्या दिनांकास पाल्य नववी उत्तीर्ण झाला असेल (गुणपत्रिकेवरील दिनांक) त्यापासून एक वर्षाच्या आतमध्ये लाभाकरीता अर्ज करण्यास पात्र राहील. तद्नंतरचा अर्ज स्वीकारण्यात येणार नाही.

(ब) वित्तीय सहाय्य:-

सदर योजने अंतर्गत रक्कम रू.२०,०००/- प्रति पाल्य सहाय्य बांधकाम कामगाराच्या बँक खात्यामध्ये देण्यात येईल.

(क) आवश्यक कागदपत्रे:-

(vii) पाल्याचे आधार ओळखपत्र

(viii) पाल्याचे नववी मधील शाळेचे ओळखपत्र

(ix) पाल्याचे नववी मध्ये उत्तीर्ण झाल्याची गुणपत्रिका

३. **इयत्ता अकरावी उत्तीर्ण पाल्यास पुढील शिक्षणाकरीता सहाय्य योजना:-**

पान क्र. ११ पैकी २८

सदरची योजना खालीलप्रमाणे राबविण्यात येईल

(अ) पात्रता निकष

(i) नोंदित जिवीत (सक्रिय) बांधकाम कामगारांची पहिली दोन पाल्ये सदर योजने करीता पात्र राहतील.

(ii) पती व पत्नी दोघेही बांधाकाम कामगार म्हणून मंडळाकडे नोंदित असल्यास केवळ एकच लाभ अनूज्ञेय राहील.

(iii) यापूर्वी मंडळाच्या E-०१ (इयत्ता पहिले ते सातवी आणि इयत्ता आठवी ते दहावी साठी सहाय्य) E-०२ (इयत्ता दहावी आणि इयत्ता बारावी मध्ये किमान ५०% गुण प्राप्त साठी सहाय्य) व E-०३ (इयत्ता अकरावी ते बारावी साठी सहाय्य) योजनेचा पाल्याकरीता लाभ घेतला असल्यास, सदरचा पाल्य लाभाकरीता अपात्र राहील

(iv) ज्या दिनांकास पाल्य अकरावी उत्तीर्ण झाला असेल (गुणपत्रिकेवरील दिनांक) त्यापासून एक वर्षाच्या आतमध्ये लाभाकरीता अर्ज करण्यास पात्र राहील. तद्नंतरचा अर्ज स्वीकारण्यात येणार नाही.

(ब) वित्तीय सहाय्य:-

सदर योजने अंतर्गत रक्कम रू.२५,०००/- प्रति पाल्य बांधकाम कामगाराच्या बँक खात्यामध्ये सहाय्य देण्यात येईल.

(क) आवश्यक कागदपत्रे:-

(i) पाल्याचे आधार ओळखपत्र

(ii) पाल्याचे अकरावी मधील शाळेचे ओळखपत्र

(iii) पाल्याचे अकरावी मध्ये उत्तीर्ण झाल्याची गुणपत्रिका

४. <u>वैद्यकीय पदवी सहाय्य योजना:-</u>

वैद्यकीय क्षेत्रामधील कोणत्याही पदवीकरीता कोणत्याही शैक्षणिक वर्षामध्ये शिक्षण घेत असलेल्या बांधकाम कामगाराच्या पहिल्या दोन पाल्यांकरीता सहाय्य म्हणून सदरची योजना खालीलप्रमाणे राबविली जाईल

(अ)पात्रता निकष

(i) नोंदित जिवीत (सक्रिय) बांधकाम कामगारांची पहिली दोन पाल्ये सदर योजने करीता पात्र राहतील.

(ii) बांधकाम कामगाराचा पती / पत्नी सदर योजनेस पात्र राहणार नाही.

(iii) पती व पत्नी दोघेही बांधकाम कामगार म्हणून मंडळाकडे नोंदित असल्यास केवळ एकच लाभ अनूज्ञेय राहील.

(iv) पदवीच्या कोणत्याही शैक्षणिक वर्षात उत्तीर्ण झाल्यानंतर त्या उत्तीर्ण वर्षाच्या सहाय्याकरीता पाल्य पात्र राहील.

(v) वैद्यकीय क्षेत्रामधील पदविका/पदव्युत्तर पदवी/पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमास सदरची योजना लागू राहणार नाही.

(ब) वित्तीय सहाय्य:-

सदर योजने अंतर्गत रक्कम रू.१,००,०००/- प्रति पाल्य प्रति वर्ष बांधकाम कामगाराच्या बँक खात्यामध्ये सहाय्य देण्यात येईल.

(क) आवश्यक कागदपत्रे:-

(i) पाल्याचे आधार ओळखपत्र
(ii) पाल्याचे पदवी करीत असलेल्या महाविद्यालयाचे ओळखपत्र
(iii) चालू शैक्षणिक वर्षाचे बोनाफाईड प्रमाणपत्र
(iv) उत्तीर्ण वर्षाची गुणपत्रिका

५. अभियांत्रिकी पदवी सहाय्य योजना:-

अभियांत्रिकी क्षेत्रामधील कोणत्याही पदवीकरीता कोणत्याही शैक्षणिक वर्षामध्ये शिक्षण घेत असलेल्या बांधकाम कामगाराच्या पहिल्या दोन पाल्यांकरीता सहाय्य म्हणून सदरची योजना खालीलप्रमाणे राबविली जाईल

(आ) पात्रता निकष

(vi) नोंदित जिवीत (सक्रिय) बांधकाम कामगारांची पहिली दोन पाल्ये सदर योजने करीता पात्र राहतील.
(vii) बांधकाम कामगाराचा पती / पत्नी सदर योजनेस पात्र राहणार नाही.
(viii) पती व पत्नी दोघेही बांधकाम कामगार म्हणून मंडळाकडे नोंदित असल्यास केवळ एकच लाभ अनूज्ञेय राहील.
(ix) पदवीच्या कोणत्याही शैक्षणिक वर्षात उत्तीर्ण झाल्यानंतर त्या उत्तीर्ण वर्षाच्या सहाय्याकरीता पाल्य पात्र राहील.
(x) अभियांत्रिकी क्षेत्रामधील पदविका/पदव्युत्तर पदवी/पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमास सदरची योजना लागू राहणार नाही.

(ब) वित्तीय सहाय्य:-

सदर योजने अंतर्गत रक्कम रू. ६०,०००/- प्रति पाल्य प्रति वर्ष बांधकाम कामगाराच्या बँक खात्यामध्ये सहाय्य देण्यात येईल.

(क) आवश्यक कागदपत्रे:-

(i) पाल्याचे आधार ओळखपत्र
(ii) पाल्याचे पदवी करीत असलेल्या महाविद्यालयाचे ओळखपत्र
(iii) चालू शैक्षणिक वर्षाचे बोनाफाईड प्रमाणपत्र
(iv) उत्तीर्ण वर्षाची गुणपत्रिका

६. निवासी सैनिक शाळांमधील शिक्षणाकरीता सहाय्य योजना:-

निवासी सैनिक शाळांमध्ये शिक्षण घेणा-या बांधकाम कामगारांच्या पाल्यांकरीता खालीलप्रमाणे योजना राबविण्यात येईल.

(i) *केंद्रीय संरक्षण मंत्रालय अंतर्गतच्या सैनिक शाळा*

(अ)पात्रता निकष

(i) नोंदित जिवीत (सक्रिय) बांधकाम कामगारांची पहिली दोन पाल्ये सदर योजने करीता पात्र राहतील.

(ii) पती व पत्नी दोघेही बांधकाम कामगार म्हणून मंडळाकडे नोंदित असल्यास केवळ एकच लाभ अनूज्ञेय राहील.

(iii) कोणत्याही शैक्षणिक वर्षात असताना लाभाकरीता अर्ज करण्यास पात्र राहील.शैक्षणिक अभ्यासक्रम पुर्ण करून अथवा कोणत्याही कारणास्तव निवासी सैनिक शाळा सोडल्यानंतर पाल्य लाभास पात्र राहणार नाही.

(ब) वित्तीय सहाय्य:-

सदर योजने अंतर्गत पाल्य ज्या शैक्षणिक वर्षात असेल त्या शैक्षणिक वर्षापासून पाल्याच्या दर वर्षीच्या अभ्यासक्रम शुल्काची (Tution Fee) पूर्ण प्रतिपूर्ती करण्यात येईल. तथापि, याकरीता दरवर्षी अर्ज करणे आवश्यक राहील.

(क) आवश्यक कागदपत्रे:-

(i) पाल्याचे आधार ओळखपत्र

(ii) पाल्याचे निवासी सैनिक शाळेचे ओळखपत्र

(iii) चालू शैक्षणिक वर्षाचे बोनाफाईड प्रमाणपत्र

(ii) शासन मान्यता प्राप्त अनुदानित व विना-अनुदानित सैनिक शाळा

(अ)पात्रता निकष

(i) नोंदित जिवीत (सक्रिय) बांधकाम कामगारांची पहिली दोन पाल्ये सदर योजने करीता पात्र राहतील.

(ii) पती व पत्नी दोघेही बांधकाम कामगार म्हणून मंडळाकडे नोंदित असल्यास केवळ एकच लाभ अनूज्ञेय राहील.

(iii) कोणत्याही शैक्षणिक वर्षात असताना लाभाकरीता अर्ज करण्यास पात्र राहील. शैक्षणिक अभ्यासक्रम पुर्ण करून अथवा कोणत्याही कारणास्तव निवासी सैनिक शाळा सोडल्यानंतर पाल्य लाभास पात्र राहणार नाही.

(ब) वित्तीय सहाय्य:-

सदर योजने अंतर्गत रक्कम रू.१०,०००/- प्रति पाल्य एकवेळचे सहाय्य बांधकाम कामगाराच्या बँक खात्यामध्ये देण्यात येईल.

(क) आवश्यक कागदपत्रे:-

(i) पाल्याचे आधार ओळखपत्र

(ii) पाल्याचे निवासी सैनिक शाळेचे ओळखपत्र

(iii) चालू शैक्षणिक वर्षाचे बोनाफाईड प्रमाणपत्र

७. <u>परदेशात पदव्युत्तर पदवी व पी.एच.डी. सहाय्य योजना</u>:-

दरवर्षी २५ पाल्यांकरीता सदरची योजना खालीलप्रमाणे राबविण्यात येईल

(अ)पात्रता निकष

(i) नोंदित जिवीत (सक्रिय) बांधकाम कामगारांची पहिली दोन पाल्ये सदर योजने करीता पात्र राहतील.

(ii) पती व पत्नी दोघेही बांधाकाम कामगार म्हणून मंडळाकडे नोंदित असल्यास केवळ एकच लाभ अनूज्ञेय राहील.

(iii) मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समितीच्या मार्गदर्शक सूचनांनुसार विद्यार्थ्यांची निवड करण्यात येईल.

(ब) वित्तीय सहाय्य:-

(i) सदर योजने अंतर्गत अभ्यासक्रम शुल्क (Tuition Fee) हे संबधित विद्यापीठास थेट वर्ग करण्यात येईल

(ii) केंद्र शासनाच्या धोरणानुसार संबधित विद्यार्थ्यास तद्अनुषंगिक भत्ते (Substantial Allowances), प्रवास भत्ता, विमा व इतर शुल्क अदा करण्यात येईल.

(क) आवश्यक कागदपत्रे:-

(x) पाल्याचे आधार ओळखपत्र

(xi) पाल्याचे पदवी महाविद्यालयाचे ओळखपत्र

(xii) पाल्याचे पदवी मध्ये उत्तीर्ण झाल्याची गुणपत्रिका

८. मुलभूत वस्तू संच (Basic Item Kit) सहाय्य योजना:-

इयत्ता पहिले ते इयत्ता आठवी मध्ये शिक्षण घेत असलेल्या बांधकाम कामगारांच्या पाल्यांना मुलभूत वस्तू संच सहाय्याची योजना DBT in Kind पद्धतीने खालीलप्रमाणे राबविण्यात येईल:-

(अ)पात्रता निकष

(i) नोंदित जिवीत (सक्रिय) बांधकाम कामगारांची पहिली दोन पाल्ये सदर योजने करीता पात्र राहतील.

(ii) पती व पत्नी दोघेही बांधाकाम कामगार म्हणून मंडळाकडे नोंदित असल्यास केवळ एकच लाभ अनूज्ञेय राहील.

(iii) इयत्ता पहिली ते इयत्ता आठवी पर्यंत पाल्य एकवेळ लाभार्थी म्हणून पात्र राहील.तथापि, मुलभूत वस्तू संच मध्ये बदल केल्यानंतर नवीन संचाकरीता पात्र राहील.

(ब) वित्तीय सहाय्य:-

सदर योजने अंतर्गत रक्कम निवश्चित केलेल्या मुलभूत वस्तू संचाची शासनाच्या खरेदी धोरणानुसार खरेदी करून प्रति पाल्य एकवेळचे सहाय्य देण्यात येईल.

(क) आवश्यक कागदपत्रे:-

(i) पाल्याचे आधार ओळखपत्र

(ii) पाल्याचे शाळेचे ओळखपत्र

(iii) चालू शैक्षणिक वर्षाचे बोनाफाईड प्रमाणपत्र

(ड) वस्तूंची निवड

आवश्यक असलेल्या वस्तूंची निवड महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई शासन मान्यतेने अंतिम करेल.

१. सध्या मंडळाकडून सुरू असलेल्या E-०१ E-०२ E-०४ E-०६ E-०७ ह्या योजना बंद करण्यात याव्यात.सध्या मंडळाकडून सुरू असलेल्या E-०३ व E-०५ या योजनेच्या संगणकीय प्रणालीमध्ये आवश्यक ते बदल करण्यात यावेत.

(IV) विचारार्थ प्रस्ताव –

सामाजिक सुरक्षा संहिता – २०२० च्या कलम (७) (६) मधील (f) च्या अनुषंगाने खालीलप्रमाणे चर्चा करण्यात आली :-

१. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई अंतर्गत नोंदित जिवीत (सक्रिय) महिला बांधकाम कामगारांना प्रसुती सहाय्य योजना लागू करण्याबाबत खालीलप्रमाणे चर्चा करण्यात आली :-

२. **प्रसुती सहाय्य योजना :-**

सदरची योजना खालीलप्रमाणे राबविण्यात येईल

(इ) पात्रता निकष

(x) नैसर्गिक / शस्त्रक्रियेद्वारे प्रसुती झालेल्या ज्या महिला बांधकाम कामगारांची नोंदणी जिवीत (सक्रिय) आहे असे बांधकाम कामगार सदर योजने करीता पात्र राहतील.

(xi) प्रसुती झाल्यानंतर एक वर्षाच्या आतमध्ये अर्ज सादर करणे आवश्यक राहील अन्यथा बांधकाम कामगार सदर योजने करीता पात्र राहणार नाही.

(xii) पहिल्या दोन अपत्यांकरीता बांधकाम कामगार सदर योजने करीता पात्र राहतील.

(xiii) प्रसुतीनंतर अपत्याचा मृत्यू झाल्यास प्रसुतीबाबत जिल्हा शल्य चिकीत्सक यांचे प्रमाणपत्रावर बांधकाम कामगार सदर योजने करीता पात्र राहतील.

(ब) वित्तीय सहाय्य:-

सदर योजने अंतर्गत रक्कम रू.२५,०००/- इतके एकवेळचे सहाय्य म्हणून देण्यात येईल.

(क) आवश्यक कागदपत्रे:-

(xiii) प्रसुतीनंतर अपत्याचे जन्म नोंदणी दाखला ***अथवा*** प्रसुतीबाबत जिल्हा शल्य चिकीत्सक यांचे प्रमाणपत्र.

३. सध्या मंडळाची बंद असलेल्या H-०१ या योजनेच्या संगणकीय प्रणालीमध्ये आवश्यक ते बदल करण्यात यावेत.

(V) विचारार्थ प्रस्ताव -

सामाजिक सुरक्षा संहिता – २०२० च्या कलम (७) (६) मधील (c) , (e) , (g) व (h)च्या अनुषंगाने खालीलप्रमाणे चर्चा करण्यात आली :-

१. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई अंतर्गत यापूर्वी राबविल्या जात असलेल्या तथापि, सामाजिक सुरक्षा संहिता – २०२० च्या तरतूदीमध्ये समाविष्ट न होणा-या खालील योजना दिनांक ०१ जून, २०२६ पासून बंद करण्याच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे चर्चा करण्यात आली:-

१. इयत्ता पहिली ते इयत्ता सातवी (रक्कम रू.२,५००/- प्रतिवर्षी) आणि इयत्ता आठवी (रक्कम रू.५,०००/- प्रतिवर्षी) — **E-०१**

२.इयत्ता दहावी व इयत्ता बारावी ५०% गुण (रक्कम रू.१०,०००/- प्रतिवर्षी) — **E-०२**

३.पदवी करीता सहाय्य (रक्कम रू. २०,०००/- प्रतिवर्षी) — **E-०४**

४.पदविकेकीता सहाय्य (रक्कम रू.२०,०००/- प्रतिवर्षी) व पदव्युत्तर पदवी करीता सहाय्य (रक्कम रू.२५,०००/- प्रतिवर्षी) — **E-०६**

५. संगणक शिक्षणाकरीता सहाय्य (रक्कम रू.५,०००/- एकवेळेस) — **E-०७**

६. पहिल्या मुलीच्या जन्मानंतर कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया (रक्कम रू.१,००,०००/- एकवेळेस) — **H-०३**

७. गृहकर्जाच्या व्याजावर अनुदान (रक्कम रू.२,००,०००/- एकवेळेस) — **F-०३**

८. शहरी भागात घर खरेदीसाठी सहाय्य (रक्कम रू.२,००,०००/- एकवेळेस) — **F-०४**

९. ग्रामीण भागात घर खरेदीसाठी सहाय्य (रक्कम रू.२,००,०००/- एकवेळेस) — **F-०५**

१०. विवाह खर्चाची प्रतिपुर्ती (रक्कम रू.३०,०००/- एकवेळेस) — **S-०१**

११. मुलीच्या विवाहाकरीता सहाय्य (रक्कम रू.५१,०००/- एकवेळेस) — **S-१३**

२. सामाजिक सुरक्षा संहिता — २०२० च्या कलम (७) (६) मधील (**i**) च्या अनुषंगाने खालील योजना सुरू ठेवण्याबात केंद्र शासनास प्रस्ताव पाठविण्याबाबत चर्चा करण्यात आली :-

१. सुरक्षा संच (**Saftey Kit** एकवेळेस) पुरवठा करणे — **S-०८**

२. अत्यावश्यक संच (**Essential Kit** एकवेळेस) पुरवठा करणे — **S-०९**

३. गृहपयोगी संच (**Utensil Kit** एकवेळेस) पुरवठा करणे — **S-१४**

३. सामाजिक सुरक्षा संहिता — २०२० च्या कलम (७) (६) (**c**) मधील गट विमा तरतूदीखालील "प्रधानमंत्री जीवनज्योती विमा योजना", "प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना" व कलम (७) (६) (**e**) मधील वैद्यकीय उपचार तरतूदीखालील "तपासणी ते उपचार" योजना सद्यस्थितीत सुरू ठेवून, सदर योजनांचे पुर्नविलोकन करण्यास अभ्यासगट गठीत करण्याच्या अनुषंगाने चर्चा करण्यात आली.

४. सामाजिक सुरक्षा संहिता — २०२० च्या कलम (७) (६) (**g**) नुसार कौशल्य विकास योजना व प्रचार प्रसिद्धी योजनेबाबतचा मसुदा तयार करून शासनास सादर करण्याच्या अनुषंगाने चर्चा करण्यात आली.

५. सामाजिक सुरक्षा संहिता — २०२० च्या कलम (७) (६) (**h**) नुसार नव्याने सुरू करावयाच्या "संक्रमण शिबीर / वसतिगृह" या योजनेबाबतचा मसुदा तयार करून शासनास सादर करण्याच्या अनुषंगाने अभ्यासगट गठीत करण्याच्या अनुषंगाने चर्चा करण्यात आली.

(V) <u>विचारार्थ प्रस्ताव</u> —

योजनांच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने खालील बाबींवर चर्चा करण्यात आली :-

पान क्र. १७ पैकी २८

१. **वित्तीय तरतूद -**

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांच्याकडे जमा होणा-या कामकार उपकरामधून सदर योजनेवरील खर्च भागविण्याबाबत चर्चा करण्यात आली.

२. सदरची योजना महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई मार्फत राबविण्याबाबत व सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी योजना अंमलबजावणीबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत चर्चा करण्यात आली.

उपरोक्त प्रमाणे झालेल्या चचर्चेनुसार सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला :-

ठराव क्र. ६५ (०१)/२०२६:-

सामाजिक सुरक्षा संहिता – २०२० च्या अनुषंगाने, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई अंतर्गत नोंदित जिवीत (सक्रिय) बांधकाम कामगारांना नैसर्गिक मृत्यू प्रकरणी रक्कम रू.३,५०,०००/- ,अपघाती मृत्यू प्रकरणी रक्कम रू. ६,५०,०००/- व दिव्यांग प्रकरणी रक्कम रू. २,००,०००/- इतके एकवेळचे सहाय्य देण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

ठराव क्र. ६५ (०२)/२०२६:-

उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग शासन निर्णय क्रमांक- इबांका-०३२५/प्र.क्र.४५/कामगार-७, दिनांक २८ मार्च,२०२५ व दिनांक १९ जून,२०२५ अन्वये महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई अंतर्गत नोंदित बांधकाम कामगारांना निवृत्तीवेतन लागू करण्याबाबत घेतलेला निर्णय कायम करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

ठराव क्र. ६५ (०३)/२०२६:-

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई अंतर्गत नोंदित जिवीत (सक्रिय) बांधकाम कामगारांच्या सर्व पाल्यांना,

(१) इयत्ता नववी उत्तीर्ण पाल्यास पुढील शिक्षणाकरीता सहाय्य योजना (रक्कम रू.२०,०००/- प्रति पाल्य एकवेळचे सहाय्य) करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

(२) इयत्ता अकरावी उत्तीर्ण पाल्यास पुढील शिक्षणाकरीता सहाय्य योजना (रक्कम रू.२५,०००/- प्रति पाल्य एकवेळचे सहाय्य) करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

(३) वैद्यकीय पदवी सहाय्य योजना (रक्कम रू.१,००,०००/- प्रति पाल्य प्रति वर्ष सहाय्य) करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

(४) अभियांत्रिकी पदवी सहाय्य योजना (रक्कम रू.६०,०००/- प्रति पाल्य प्रति वर्ष सहाय्य) करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

(५) निवासी सैनिक शाळांमधील शिक्षणाकरीता सहाय्य योजना – (i)केंद्रीय संरक्षण मंत्रालय अंतर्गतच्या सैनिक शाळा (दर वर्षीच्या अभ्यासक्रम शुल्काची (Tution Fee) पूर्ण प्रतिपूर्ती), (ii) शासन मान्यता प्राप्त अनुदानित व विना-अनुदानित सैनिक शाळा (रक्कम रू.१०,०००/- प्रति पाल्य एकवेळचे सहाय्य) करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

(६) परदेशात पदव्युत्तर पदवी व पी.एच.डी. सहाय्य योजना - अभ्यासक्रम शुल्क (Tuition Fee) हे संबधित विद्यापीठास थेट वर्ग करण्यात येईल व केंद्र शासनाच्या धोरणानुसार संबधित विद्यार्थ्यास तद्अनुषंगिक भत्ते (Substantial Allowances), प्रवास भत्ता, विमा व इतर शुल्क अदा करण्यात मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

(७) मुलभूत वस्तू संच (Basic Item Kit) सहाय्य योजना - इयत्ता पहिले ते इयत्ता आठवी मध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना वस्तूंची निवड मंडळाने शासन मान्यतेने अंतिम केलेल्या मुलभूत वस्तू संच (Basic Item Kit) पुरवठा करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

पान क्र. २० पैकी २८

ठराव क्र. ६५ (०४)/२०२६:-

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई अंतर्गत नोंदित जिवीत (सक्रिय) महिला बांधकाम कामगारांना रक्कम रू.२५,०००/- इतके एकवेळचे प्रसुती सहाय्य देण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

ठराव क्र. ६५ (०५)/२०२६:-

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई अंतर्गत यापूर्वी राबविल्या जात असलेल्या तथापि, सामाजिक सुरक्षा संहिता – २०२० च्या तरतूदीमध्ये समाविष्ट न होणा-या खालील योजना महाराष्ट्र सामाजिक सुरक्षा संहिता नियम – २०२६ लागू होण्याच्या दिनांकापासून पासून बंद करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे :-

१. इयत्ता पहिली ते इयत्ता सातवी (रक्कम रू.२,५००/- प्रतिवर्षी) आणि इयत्ता आठवी (रक्कम रू.५,०००/- प्रतिवर्षी) – E-०१

२.इयत्ता दहावी व इयत्ता बारावी ५०% गुण (रक्कम रू.१०,०००/- प्रतिवर्षी) – E-०२

३.पदवी करीता सहाय्य (रक्कम रू. २०,०००/- प्रतिवर्षी) – E-०४

४.पदविकेकीता सहाय्य (रक्कम रू.२०,०००/- प्रतिवर्षी) व पदव्युत्तर पदवी करीता सहाय्य (रक्कम रू.२५,०००/- प्रतिवर्षी) – E-०६

५. संगणक शिक्षणाकरीता सहाय्य (रक्कम रू.५,०००/- एकवेळेस) – E-०७

६. पहिल्या मुलीच्या जन्मानंतर कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया (रक्कम रू.१,००,०००/- एकवेळेस) – H-०३

७. गृहकर्जाच्या व्याजावर अनुदान (रक्कम रू.२,००,०००/- एकवेळेस) – F-०३

८. शहरी भागात घर खरेदीसाठी सहाय्य (रक्कम रू.२,००,०००/- एकवेळेस) – F-०४

९. ग्रामीण भागात घर खरेदीसाठी सहाय्य (रक्कम रू.२,००,०००/- एकवेळेस) – F-०५

१०. विवाह खर्चाची प्रतिपुर्ती (रक्कम रू.३०,०००/- एकवेळेस) – S-०१

११. मुलीच्या विवाहाकरीता सहाय्य (रक्कम रू.५१,०००/- एकवेळेस) – S-१३

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

पान क्र. २२ पैकी २८

ठराव क्र. ६५ (०६)/२०२६:-

सामाजिक सुरक्षा संहिता – २०२० च्या कलम (७) (६) मधील (i) च्या अनुषंगाने खालील योजना सुरू ठेवण्याबाबतचा प्रस्ताव केंद्र शासनास पाठविण्याबाबस मान्यता प्रदान करण्यात येत आहे :-

१. सुरक्षा संच (Saftey Kit एकवेळेस) पुरवठा करणे – S-०८
२. अत्यावश्यक संच (Essential Kit एकवेळेस) पुरवठा करणे – S-०९
३. गृहपयोगी संच (Utensil Kit एकवेळेस) पुरवठा करणे – S-१४

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

ठराव क्र. ६५ (०७)/२०२६:-

सामाजिक सुरक्षा संहिता – २०२० च्या कलम (७) (६) (c) मधील गट विमा तरतूदीखालील "प्रधानमंत्री जीवनज्योती विमा योजना", "प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना" व कलम (७) (६) (e) मधील वैद्यकीय उपचार तरतूदीखालील "तपासणी ते उपचार" योजना सद्यस्थितीत सुरू ठेवून, सदर योजनांचे पुर्नविलोकन करण्यास अभ्यासगट गठीत करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

ठराव क्र. ६५ (०८)/२०२६:-

सामाजिक सुरक्षा संहिता – २०२० च्या कलम (७) (६) (g) नुसार कौशल्य विकास योजना व प्रचार प्रसिद्धी योजनेबाबतचा मसुदा तयार करून शासनास सादर करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

ठराव क्र. ६५ (०९)/२०२६:-

सामाजिक सुरक्षा संहिता – २०२० च्या कलम (७) (६) (h) नुसार नव्याने सुरू करावयाच्या "संक्रमण शिबीर / वसतिगृह" या योजनेबाबतचा मसुदा तयार करून शासनास सादर करण्याकरीता अभ्यासगट गठीत करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

ठराव क्र. ६५ (१०)/२०२६:-

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांच्याकडे जमा होणा-या कामकार उपकरामधून सदर योजनेवरील खर्च भागविण्यास मान्यता प्रदान करण्यात आली.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

पान क्र. २७ पैकी २८

ठराव क्र. ६५ (११)/२०२६:-

सदरच्या योजना महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई मार्फत राबविण्याबाबस व सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी योजना अंमलबजावणीबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यास मान्यता प्रदान करण्यात आली.

विषय क्र. (०२) मा. अध्यक्ष यांच्या मान्यतेने आयत्या वेळेचे विषय

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

(२) परिपत्रक

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

पाचवा मजला, एमएमटीसी हाऊस, प्लॉट नं. सी २२, ब्लॉक ई, वांद्रे कुर्ला संकुल, वांद्रे (पुर्व), मुंबई ४०० ०५१.

संकेतस्थळ- www.mahabocw.in
दुरध्वनी व फॅक्सक्र. ०२२-२६५७२६३१
ई-मेल bocwwboardmaha@gmail.com

जा.क्र.१२५९/संप्रणा-२०२३/प्र.क्र.-०१/यो-०२/२०२५ दिनांक:- 25 JUN 2025

प्रति,

१. अपर कामगार आयुक्त,
कोकण/पुणे/नागपूर

२. कामगार उप आयुक्त,
नाशिक/ छत्रपती संभाजीनगर / अमरावती

विषय :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातर्गत बोगस कागदपत्रे/दलाल यांच्या विरूध्द दक्षता पथकामार्फत विशेष तपासणी मोहीम राबवणेबाबत.

उपरोक्त विषयास अनुसरून आपणांस कळविण्यात येते की, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांतर्गत सर्व जिल्हा /तालुकास्तरावर जिल्हा/तालुका सुविधा केंद्रामार्फत बांधकाम कामगारांची नोंदणी नुतनीकरण व लाभाचे अर्ज संगणक प्रणालीवर सादर केल्यावर तालुका सुविधा केंद्रातील कर्मचारी व नोंदणी अधिकारी यांच्या छाननीअंती अर्ज मंजूर करणेत येत आहेत. सदरच्या सेवा मंडळामार्फत नि:शुल्क राबविण्यात येतात. मंडळामार्फत देण्यात येत असलेले सर्व लाभ कोणतेही शुल्क न आकारता देण्यात येत असले तरीही, बांधकाम कामगारांकडून पैशाची मागणी होत असल्याबाबत तसेच बोगस कागदपत्र/दाखले तयार होत असल्याबाबत इलेक्ट्रोनिक मिडीया, विविध समाज माध्यमामध्ये प्रसारीत होत आहे.

२. सदर प्रकरणी मा.मंत्री (कामगार) व मा. प्रधान सचिव (कामगार) यांच्या निर्देशानुसार दक्षता पथक स्थापन करण्यात येत आहेत. त्याअनुषंगाने सर्व विभागप्रमुखांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याचे निर्देश आहेत.

(अ) विभागप्रमुखांनी त्यांच्या अधिनस्त प्रत्येक जिल्हास्तरावर जिल्हा कार्यालय प्रमुखांच्या अध्यक्षतेखाली दक्षता पथक गठीत करावे.

(ब) सदर जिल्हास्तरीय दक्षता पथकाचे कार्यक्षेत्र त्याच विभागातील दुसरा जिल्हा राहील. संबंधित जिल्हास्तरीय दक्षता पथकास अन्य नेमून दिलेल्या जिल्हाचे लेखी आदेश विभागप्रमुखांनी काढावेत.

(क) सदर जिल्हास्तरीय दक्षता पथकाने त्यांना नेमून दिलेल्या जिल्ह्यात बोगस कागदपत्र तयार करून होणारी नोंदणी, पैशाच्या मागणीबाबत प्राप्त तक्रारी, बोगस कागदपत्रे /

दाखले इ. सर्व तक्रारींबाबत संबंधित ठिकाणी तपासणी मोहीम राबवून संबंधितावर फौजदारी गुन्हे दाखल करावेत.

(ड) मंडळाने सर्व क्षेत्रीय कार्यालयांना वाहन भाडेतत्वावर घेण्यास मान्यता दिलेली आहे. सदर वाहनाचा या कामासाठी वापर करणेत यावा. तसेच पथकाने त्यांचा इतर अनुषंगिक खर्च विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करून प्रशासकीय निधीतून करण्यात यावा.

(इ) सर्व संबंधित जिल्हास्तरावरील दक्षता पथक प्रमुखांनी सदर मोहीमेदरम्यान केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल संबंधित विभागीय प्रमुखांना सादर करावा, व सर्व जिल्हा कार्यालयांकडून प्राप्त अहवाल एकत्रित करून विभागप्रमुखांनी त्यांच्या अभिप्रायासह मंडळ मुख्यालयास सादर करावा.

(ई) सदर तपासणी मोहीम दि.१० जुलै अखेर राबवावी व त्याचा अहवाल विभागप्रमुखांनी दि.११ जुलै २०२५ पर्यंत मंडळास सादर करावा.

(फ) सदरचा अहवाल सादर केल्यानंतर, प्रत्येक पथकाने दरमहा किमान एक तपासणी करावी व विभागप्रमुखांनी दरमहा त्याचा एकत्रित अहवाल मंडळास सादर करावा.

(विवेक कुंभार)
सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

प्रत:-

१. मा.मंत्री, कामगार (खाजगी सचिव), मंत्रालय मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा.प्रधान सचिव (कामगार), मंत्रालय मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
३. मा.कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांना माहितीस्तव सविनय सादर.
४. उपसचिव, (कामगार-०७), मंत्रालय मुंबई यांना माहितीस्तव.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई.

एमएमटीसी हाऊस, पाचवा मजला,
प्लॉट नं. सी २२, ब्लॉक ई, वांद्रे कुर्ला
संकुल, वांद्रे (पुर्व), मुंबई-०५१

संकेतस्थळ- www.mahabocw.in
दुरध्वनी व फॅक्सक्र. ०२२-२६५७२६३१
ई-मेल bocwwboardmaha@gmail.com

जा.क्र. २५५०/२०२५
संप्रणा-२०२५/प्र.क्र.१/योजना-०२

दिनांक:- 04 DEC 2025

प्रति,

१. अपर कामगार आयुक्त
कोकण/पुणे/नागपूर
२. कामगार उप आयुक्त
अमरावती/ नाशिक/ छ.संभाजीनगर

विषय:- बांधकाम कामगारांच्या नोंदणी, नुतणीकरण व लाभ वाटपाबाबत.

संदर्भ:-
०१. मंडळाचे पत्र जा.क्र.२५३/२०२३/संप्रणा-२०२३/प्र.क्र.१/योजना-०२,दि.०५.०२.२०२५
०२. मंडळाचे पत्र जा.क्र.१६०३/२०२३/संप्रणा-२०२३/प्र.क्र.१/योजना-०२,दि.३०.०७.२०२५
०३. शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग क्र.इबांका-०८२५/प्र.क.११७/कामगार-०७, दि.०९.०९.२०२५
०४. मंडळाचे पत्र जा.क्र.१२५९/२०२३/संप्रणा-२०२३/प्र.क्र.१/योजना-०२,दि.२५.०६.२०२५

इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार विनियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ च्या कलम १८ अन्वये महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची स्थापना करण्यात आली असून मंडळामार्फत नोंदणी, नुतनीकरण लाभाचे अर्ज सादर करणेकरीता एकात्मीक कल्याण मंडळ व्यवस्थापन संगणक प्रणाली (IWBMS) विकसित करणेत आली आहे. मंडळाअंतर्गत नोंदीत बांधकाम कामगारांना आर्थिक सहाय्य, आरोग्य, शैक्षणिक सहाय्य व सामाजिक सुरक्षेच्या विविध कल्याणकारी योजनेचा लाभ देण्यात येतो.

०२. सदर प्रणालीवर मोठया प्रमाणावर नोंदणी, नुतणीकरण व लाभाचे अर्ज प्राप्त होत असून संदर्भिय ०१ च्या पत्रान्वये प्राप्त अर्जावर करावयाच्या कार्यवाहीबाबत सविस्तर सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. मंडळ स्तरावरून नोंदणी अधिकाऱ्यामार्फत

कार्यवाही झालेल्या सर्व अर्जांचे अवलोकन केले असता मोठया प्रमाणात नोंदणी, नुतणीकरण व लाभाचे अर्ज नोंदणी अधिकाऱ्याच्या डेस्कवर प्रलंबित असल्याची बाब निर्दशनास आली आहे. सदर अर्ज प्रलंबित राहील्याने लोकप्रतिनिधी, कामगार व संघटना यांच्यामार्फत वारंवार मंडळ मुख्यालयात पाठपुरावा करण्यात येत आहेत तसेच त्याबाबतच्या तक्रारीही प्राप्त होत आहेत.

०३. संदर्भिय ०३ च्या शासन निर्णयान्वये स्थानिक व विभागीय स्तरावर बांधकाम कामगारांनी संगणक प्रणालीवर सादर केलेले नोंदणी व नुतणीकरण व लाभाचे अर्ज निकाली काढण्यासाठी अनुक्रमे **"बांधकाम कामगार स्थानिक संनियंत्रण समिती व बांधकाम कामगार विभागीय संनियंत्रण समिती"** गठीत करण्यात आल्या आहेत. तथापि, बहुतांश विधानसभा क्षेत्राकरीता सदर समित्या गठित झालेल्या नाहीत त्यामुळे सदर समित्या गठित करण्याबाबत शिफारस पत्र मिळण्याकरीता सन्माननीय विधानसभा सदस्यांकडे आपल्या स्तरावरून वैयक्तिक पाठपुरावा करण्यात यावा तसेच सदर समिती गठित होऊन त्यांचे मार्फत बांधकाम कामगारांच्या नोंदणी, नुतणीकरण व लाभाच्या अर्जावर निर्णय घेण्यास काही कालावधी लागण्याची शक्यता नाकारता येत नाही सबब, सद्यिस्थितील प्रचलित पध्दतीनुसार नोंदणी अधिकाऱ्यामार्फत सदर अर्जावर कार्यवाही करण्याचे कामकाज पुर्ववत सुरू ठेवावे व प्रलंबित सर्व अर्जावर प्राधान्याने कार्यवाही करून अर्ज तातडीने निकाली काढावेत अन्यथा संबंधितावर वैयक्तिक जबाबदारी निश्चीत करण्यात येईल अशा स्पष्ट सुचना आपल्या स्तरावरून सर्व संबंधितांना देण्यात याव्यात.

०४. मंडळाच्या संदर्भिय ०१ व ०२ च्या पत्रान्वये मंडळाने निर्धारीत केलेल्या योजनानिहाय निकषानुसार लाभाच्या अर्जावर कार्यवाही करण्याच्या सुचना देण्यात आलेल्या आहेत. त्याचे अनुपालन करण्याचे स्पष्ट निर्देश आपल्या स्तरावरून सर्व नोंदणी अधिकाऱ्यांना देण्यात यावेत.

०५. संदर्भिय ०४ च्या पत्रान्वये मंडळाअंतर्गत अर्ज सादर करतांना बांधकाम कामगारांकडून होणारी पैशाची मागणी, बोगस कागदपत्रे इत्यादीबाबत प्राप्त ताक्रारीवर जिल्हा कार्यालय प्रमुखांच्या अध्यक्षतेखाली दक्षता पथक गठित करून सदर पथकाने दरमहा किमान एक तपासणी करून विभाग प्रमखांनी त्याचा एकत्रित अहवाल मंडळास सादर करण्याच्या सुचना देण्यात आलेल्या होत्या. तथापि, दरमहा एकत्रित अहवाल मंडळास प्राप्त झालेला नाही त्यामुळे दक्षता पथकामार्फत चुकीच्या पध्दतीने होत असलेली नोंदणी, नुतणीकरण यांना आळा बसेल अशी कार्यवाही करून संबंधित

दलाल/व्यक्ती यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करावेत व तसा एकत्रित अहवाल विभाग प्रमुखांनी मंडळास सादर करावा.

(विवेक कुंभार)
सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई.

प्रत:-

१. मा. मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा. राज्यमंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
३. मा. प्रधान सचिव (कामगार) यांचे स्वीय सहायक मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
४. मा. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
५. उप सचिव (कामगार-७) मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

पाचवा मजला, एमएमटीसी हाऊस, प्लॉट नं. सी २२, ब्लॉक ई, वांद्रे कुर्ला संकुल, वांद्रे (पुर्व), मुंबई ४०० ०५१.

संकेतस्थळ– www.mahabocw.in
दुरध्वनी व फॅक्सक्र. ०२२-२६५७२६३१
ई-मेल bocwwboardmaha@gmail.com

जा.क्र. १५ /कायदा-२०२३/प्र.क्र. १४१/आस्था-१ **दिनांक :-** 1 JAN 2026

प्रति,

१. अपर कामगार आयुक्त/ कामगार उप आयुक्त,
पुणे/कोकण विभाग/नागपूर/छत्रपती संभाजीनगर/नाशिक/अमरावती

२. कामगार उप आयुक्त /सहाय्यक कामगार आयुक्त/ सरकारी कामगार अधिकारी
जिल्हा कामगार सुविधा केंद्र (सर्व)

विषय:- <u>महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील शैक्षणिक अर्थसहाय्याच्या लाभाबाबत.</u>

संदर्भ:- उद्योग,ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागाची अधिसूचना दि.३०.११.२०२३

उपरोक्त विषयान्वये महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची स्थापना इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ अंतर्गत करण्यात आली असून मंडळामार्फत बांधकाम कामगारांची नोंदणी करण्यात येवून त्यांना विविध कल्याणकारी योजनांचा लाभ देण्यात येतात.

२. मंडळामार्फत शैक्षणिक अर्थसहाय्य योजनेअंतर्गत एकूण ०७ योजना राबविण्यात येतात. तसेच शासनाच्या विविध विभागांमार्फत शैक्षणिक शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येते. उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागाच्या संदर्भिय अधिसूचनेतील अनु.क्र. ०२ मध्ये **जर लाभार्थ्यास, केंद्र सरकारकडून किंवा राज्य शासनाकडून राबविण्यात येत असलेल्या योजनेचा लाभ मिळत असेल तर, लाभाची व्दिरुक्ती टाळण्यासाठी, मंडळाकडून राबविण्यात येत असलेल्या योजनेचा लाभ मिळण्यासाठी उक्त लाभार्थी पात्र असणार नाही,** असे नमूद आहे.

३. त्याअनुषंगाने कळविण्यात येते की, नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांचे शैक्षणिक अर्थसहाय्याचे अर्ज तपासणी करतांना उपरोक्त नमूद केंद्र/राज्य शासनाकडून राबविण्यात येत असलेल्या कोणत्याही शिष्यवृत्तीचा लाभ घेतलेला नसून केवळ मंडळाअंतर्गत शिष्यवृत्ती मिळणेकरीता अर्ज सादर केलेला आहे या आशयाचे सोबत जोडलेल्या स्वयंघोषणापत्राची पाहणी करून अर्ज मंजूर करण्यात यावा. सदर दुबार लाभ घेतल्याचे स्वयंघोषणापत्र मंडळाच्या एकात्मीक कल्याणकारी मंडळ संगणकीय प्रणाली (IWBMS) वर अपलोड करण्याच्या सूचना संबंधितांना

देण्यात आलेल्या आहेत. तरी, उपरोक्तबाबतच्या सूचना आपल्या अधिनस्त सर्व संबंधितांना देण्यात याव्यात.

(विवेक कुंभार)
सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

प्रत :-

